# गीतरामायण



REFBK-0021971

म. ग्रं. सं. ठाणें
विषय ८१०५
सं. क्र. २३२५

वि. क्र.
2328

29869
9/9/2066
काव्य

# गीत रामायण

(पुणें नभोवाणी केंद्रावरून प्रक्षेपित झालेल्या गीतांचा संग्रह)

ग. दि. माडगूळकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2328 काव्य
दा. क्र.
29869
शाखा (स्थळ ...)

REFBK 0021971
REFBK-0021971

प्रकाशन विभाग
माहिती व नभोवाणी मंत्रालय
भारत सरकार

पहिली आवृत्ति—ऑक्टोबर, १९५७
दुसरी आवृत्ति—सप्टेंबर १९६१
तिसरी आवृत्ति—डिसेंबर १९६३
चौथी आवृत्ति—नोव्हेंबर १९६४
पाचवी आवृत्ति—सप्टेंबर १९६९ ( भाद्र १८९१)
सहावी आवृत्ति—फेब्रुवारी, १९७६ (फाल्गुन १८९७)

मुखपृष्ठ व
आंतील सजावट : सौ. पद्मा सहस्रबुद्धे, मुंबई

Geet Ramayana (Marathi)

कि. रु. ५.००

प्रकाशक : संचालक, प्रकाशन विभाग, पतियाला हाउस, नवी दिल्ली-१
मुद्रक : स्कायलार्क प्रिंटर्स नवी दिल्ली-११००५५

गीत रामायणाची ही सहावी आवृत्ती वाचकांना सादर करताना आम्हाला फार आनंद होतो. १९६७ मध्ये भारत सरकारने पद्मभूषण देऊन बहुमान केलेले सुविख्यात इतिहाससंशोधक, साहित्यिक व मार्मिक टीकाकार महामहोपाध्याय डॉ. दत्तो वामन पोतदार यांनी पाचव्या आवृत्तीसाठी प्रस्तावना लिहिली याबद्दल आम्ही त्यांचे कृतज्ञ आहोत.

या आवृत्तीखेरीज गीत रामायणाची दुसरी राज आवृत्तीही काढण्यात आली आहे. रामायणातील प्रसंगांवरील प्राचीन शिल्पे तसेच चित्रे तीत आहेत. या वीस चित्रांपैकी चार, या आवृत्तीतही आहेत. ही शिल्पे व चित्रे छापण्याची परवानगी दिल्याबद्दल भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, भारत सरकार, नवी दिल्ली; राष्ट्रीय संग्रहालय, भारत सरकार, नवी दिल्ली व भारत कलाभवन, वाराणसी यांचे आम्ही आभारी आहोत.

या दोन्ही आवृत्तींचे रसिकवर्ग सहर्ष स्वागत करील, अशी आशा वाटते.

प्रकाशक

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | प्रस्तावना : महामहोपाध्याय डॉ० दत्तो वामन पोतदार | १ |
| | पारायणापूर्वी : बा० भ० बोरकर | ७ |
| | कै० पु० मं० लाड यांस | १२ |
| १. | कुश लव रामायण गाती ... ... | १४ |
| २. | सरयू तीरावरी ... ... | १७ |
| ३. | उगा कां काळिज माझे उले ... ... | २० |
| ४. | उदास कां तू ? ... ... | २३ |
| ५. | दशरथा, घे हे पायसदान ... ... | २५ |
| ६. | राम जन्मला ग सखी ... ... | २७ |
| ७. | सांवळा ग रामचंद्र ... ... | ३० |
| ८. | ज्येष्ठ तुझा पुत्र मला देइ दशरथा ... ... | ३२ |
| ९. | मार ही ताटिका रामचंद्रा ... ... | ३५ |
| १०. | चला राघवा चला ... ... | ३८ |
| ११. | आज मी शापमुक्त जाहले ... ... | ४१ |
| १२. | स्वयंवर झाले सीतेचे ... ... | ४४ |
| १३. | व्हायचे राम अयोध्यापति ... ... | ४७ |
| १४. | मोडु नका वचनास ... ... | ५० |
| १५. | नको रे जाउ रामराया ... ... | ५३ |
| १६. | रामाविण राज्यपदी कोण बैसतो ? ... ... | ५६ |
| १७. | जेथे राघव तेथे सीता ... ... | ५९ |
| १८. | थांब सुमंता थांबवि रे रथ ... ... | ६३ |
| १९. | जय गंगे जय भागिरथी ... ... | ६६ |
| २०. | या इथे लक्ष्मणा बांध कुटी ... ... | ६९ |

२१. बोलले इतुके मज श्रीराम ... ... ७२
२२. दाटला चोहिकडे अंधार ... ... ७५
२३. माता न तू वैरिणी ... ... ७८
२४. चापबाण घ्या करीं ... ... ८१
२५. दैवजात दु:खें भरता ... ... ८४
२६. तात गेले, माय गेली, भरत आता पोरका ... ८७
२७. कोण तू कुठला राजकुमार ... ... ९०
२८. सूड घे त्याचा लंकापति ... ... ९३
२९. मज आणुन द्या तो हरिण अयोध्यानाथा ... ९६
३०. याचका, थांबु नको दारात ... ... ९९
३१. कोठे सीता जनकनंदिनी ? ... ... १०२
३२. ही तिच्या वेणितिल फुले ... ... १०५
३३. पळविली रावणें सीता ... ... १०८
३४. धन्य मी शबरी श्रीरामा ... ... १११
३५. सन्मित्र राघवाचा सुग्रीव आज झाला ... ११४
३६. वालीवध ना खलनिर्दालन ... ... ११७
३७. असा हा एकच श्रीहनुमान् ... ... १२०
३८. हीच ती रामांची स्वामिनी ... ... १२३
३९. नको करूस वल्गना ... ... १२७
४०. मज सांग अवस्था दूता, रघुनाथांची ... ... १३०
४१. पेटवी लंका हनुमंत ... ... १३३
४२. सेतू बांधा रे सागरी ... ... १३६
४३. रघुवरा, बोलत कां नाही ? ... ... १३९
४४. सुग्रीवा हें साहस असलें ... ... १४२
४५. जा, झणि जा, रावणास सांग अंगदा ... ... १४५
४६. नभा भेदुनी नाद चालले ... ... १४८
४७. लंकेवर काळ कठिण आज पातला ... ... १५१
४८. आज का निष्फल होती बाण ? ... ... १५४
४९. भूवरी रावण-वध झाला ... ... १५७
५०. किति यत्नें मी पुन्हा पाहिली तूं ते ... ... १६१
५१. लोकसाक्ष शुद्धी झाली ... .. १६५

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५२. | त्रिवार जयजयकार, रामा | ... | ... | १६३ |
| ५३. | प्रभो, मज एकच वर द्यावा | ... | ... | १६६ |
| ५४. | डोहाळे पुरवा रघुकुलतिलका माझे | ... | ... | १६९ |
| ५५. | मज सांग लक्ष्मणा, जाउ कुठे ? | ... | ... | १७२ |
| ५६. | गा बाळांनो, श्रीरामायण | ... | ... | १७५ |

---

## चित्रसूची

१. अहल्योध्दार—उत्तरप्रदेशातील देवगड येथील शिल्प
२. सुवर्णमृगासाठी सीतेचा हट्ट—हंपी येथील हजार राम मंदिरातील शिल्प
३. अग्निदिव्य—मुगल शैली
४. राज्याभिषेक व स्वर्गातून पुष्पवृष्टी—माळवा शैली

# प्रस्तावना

वाल्मीकि महामुनि हे 'आदिकवि'. त्यांनी रचलेले रामायण हे 'महाकाव्य'. त्याचा नायक श्रीरामचंद्र हा 'मर्यादा पुरुषोत्तम'. त्याचा सेवक श्री हनुमान हा 'चिरंजीव' दासोत्तम. रामाचे राज्य 'आदर्श रामराज्य'. अशा प्रकारे श्रीरामकथा आमच्या भारताच्या दशदिशांमध्ये आज सहस्रों वर्षे दुमदुमून राहिली आहे. भारतीय संस्कृति रामरसांत सतत भिजत आलेली आहे. अशी रामकथा गाऊन आपली वाणी पवित्र करावी म्हणून अनेक कवींनी आणि नाटककारांनी आपली प्रतिभा सर्वस्वाने वेचली आहे. परिणामी रामसाहित्याचा हिमालयासारखा उत्तुंग संभार भारतीय साहित्यात डौलाने उभा राहिलेला आहे. रामकथांचे पाठ देणारे पुराणिक, रामकथा गाणारे कीर्तनकार, पिढ्यानपिढ्या भारतीय जनांच्या मनाची मशागत करीत आलेले आहेत. भारतातील सर्व भाषांत रामकथेचें गायन अहोरात्र चालू आहे.

श्री तुलसीदासांचे रामायण नित्य पठन करणारे नऊ-दहा कोटि लोक आहेत. ग्रियर्सन प्रभृति पाश्चात्य लेखकांचाहि तसाच अभिप्राय आहे. उत्तर भारतातील हिंदी पंडित आणि आधुनिक आचार्य तुलसीदासाच्या अध्ययन-मननांत गर्क आहेत. अतिदक्षिणेत तामिळनाडमधील कविचक्रवर्ती कंबन याचे रामायण तिकडे तसेच लोकप्रिय आहे. महाराष्ट्रात एकनाथ, कृष्णदास मुद्‌गल, श्रीसमर्थ आदि संतकवींनी मराठी जनतेस रामायण चाखविले आहे. मोरोपंतांना तर रामायणाने वेड लाविले होते. भिन्नभिन्न प्रकारांनी मोरोपंत रामायण गातच राहिले. आणि "श्रीरामायण गाइलें तरि पुन: गावेंचि ऐसें करी" अशी आळवणी त्यांनी केली आहे. अशी एकशे आठ रामायण मोरोपंतांनी रचलीं. निरनिराळ्या मराठी कवींच्या रामायणांतील वेचे घेऊन कै० वा० लक्ष्मणराव पांगारकर यांनी एक छोटेसे "कविरामायण" चयनरूपाने प्रसिद्ध केलें. डॉ० मराठे

यांचें एक सुबोध ओवीबद्ध "झोपाळ्यावरचें रामायण" उपलब्ध आहे. आणि परवाच्याच रामनवमीच्या सुमुहुर्तावर डॉ० कुलकर्णी यांचें 'प्रसाद रामायण' प्रसिद्ध झाले. रामस्तोत्रांना तर मिति नाही. नाटकें, चरित्रेंही मराठीत रचली गेली आहेत. एवढे होऊनही ना कवींची तृप्ति झाली, ना जनांचें समाधान झालें. रामकथा वाल्मीकीच्या काळाइतकीच आजही टवटवीत आणि सुगंधित राहिली आहे.

रामकथा तीच, पण गाणा-याचा दृष्टिकोन, धाटणी आणि कौशल्य भिन्नभिन्न होऊन रामायणाची शोभा आगळीच वाढत राहिली आहे. अशा रामकथेवर अलीकडे माणदेशाच्या मातीतून उदयास आलेले, अस्सल मराठी बाण्याचे कवि श्री० ग० दि० माडगूळकर यांनी आपल्या 'गीतरामायणा'चा कौस्तुभमणी महाराष्ट्रशारदेच्या कंठात बांधला आहे.

माडगूळकरांचें 'गीतरामायण' श्री. सुधीर फडके यांच्या सुस्वरकंठां-तून आकाशवाणीवरून बाहेर पडताच सा-या महाराष्ट्राने आपल्या 'सर्वेंद्रियांचे कान' केले. ते अजून तसेच लावलेले आहेत. माडगूळकरांच्या 'गीतरामायण' ने महाराष्ट्र कोंदून गेला आहे. ते त्यांचे अनुरूप शब्द, ती त्यांची सुश्लिष्ट रचना, त्या गीतांच्या मधुर चाली, त्यांतील प्रसंगानुकूल भावाविष्कार अशी सर्वांगसंपन्नता दृष्टीस पडताच, मी सहज बोलून गेलो की, माडगूळकर हे यथार्थाने 'आधुनिक वाल्मीकि' शोभतात. खरोखर आमचे माडगूळकर वरदी कवि आहेत, यात काडीचीही अतिशयोक्ति नाही. शंकर पार्वतीला गहन गुह्य तत्त्वज्ञान सांगत असता, ते आईच्या पोटात असलेल्या मच्छेंद्रनाथांनी ऐकिले. तद्वत् माडगूळकरांचेही झाले असावें. इतके ते रामकथेशी समरस झालेले आहेत. तथापि, ज्या आधुनिक काळांत माडगूळकर वावरत आहेत, त्या काळाची नाडीही त्यांना सापडलेली आहे. कथेचा भाग एकेका रामायणी व्यक्तीच्या तोंडून त्यांनी गीतरूपाने प्रकट केला आहे. आजच्या लगबगीच्या काळात, लाकांची सवड पाहून अवघ्या छप्पन गीतांत त्यांनी आपले

रामायण बांधलें आहे. गीते बांधताना कथाभागाचा विस्तार बाजूस ठेवून एक घटना घ्यावी आणि श्रुतिमनोहर एकदोन ओळींचा जडाव झळकत सोडून द्यावा आणि तोच आठदहा कडव्यांत मनोहर रीतीने फुलवावा असा की, वाचणा-याने किंवा ऐकणा-याने आपल्या तोंडातून एकदम वाहवाची दाद द्यावी, 'शाब्बास पठ्ठे' म्हणावे.

वाल्मीकींच्या रामायणांत करुण आणि वीर रसांचा उत्कर्ष आहे. रौद्र, भयानक, अद्भुतादि रसांचेही प्रसंग त्यात आहेत. सर्वच रामायण नितांत मधुर आहे. आणि गेय गीतांच्या द्वारे रामायणातील या गोडीचे आकंठ पान लोकांना करवावे, हाच माडगूळकरांच्या 'गीत रामायण'-चा प्रधान हेतु दिसतो. या उलट समर्थकाळी 'या ध्यानें बंदमोचने' असा रावणाच्या बंदीत पडलेल्या देवादिकांच्या मुक्तीचा हेतु लोकांच्या मनावर ठसविणे असा समर्थांचा प्रधान उद्देश दिसून येतो. 'गणेश गाढवें वळी' अशा प्रकारची आपत्ति सर्व देवांवर आली. असे बंदीत पडलेले देव सोडविणारा आदर्श राम रेखाटण्यात, जुलमी जोखडातून आपल्या बांधवांची सुटका व्हावी अशी रामदासांची तळमळ दिसून येते. माडगूळकरांचा हेतु त्यांच्या गीतांनी सफल झाला आहे. गीते ही गाण्यासाठी असल्यामुळे साहजिकच लोकांच्या कंठात बसतात. माडगूळकरांच्या गीतांना फडक्यांचा कंठ लाभला. त्यामुळे एका गोड संगमात डुंबत राहण्याचे सुख सहस्रावधि जनांना उपभोगण्यास मिळत आहे.

प्रस्तुतची सर्वच गीते मधुर आहेत. ती घोळून घोळून म्हणण्याचा मोह पडल्याशिवाय राहात नाही. तथापि काही गीतांना अशी चाल लागली आहे, आणि त्यांचा असा रंग उतरला आहे की, तो तो प्रसंग जणु डोळ्यांसमोर घडतो आहे अशी भावना बळावून श्रोत्यांची शरीरे तदनुकूल हालचाली करू लागतात. रामजन्माचे गीत पाहा : प्रजांना वाटणारा आनंद त्या गीतात ओसंडून जात आहे. 'मार ही त्राटिका' हे गीत ऐकून आताच त्राटिकेच्या अंगावर धावून जावेसे वाटते. गूहक

जेव्हा रामाला पार करण्यासाठी होडी वल्हवू लागतो आणि 'जय गंगे जय भागीरथी' चा घोष करतो त्या वेळी आपण गूहकाला खेटून होडीत बसलो आहो आणि होडीची वल्ही मारीत आहो, असा भास झाल्या-शिवाय राहात नाही. 'असा हा एकच श्रीहनुमान' या जांबुवानाच्या शब्दाबरोबर आपले हात नकळत टाळी वाजवितात. वानरगण 'सेतू बांधा रे सागरी' अशी गर्जना करतात तेव्हा आपणांलाही चेव येतो. 'मज सांग लक्ष्मणा जाउ कुठे ?' असा असहाय सीतेचा करुण प्रश्न ऐकून आपले डोळे पाणावू लागतात. अशा काही गीतांतून माडगूळकरांचे प्रतिभास्फुरण अतिशय प्रेरक झाले आहे.

गीत रामायण वाचून संपविले आणि घटकाभर मनात विचार केला; तेव्हा 'आदौ रामतपोवनादिगमनं····एतद्धि रामायणम्' हा श्लोक आठवला आणि रामाच्या वनाभिगमनापूर्वी घडलेला त्याचा जन्म आणि बाललीला यांची जोड दिल्यास आपोआपच माडगूळकरांनी गीतांना धरलेला क्रम बेमालूम जुळतो हे ध्यानात येऊन मनाला मोठी चमत्कृति वाटते.

गीत रामायणानंतर 'गीत कृष्णायन' 'गीत-दासायन' अशी परंपरा या आधुनिक वाल्मीकीपासून सुरू झाली हे लक्षात येते. म्हणून या परंपरेचे आदिकवि माडगूळकरच ठरतात. वाल्मीकींचे संस्कृत रामायण असो की माडगूळकरांचे गीत रामायण असो, माडगूळकरांच्या शब्दात सांगावयाचें तर, अभिप्राय एकच—'**काव्य नव्हे हा अमृतसंचय**'.

माडगूळकरांचे हे 'गीत रामायण' कसे जन्माला आले त्याची कथा कवि पद्मश्री बा० भ० बोरकर यांनी दहा वर्षांपूर्वी निघा-लेल्या गीत रामायणा'च्या पहिल्या आवृत्तीत कथन केली आहे. 'गीत रामायण'च्या चार आवृत्त्या होऊन गेल्या. आणि पहिल्या आवृत्तीनंतर बरोबर दहा वर्षांनी पाचव्या आवृत्तीचा पाळणा हालत आहे. या सुमुहूर्तावर 'गीत रामायणाचे' जातक वर्तविण्याकरिता मला

बोलावण केले. 'चिरंजीव' हनुमंताच्या नोंदून माडगूळकरांनीच हे वदविले आहे—

"जोवरि हे जग, जोवरि भाषण
तोवरि नूतन नित रामायण"

श्री हनुमज्जयंति, १८८९ —**दत्तो वामन पोतदार**
पुणें

## पारायणापूर्वी

कविश्रेष्ठ रवीन्द्रनाथांनी म्हटल्याप्रमाणे रामायण ही खरोखरच भारताच्या मौलिक भावभावनांची भागीरथी आहे, आणि तिच्याच पुण्यसलिलाने त्याच्या मनोभूमीची मशागत शतकानुशतकें अखंड होत राहिली आहे. रामायणांत गायले गेलेले राजधर्म, यतिधर्म, कुलधर्म आणि या सर्वांचे परस्पर संबंध नियत करणारे सर्व हृदयधर्म केळीच्या कोंभाप्रमाणें आसेतुहिमाचल सर्व भाषांतून आणि सर्व प्रदेशांतून मोठ्या कोडकौतुकानें लावलें, जोपासले गेले आहेत. त्यामुळेंच या विविध धर्मांचीं प्रतीकें होऊन राहिलेलीं रामायणांतील पात्रेहि आम्हां सर्व भारतीयांना घरच्या माणसांइतकींच किंबहुना त्यांच्यापेक्षाहि अधिक जवळचीं बनलीं आहेत. आणि त्यांच्या चालचलणुकीचा कित्ता गिरवीत आमच्या घर-कुलांतलीं माणसें कळत न कळत आपली सांस्कृतिक घडण घडवीत आलीं आहेत. साऱ्या भारतवर्षभर रामकथेची अवीट मोहिनी पडली आहे ती त्याचमुळें. ही एकच कथा कितीहि तऱ्हांनीं आणि कितीहि वेळां आळवली तरीहि त्याच्या प्रतिभेची तृप्ति अशी होतच नाहीं.

आपल्या मराठी मनाला तर या रामरसायनाचा ध्यासच आहे. या मराठीयेच्या क्षोणींत भोळ्या भाबड्या कुणबाऊ बाईपासून संत-पंतातील प्राज्ञविज्ञांपर्यंत साऱ्यांनीं ही एकच कथा नाना परींनी गायिली आहे, आणि त्याचमुळें उभ्या मराठी जीवनांत राम कांठोकांठ भरून राहिला आहे. दोन मराठी माणसें एकमेकांना भेटलीं तर 'राम राम' म्हणूनच परस्परांना अभिवादन करतात, जीवनांत 'रस' आहे असें म्हणण्याऐवजीं जीवनांत 'राम' आहे असेंच म्हणतात, आणि जीवनाला सद्गति मिळाली असें म्हणण्याचे झालें तरी देखील 'राम म्हटला' असाच शब्दप्रयोग करतात. मराठी जीवन हें असें राममय होण्यास आसुसलेलें आहे. उत्कृष्ट मराठी भक्तिगीतांचा संग्रह संकलित करण्याचें एखाद्यानें मनावर घेतलें तर रामावरल्या गीतांची संख्याच अधिक भरेल. सारांश, रामाची मूर्ति आणि रामाची कीर्ति हाच मराठी चित्ताचा आणि प्रतिभेचा ध्यास आहे.

धार्मिकतेला पाठमोऱ्या झालेल्या ह्या गलक्याच्या काळांत देखील मराठी लोकमानसाचा युगानुयुगांचा ध्यास यत्किंचित्‌हि कमी झालेला नाहीं याची जिवंत साक्ष या **'गी त रा मा य णा'** नें घवघवीतपणें देऊन चिकित्सक तर्कपंडितांनाहि चकित केलें आहे. आकाशवाणीच्या पुणें केन्द्रावरून या 'गी त रा मा य णा'चें पहिलें गीत सुरू झाल्यापासून ते आजतागायत याची लोकप्रियता कलेकलेनें सारखी वाढतच राहिली. कौतुकाच्या आणि अभिनंदनाच्या पत्रांचा श्रोत्यांनी नुसता पाऊस पाडला. आबालवृद्ध भाविकांनी आपापल्या रेडियो सेटपुढें धूपदीपादि लावून भक्तिभावाने त्याचें श्रवणसुख अनुभवलें. पोरा-थोरांच्या जिभेवर ही गीतें घरोघर नाचूं लागली. वृत्तपत्रांनीं नेमाने आणि आस्थेने ती सकौतुक छापलीं आणि श्रोत्यांच्या आग्रहामुळें आकाशवाणीच्या पुणें केंद्राला त्याचीं दोन पारायणें करण्याचें पुण्य प्राप्त झालें. खुद्द कवि, संगीत नियोजक आणि आकाशवाणीचे कार्यकर्ते या साऱ्यांनाच अनपेक्षित अशी ही सुखद घटना होती.

या 'गी त रा मा य णा' चा जेव्हां मी मागोवा घेतो तेव्हां मला म्हणावेसें वाटतें कीं, या भाग्यशाली देशांत ईश्वरच वारंवार अवतार घेतो असे नाहीं, तर त्याचें चरित्र देखील युगधर्माला अनुकूल असा अवतार घेत असतें. कविश्री माडगूळकर आणि पुणें केंद्राचे उत्साही आणि कल्पक कार्यकर्ते श्री. सीताकांत लाड सहज एका संध्याकाळीं भेटतात काय, बोलतां बोलतां सहज 'गीत रामायणा' ची कल्पना निघते काय, त्यांतलें स्वरसौंदर्य उलगडून दाखवायला श्री. सुधीर फडक्यांसारख्या पट्टीच्या संगीत-नियोजकाची जोड मिळते काय, कामें करणारीं आंतलीं बाहेरचीं सारी माणसें एकदिलानें आणि नेमानें सारें यथासांग पार पाडतात काय, आणि सगळा लहान-मोठा मराठी लोकसमुदाय त्याचें असें कोडकौतुक करतो काय, सारेंच विलक्षण ! तसें पाहिलें तर हीं सारींच माणसें 'श्रमसे'च्या तीरावरचीं, अष्टौप्रहर कावाडकष्टांत गुंतलेलीं. अशा महत्कार्याला अवश्य असलेली सवड कुणाच्याचपाशी नसलेली. वाल्मीकीचें आद्यरामायण आधीं लिहिलें गेलें, आणि मग

गायिलें गेलें. पण हें 'गीत रामायण' गात गातच जन्माला आलें, गात गातच वाढलें आणि गात गातच परिणामाला आलें. आठवडा उलटेपर्यंत पुढचें गीत जितकें लोकांना अनपेक्षित तितकेंच कविश्रींना देखील. त्यांना फक्त दोन तीन दिवस आधी जाग आलेली एवढेंच. म्हणूनच 'गी त रा मा य णा'च्या या साऱ्या जन्मकथेवरून मला पेहाणावेसें वाटतें कीं तें कुणी लिहिलेलें नाहीं. तें झालेलें आहे. आपला अवतार सिद्ध करण्यासाठीं युगधर्मानुकूल अशी सारी निवड त्यानें स्वतःच केली आहे. त्याला माहीत होतें कीं मराठी लोकमानसाला पुनः रामकथा हवी आहे, पण ती गीतांत हवी आहे. थोडक्यात हवी आहे, पण सचित्र हवी आहे. पुन्हां तीं गीतें अशीं हवींत कीं ज्यांत भावगीतें, तत्त्वगीतें, संघगीतें असे सर्व प्रकार असतील. साऱ्या रसांचा साक्षात परिचयहि घडेल आणि ते सगळे भक्तीच्या अतिरसांत एकरूप पावतील. म्हणूनच आम्हां सर्व कवींतून त्याने नेमका असाच कवि निवडला कीं ज्याला रामरसायनाची गोडी आईच्या दुधांतूनच मिळाली आहे, आर्तांच्या कणवेचा एकनाथांचा वारसा आणि त्यांचें सुबोध शब्दसौष्ठव जात्याच लाभलें आहे, लोकमानसाचा कानोसा घेण्याचा मनकवडेपणा आहे, चक्षुष्मतीं प्रतिभेचें देणें आहे आणि तिच्या जोडीला चित्रपटसृष्टींतल्या कलाकौशल्याचा अमाप अनुभव आहे.

जिवंताचें मोठेंपण सहजासहजीं मान्य न करणारा एखादा फाजील व्युत्पन्न टीकाकार खवचटपणें असेंहि म्हणेल, "यांत असें अपूर्व काय आहे ? सर्वपरिचित असलेल्या रामायणाची ही एक संक्षिप्त गीतावृत्ति आहे. त्याच्यासाठीं एवढें भाष्य कशाला ?" सकृतदर्शनीं हा कोटिक्रम बिनतोड वाटेल. पण या साऱ्या गीतांची गुंफण बारकाईनें पाहणाऱ्या रसिकाला चटकन पटेल कीं हें कार्य वाटतें तितकें सोपें नव्हे. ही केवळ उजळणी नाहीं, तर ही एक स्वतंत्र निर्मिति आहे.

आदिकवि वाल्मीकीनें आपल्या स्वतंत्र सौंदर्यदृष्टीनें विधात्याच्या सूक्ष्म आणि स्थूल सृष्टींतून नेमकें सौंदर्य टिपून काढून त्यांतून आपली
2 रामकथा रचली. त्याचप्रमाणें कविश्री माडगूळकरांनीं वाल्मीकीच्या

काव्यसृष्टींतलें वेंचीव सौंदर्य आपल्या स्वयंभू प्रतिभेनें बिनचूकपणें निवडलें आहे, आणि अवघ्या छप्पन गीतांत आपली सजीव आणि चलित् चित्रकथा तुमच्या-आमच्या समोर मूर्तिमंत केली आहे. आदिकवीनें निर्माण केलेलीं पात्रें आणि वातावरण यांना कविश्रींनीं कुठेंच धक्का लागू दिलेला नाही. एवढेंच नव्हे तर माता कौसल्या, बंधु भरत-लक्ष्मण, दासभक्त हनुमान, भोळीभाबडी शबरी, निष्ठावंत मित्र सुग्रीव आणि रावणाची कानउघाडणी करून देखील भ्रातृ-कर्तव्याला जागणारा कुंभकर्ण, यांच्या एकेका गीतांतून त्या त्या पात्राचें सारें व्यक्तिमत्त्व कवीनें साक्षात् आपल्यापुढें उभें केलें आहे. हें सामर्थ्य लहानसहान नव्हे. प्रभु रामचंद्राला नदीपार करतानाचें गुहकाचें गाणे किंवा सेतु बांधतानाचें वानरगणांचें गाणें ज्या वेळीं आपण ऐकतों त्या वेळीं त्यांचें सांघिक व्यक्तिमत्त्व जणू गीतांच्या तालांत आपल्या डोळ्यांपुढें उलगडत राहतें. भरत चित्रकूट पर्वताच्या दिशेनें येऊं लागतो त्या वेळीं तो युद्ध करायलाच येतो आहे अशा समजानें लक्ष्मण झाडावर चढून ज्या वेळीं त्या साऱ्या प्रसंगाचे वर्णन करतो, किंवा रावणानें सीतेला पळवल्यानंतर त्याच्यांत आणि जटायूंत घडून गेलेल्या समरप्रसंगाच्या खाणाखुणांचे राम ज्या वेळीं वर्णन करू लागतो, त्या वेळीं आपल्याला वाटतें कीं इथे शब्दाना सिनेकॅमेऱ्याची शक्ति आली आहे. सुन्दर कल्पना आणि अमर सुभाषितें हीं तर या 'गी त रा मा य णां'त ठायीं ठायीं विखुरलीं आहेत. कुठें ती मुळांतलीं आहेत तर कुठें कविश्रींनीं त्यांत तितक्याच तोलामोलाची भर टाकली आहे.

'गी त रा मा य णा' च्या या लोभनीय सृष्टींत विविध सौंदर्यें विखुरलीं आहेत. पण श्रोत्यांचें लक्ष सारखें सीता-रामांवर बांधून ठेवण्यास कवि विसरलेला नाहीं. त्या उभयतांचीं सारींच गीतें चटका लावणारीं झालीं आहेत. कुटी कशी बांधावी हें सांगतानाचा निसर्गरसज्ञ राम, सुमंताकरवीं प्रियजनांना आपले हृद्गत कळविणारा राम, भरताला माघारी लावतांना जीवनावर भाष्य करणारा तत्त्वचिंतक राम, रणांत उतावीळपणानें वागणाऱ्या सुग्रीवाला रणनीतीचा पाठ देणारा राम

युद्धांत जयिष्णु असूनहि युद्ध टाळण्यासाठीं शत्रूला संधीची संधि देणारा राजधर्मी राम, विजयानंतर सीतेची सत्त्वपरीक्षा पाहणारा कर्तव्यनिष्ठुर राम, आणि अग्निदेवाच्या साक्षीनंतर डोळ्यांत आंसवांची नदी गोठविणारा कृतार्थकाम राम, अशी प्रभु रामचंद्राचीं विविध दर्शनें घेतांना आपल्या भावभावनांचें जणू उदात्तीकरण होत रहातें. पुण्यशालिनी सीतेच्या तोंडीं मोजकींच गीतें आहेत. पण तेवढ्यांत झालेला भारतीय स्त्रीहृदयाचा आणि सतीधर्माचा आविष्कार अविस्मरणीयच आहे.

वस्तुतः माडगूळकरांचें हें 'गीत रामायण' प्रभु रामचंद्र सिंहासनस्थ झाल्यावर सुरनरांच्या जयजयकारांत संपतें; पण माडगूळकरांची प्रतिभा तें तिथें संपवीत नाहीं. या वैभवानंतर सीतामाईला वनाचे डोहाळे लागतात. रामसीतेच्या जीवनांत उदात्ततम संयोगाची योजना करण्यासाठीं करुण आणि उदात्त हे रस वियोगाची मांडामाड करतात. रामायण संपतें; पण सीतेचें दुःख संपत नाहीं. छंद आणि स्वर विराम पावले तरी तिचें तें न सरणारें दुःख आपल्या अंतःकरणांत रेंगाळतच रहातें यथाकाल याच रामायणाने पुन्हां नवा अवतार घ्यावा म्हणूनच तर त्यांच्या हातून हें घडलें नसेल ? एवढें मात्र खास की तोंपर्यंत आणि त्यानंतर देखील यांतील कांही गीतें रामायणासारखींच चिरंजीव होऊन रहातील, आणि त्याबरोबरच माडगूळकरांचें—माझ्या बंधुतुल्य मित्राचें—नांव देखील.

मराठी वाचक या व आगामी आकाशवाणी प्रकाशनांचें स्वागत करतील अशी आशा आहे.

१५ मार्च, १९५७ — बा. भ. बोरकर

आकाशवाणी, पुणें

कै पु. मं. लाड यांस :

गेलां जी वैकुंठीं — होउनी निःसंग<br>
ठेवूनी अभंग — स्मृति मागे<br>
स्मृतीस आपुल्या — प्राज्ञ भागवता<br>
अर्पिली ही कथा — राघवाची

—ग. दि. माडगूळकर

# १

श्रीरामचंद्रांच्या अश्वमेध यज्ञासाठीं अयोध्येंत माणसांचा महासागर जमला होता. तापस वेष धारण केलेले दोन बटु मंडपांत आले. ते म्हणाले, "आम्ही महर्षि वाल्मीकींचे शिष्य आहोंत. आम्ही रामचरित्रगायन करतों." श्रीरामांना माहीत नव्हतें की आपल्यासमोर आपल्या चरित्राचें गायन करणारे हे बटु आपलेच पुत्र आहेत.

निवेदक :

स्वयें श्रीरामप्रभु ऐकती
कुश लव रामायण गाती

कुमार दोघे एक वयाचे
सजीव पुतळे रघुरायाचे
पुत्र सांगती चरित पित्याचे
ज्योतिनें तेजाची आरती १

राजस मुद्रा, वेष मुनींचे
गंधर्वच ते तपोवनींचे
वाल्मीकींच्या भाव मनींचे
मानवी रूपें आकारती २

ते प्रतिभेच्या आम्रवनांतिल
वसंत—वैभव—गाते कोकिल
बालस्वरांनी करुनी किलबिल
गायनें ऋतुराजा भारिती ३

फुलांपरी ते ओठ उमलती
सुगंधसे स्वर भुवनीं झुलती
कर्णभूषणें कुंडल डुलती
संगती वीणा झंकारिती ४

सात स्वरांच्या स्वर्गामधुनी
नऊ रसांच्या नऊ स्वधुनी
यज्ञ-मंडपीं आल्या उतरुनी
संगमीं श्रोतेजन नाहती ५

पुरुषार्थांची चारी चौकट
त्यांत पाहतां निजजीवनपट
प्रत्यक्षाहुनि प्रतिमा उत्कट
प्रभुचे लोचन पाणावती ६

सामवेदसे बाळ बोलती
सर्गामागुन सर्ग चालती
सचीव, मुनिजन, स्त्रिया डोलती
आंसवें गालीं ओघळती ७

सोडुनि आसन उठले राघव
उठुन कवळिती अपुले शैशव
पुत्रभेटिचा घडे महोत्सव
परी तो उभयां नच माहिती ८

# २

श्रीरामांच्या यज्ञमंडपांत, प्राणांच्या सर्व शक्ति कर्णांच्या ठायीं एकवटून, श्रोतेजन ऐकत आहेत. सुवर्ण-सिंहासनावर बसून प्रत्यक्ष श्रीराम ऐकत आहेत. तापस वेष परिधान केलेले राजपुत्र कुश आणि लव रामचरित्राचें गायन करीत आहेत.

कुश आणि लव :

सरयू-तीरावरी
अयोध्या मनुर्निमित नगरी

त्या नगरीच्या विशालतेवर
उभ्या राहिल्या वास्तू सुंदर
मधुन वाहती मार्ग समांतर
रथ, वाजी, गज, पथिक चालती, नटुनी त्यांच्यावरी १

घराघरावर रत्नतोरणें
अवती भंवती रम्य उपवनें
त्यांत रंगती नृत्य गायनें
मृदंग वीणा नित्य नादती, अलका नगरीपरी २

स्त्रिया पतिव्रता, पुरुषहि धार्मिक
पुत्र उपजती निजकुल-दीपक
नृशंस ना कुणि, कुणि ना नास्तिक
अतृप्तीचा कुठें न वावर, नगरिं, घरीं, अंतरीं ३

इक्ष्वाकू-कुल-कीर्ती-भूषण
राजा दशरथ धर्मपरायण
त्या नगरीचें करितो रक्षण
गृहीं चंद्रसा, नगिर इंद्रसा, सूर्य जसा संगरी ४

दशरथास त्या तीघी भार्या
सुवंशजा त्या सुमुखी आर्या
सिद्ध पतीच्या सेवाकार्या
बहुश्रुता त्या रूपशालिनी, अतुलप्रभा सुंदरी ५

तिघी स्त्रियांच्या प्रीतिसंगमीं
तिन्ही लोकिचें सुख ये धामीं
एक उणें पण गृहस्थाश्रमीं
पुत्रोदय पण अजुनी नव्हता, प्रीतीच्या अंबरीं ६

शल्य एक तें कौसल्येसी
दिसे सुमित्रा सदा उदासी
कैक कैकयी करि नवसासी
दशरथासही व्यथा एक ती, छळिते अभ्यंतरीं ७

राजसौख्य तें सौख्य जनांचें
एकच चिंतन लक्ष मनांचें
काय काज या सौख्य-धनाचें ?
कल्पतरूला फूल नसे कां ? वसंत सरला तरी ८

# ३

## "कल्पतरूला फूल नसे कां ? वसंत सरला तरी"

प्रजाजनांना सर्व सुखांनीं न्हाऊं घालणाऱ्या दशरथाच्या घरांत पाळणा हलूं नये, हा केवढा दैवदुर्विलास ? अयोध्येच्या प्रत्येक जाणत्या प्रजाजनाच्या मनांत हा प्रश्न वारंवार उठत होता. मग दशरथाच्या राण्यांची काय अवस्था असेल ? कौसल्या वरून ग्रीष्मकालीन नदीसारखी थोडी अशक्त, तरीहि शांतच होती. पण मनांत ती काय म्हणत होती ?

कौसल्या :

उगा कां काळिज माझें उले ?
पाहुनी वेलीवरची फुलें

कधीं नव्हे तें मळलें अंतर
कधीं न शिवला सवतीमत्सर
आज कां लतिकावैभव सले ? १

काय मना हें भलतें धाडस ?
तुला नावडे हरिणी-पाडस
पापणी वृथा भिजे कां जलें ? २

गोवत्सांतिल पाहुन भावां
काय वाटतो तुजसी हेवा ?
चिडे कां मौन तरी आंतलें ? ३

कुणी पक्षिणी पिलां भरविते
दृश्य तुला तें व्याकुळ करितें
काय हें विपरित रे जाहलें ? ४

स्वत:स्वत:शीं कशास चोरी ?
वात्सल्याविण अपूर्ण नारी
कळालें सार्थक जन्मांतलें ५

मूर्त जन्मते पाषाणांतुन
कौसल्या का हीन शिळेहुन ?
विचारें मस्तक या व्यापिलें ६

गगन अम्हांहुनि वृद्ध नाहि का ?
त्यांत जन्मती किती तारका !
अकारण जीवन हें वाटलें ७

## ४

"उगा कां काळिज माझें उले ? पाहुनी वेलीवरचीं फुलें"

—महाराणी कौसल्या अशा चमत्कारिक मन:स्थितींत असतांनाच, महाराज दशरथ अंत:पुरांत आले. आपल्या लाडक्या राणीला ते सांगू लागले—

राजा दशरथ :

उदास कां तूं ? आवर वेडे, नयनांतिल पाणी
लाडके, कौसल्ये राणी

वसंत आला, तरूतरूवर आली नव पालवी
मनांत माझ्या उमलुन आली तशीच आशा नवी
कानीं माझ्या घुमूं लागली सादाविण वाणी १

ती वाणी मज म्हणे, "दशरथा, अश्वमेध तूं करी
चार बोबडे वेद रांगतिल तुझ्या धर्मरत घरीं."
विचार माझा मला जागवी, आलें हें ध्यानीं २

निमंत्रिला मी सुमंत मंत्री आज्ञा त्याला दिली—
"वसिष्ठ, काश्यप, जाबालींना घेउन ये या स्थलीं.
इष्ट काय तें मला सांगतिल गुरुजन ते ज्ञानी" ३

आले गुरुजन, मनांतलें मी सारें त्यां कथिलें
मीच माझिया मनास त्यांच्या साक्षीनें मथिलें
नवनीतासम तोंच बोलले स्निग्धमधुर कोणी ४

"तुझे मनोरथ पूर्ण व्हायचे", मनोदेवता वदे,
"याच मुहूर्तो सोड अश्व तूं, सत्वर तो जाउं दे"
"मान्य"—म्हणालों—"गुर्वाज्ञा" मी, कर जुळले दोन्ही ५

अंग देशिचा ऋष्यशृंग मी घेउन येतों स्वतः
त्याच्या करवीं करणें आहे इष्टीसह सांगता
धूमासह ही भारुन जावो नगरी मंत्रांनीं ६

सरयूतीरीं यज्ञ करूं गे, मुक्त करांनीं दान करूं
शेवटचा हा यत्न करूं गे, अंतीं अवभृत स्नान करूं
ईप्सित तें तो देइल अग्नी, अनंत हातांनीं ७

## ५

"ईप्सित तें तो देइल अग्नी अनंत हातांनीं"

—या इच्छेनें दशरथानें यज्ञाश्व सोडला. पुढें एका संवत्सरानंतर तो यज्ञीय अश्व परत आला. राजा दशरथाच्या विनंतीनुसार ऋष्यश्रृंगानें यज्ञ मांडला. एका शुभवेळीं यज्ञीय ज्वालेंतून एक रक्तवर्ण महापुरुष प्रकट झाला, आणि दुंदुभी-सारख्या कणखर पण मधुर सादानें तो राजा दशरथाला म्हणाला—

यज्ञपुरुष :

दशरथा, घे हें पायसदान
तुझ्या यज्ञिं मी प्रगट जाहलों हा माझा सन्मान

तव यज्ञाची होय सांगता
तृप्त जाहल्या सर्व देवता
प्रसन्न झाले नृपा तुझ्यावर, श्रीविष्णू भगवान् १

श्रीविष्णूंची आज्ञा म्हणुनी
आलों मी हा प्रसाद घेउनि
या दानासी या दानाहुन अन्य नसे उपमान २

करांत घे ही सुवर्णस्थाली
दे राण्यांना क्षीर आंतली
कामधेनुच्या दुग्धाहुनही, ओज हिचें बलवान् ३

राण्या करितिल पायसभक्षण
उदरीं होइल वंशारोपण
त्यांच्या पोटीं जन्मा येतिल, योद्धे चार महान् ४

प्रसवतील त्या तीनहि देवी
श्रीविष्णूंचे अंश मानवी
धन्य दशरथा, तुला लाभला, देवपित्याचा मान ५

कृतार्थ दिसती तुझीं लोचनें
कृतार्थ मीही तुझ्या दर्शनें
दे आज्ञा मज नृपा, पावतो यज्ञीं अंतर्धान ६

# ६

"त्यांच्या पोटीं जन्मा येतिल योद्धे चार महान्"

—हें यज्ञपुरुषाचें वचन खरें ठरलें. त्या पायसाच्या सेवनानें दशरथाच्या तिन्ही राण्या गर्भवती झाल्या. यथाकालीं त्या प्रसूत झाल्या. कौसल्येला श्रीराम, सुमित्रेला लक्ष्मण आणि शत्रुघ्न, कैकयीला भरत, असे चार पुत्र झाले. राजाची इच्छा पूर्ण झाली. प्रासादांतील सुखाला सीमा राहिल्या नाहींत. नगरजनांचा आनंद तर नुसता भरून ओसंडत होता. श्रीरामादिक भावंडें रांगूं लागलीं, तरीहि अयोध्येंतील स्त्रिया श्रीरामजन्माचें आनंदगीतच गात होत्या. पुनः पुनः गात होत्या....

अयोध्यावासी स्त्रिया :

चैत्रमास, त्यांत शुद्ध नवमि ही तिथी
गंधयुक्त तरिहि वात उष्ण हे किती !

दोन प्रहरिं कां ग शिरीं सूर्य थांबला ?
राम जन्मला ग सखी राम जन्मला १

कौसल्याराणि हळू उघडि लोचनें
दिपुन जाय माय स्वतः पुत्र-दर्शनें
ओघळले आंसु, सुखें कंठ दाटला २

राजगृहीं येइ नवी सौख्य-पर्वणी
पान्हावुन हंबरल्या धेनु अंगणीं
दुंदुभिचा नाद तोंच धुंद कोंदला ३

पेंगुळल्या आत्तपांत जागल्या कळ्या
'काय काय' करित पुन्हां उमलल्या खुळ्या
उच्चरवें वायु त्यांस हंसुन बोलला ४

वार्ता ही सुखद जधीं पोंचली जनीं
गेहांतुन राजपथीं धावले कुणी
युवतींचा संघ एक गात चालला ५

पुष्पांजलि फेंकि कुणी, कोणि भूषणें
हास्यानें लोपविले शब्द, भाषणें
वाद्यांचा ताल मात्र जलद वाढला ६

वीणारव नूपुरांत पार लोपले
कर्ण्यांचे कंठ त्यांत अधिक तापले
बावरल्या आम्रशिरीं मूक कोकिला ७

दिग्गजही हलुन जरा चित्र पाहतो
गगनांतुन आज नवे रंग पोहती
मोत्यांचा चूर नभीं भरुन राहिला ८

बुडुनि जाय नगर सर्व नृत्यगायनीं
सूर, रंग, ताल यांत मग्न मेदिनी
डोलतसे तोहि, जरा, शेष डोलला ९

# ७

"राम जन्मला ग सखी राम जन्मला"

या आनंदगीतांतच अयोध्या मग्न होती. प्रासादांत श्रीराम दिसामासांनी वाढत होते. ते आतां चालूं लागले होते. बोबडे बोबडे बोलूं लागले होते. महाराणी कौसल्या भगिनी-समान असलेल्या आपल्या सवतींना कौतुकाने सांगत होतीं—

कौसल्या :

सांवळा ग रामचंद्र माझ्या मांडीवर न्हातो
अष्टगंधांचा सुवास निळ्या कमळांना येतो १

सांवळा ग रामचंद्र माझ्या हातांनीं जेवतो
उरलेल्या घासासाठीं थवा राघूंचा थांबतो २

सांवळा ग रामचंद्र रत्नमंचकीं झोपतो
त्याला पाहतां लाजून चंद्र आभाळीं लोपतो ३

सांवळा ग रामचंद्र चार भावांत खेळतो
हीरकांच्या मेळाव्यांत नीलमणी उजळतो ४

सांवळा ग रामचंद्र करी भावंडांसी प्रीत
थोरथोरांनीं शिकावी बाळाची या बाळरीत ५

सांवळा ग रामचंद्र त्याचे अनुज हे तीन
माझ्या भाग्याच्या श्लोकाचे चार अखंड चरण ६

सांवळा ग रामचंद्र करी बोबडे भाषण
त्याशी करितां संवाद झालों बोबडे आपण ७

सांवळा ग रामचंद्र करी बोबडे हें घर
वेद म्हणतां विप्रांचे येती बोबडे उच्चार ८

सांवळा ग रामचंद्र चंद्र नभींचा मागतो
रात जागवितो बाई सारा प्रासाद जागतो ९

सांवळा ग रामचंद्र उद्यां होईल तरुण
मग पुरता वर्षेल देवकृपेचा वरुण १०

## ८

### 'सांवळा ग रामचंद्र—'

—महाराणी कौसल्येचा 'सांवळा रामचंद्र' दिसामासांनीं वाढला. बालवयांतच त्यानें धनुर्विद्या आत्मसात केली. धार्मिक ग्रंथ अभ्यासिले. आतां तो राजसभेंत येऊन बसूं लागला. त्याच्या समवेत त्याचीं लक्ष्मणादि लहान भावंडेहि निष्णात झालीं. एके प्रसंगीं, राजा दशरथ पुत्रांसहवर्तमान राजसभेंत बसला असतां महर्षि विश्वामित्र तेथें आले. राजानें त्यांचें आनंदानें स्वागत केलें, आणि नम्रपणें विचारलें, "मुनिवर्य, काय कार्य असेल तें सांगा, मी तें सर्वस्वी शेवटास नेईन." राजाच्या ह्या भाषणानें अत्यंत हर्षित होऊन विश्वामित्र म्हणाले—

विश्वामित्र :

ज्येष्ठ तुझा पुत्र मला देइ दशरथा
यज्ञ-रक्षणास योग्य तोचि सर्वथा

मायावी रात्रिंचर
कष्टविती मजसि फार
कंकवार करुन यज्ञ नाहि सांगता १

शाप कसा देऊं मी ?
दीक्षित तो नित्य क्षमी
सोडतोंच तो प्रदेश याग मोडतां २

आरंभितां फिरुन यज्ञ
आणिति ते फिरुन विघ्न
प्रकटतात मंडपांत कुंड पेटतां ३

वेदीवर रक्तमांस
फेंकतात तें नृशंस
नाचतात स्वैर सुखें मंत्र थांबतां ४

बालवीर राम तुझा
देवो त्यां घोर सजा
सान जरी बाळ तुझा थोर योग्यता ५

शंकित कां होसि नृपा ?
मुनि मागे राजकृपा
बावरसी काय असा शब्द पाळतां ? ६

प्राणांहुन वचनिं प्रीत
रघुवंशी हीच रीत
दाखवि बघ राम स्वतः पूर्ण सिद्धता ७

कौसल्ये, रडसि काय ?
भीरु कशी वीरमाय ?
उभय वंश धन्य रणीं पुत्र रंगतां ८

मारिच तो, तो सुबाहु
राक्षस ते दीर्घबाहु
ठेवितील शस्त्र पुढें राम पाहतां ९

श्रीरामा, तूंच मान
घेइ तुझे चापबाण
येतो तर येऊं दे अनुज मागुता १०

# १

"ज्येष्ठ तुझा पुत्र मला देइ दशरथा"—

ही महर्षि विश्वामित्रांची मागणी दशरथ महाराजांना नाकारतां आली नाहीं. हातीं धनुष्य आणि पाठीं भाता घेऊन राम-लक्ष्मण सज्ज झाले. मोठ्या भावाबरोबर धाकटाहि निघाला. कौसल्या मातु:श्रींनीं कर्तव्यासाठीं ममतेला बांध घातला. राजकुमारांना "विजयी भव" असा आशीर्वाद दिला. महाराज दशरथांनींहि उभय कुमारांचें मस्तकावघ्राण केले. महर्षि विश्वामित्रांसारख्या ज्ञानी नेत्याबरोबर राम-लक्ष्मण प्रथमपराक्रमासाठीं प्रासादाबाहेर पडले. प्रवासांत गुरुदेव विश्वामित्र त्या दोघां कुमारांना अनेक कथा सांगत होते, ज्ञानदान करीत होते. जातां जातां ते तिघे मलद-करुष देशाच्या परिसरांत आले.

एकाएकीं वीज कोसळल्यासारखा भीषण शब्द उमटला. एक महाभयंकर राक्षसी त्यांच्या मार्गांत आडवी झाली. संतप्त महर्षि विश्वामित्रांनीं श्रीरामाला आज्ञा केली—

विश्वामित्र :

जोड झणि कार्मुका
सोड रे सायका
मार ही ताटिका

रामचंद्रा !

दुष्ट मायाविनी
शापिता यक्षिणी
वर्तनीं दर्शनीं

ही अभद्रा

तप्त आरक्त हीं पाहतां लोचनें
करपल्या वल्लरी, करपलीं काननें
अतुलबलगर्विता
मूर्त ही क्रूरता
ये घृणा पाहतां

क्रूर मुद्रा १

ऐक तें हास्य तूं, दंत, दाढा पहा
भरुन हस्ती जणूं, भरुन गेली गुहा
मृत्यु-छाया जशी
येतसे ही तशी
ओढ दोरी कशी

मोड तंद्रा २

थबकसी कां असा ? हाण रे बाण तो
तूंच मृत्यू हिचा, मी मनीं जाणतो
जो जनां सुखवितो
नारीवध क्षम्य तो
धर्म तुज सांगतो

मानवेंद्रा ! ३

दैत्यकन्या पुरा, ग्रासुं पाहे धरा
देव देवेंद्रही, मारि तें मंथरा
विष्णु धर्मोदधी
शुक्रमाता वधी
स्त्री जरी पारधी

अरि मृगेंद्रा ४

धांवली लाव घे, कोप अति पावली
धाड नरकीं तिला, चालल्या पावलीं
बघती तव विक्रमां
देव पुरुषोत्तमा
होऊं दे पौर्णिमा

शौर्यचंद्रा ५

# १०

## "मार ही ताटिका रामचंद्रा"—

विश्वामित्रांच्या आज्ञेप्रमाणें श्रीरामांनीं ताटिका राक्षसीचा वध केला त्या वेळीं देवगंधर्वांनीं आकाशांतून पुष्पवृष्टि केली. श्रीराम, लक्ष्मणासह विश्वामित्र महर्षींच्या सिद्धाश्रमीं आले. यज्ञांत विघ्न आणणाऱ्या मारिच राक्षसास श्रीरामांनीं मानवास्त्र सोडून समुद्रांत बुडवून दिलें. आग्नेय अस्त्रानें सुबाहूचा वध केला. विश्वामित्रांचा यज्ञ यथासांग पार पडला.

याच वेळीं मिथिलाधिपति जनक राजाकडे मोठा यज्ञ होणार होता. सर्वच आश्रमीय मुनिजन त्या यज्ञास जाणार होते. राम-लक्ष्मणांनींहि बरोबर यावें म्हणून ते आग्रह करूं लागले.

एक आश्रमीय :

चला राघवा चला
पहाया जनकाची मिथिला

मिथिलेहुनिही दर्शनीय नृप
राजर्षी तो जनक नराधिप
नराधिपें त्या नगरीमाजीं यज्ञ नवा मांडिला १

यज्ञमंडपी सुनाभ कार्मुक
ज्यास पेलता झाला त्र्यंबक
त्र्यंबक देवे त्याच धनूनें त्रिपुरासुर मारिला २

शिवधनुतें त्या सदनीं ठेवुन
जनक तयाचें करितो पूजन
पूजनीय त्या विशाल धनुला जगांत नाहीं तुला ३

देशदेशिचे नृपती येउन
स्तिमित जाहले धनुष्य पाहुन
पाहतांच तें उचलायाचा मोह तयां जाहला ४

देव, दैत्य वा सुर, नर, किन्नर
उचलुं न शकले त्यास तसूभर
तसूभरी ना सरलपणा त्या चापाचा वांकला ५

कोण वांकवुन त्याला ओढिल ?
प्रत्यंचा त्या धनूस जोडिल ?
सोडिल त्यांतुन बाण असा तर कोणी ना जन्मला ६

उपजत योद्धे तुम्ही धनुर्धर
निजनयनीं तें धनू पहा तर
बघा राघवा, सौमित्री तर औत्सुक्यें दाटला ७

उत्साहानें निघती मुनिजन
चला संगतीं दोघे आपण
आपण होतां सहप्रवासी भाग्यतरू ये फला ८

# ११

**"चला राघवा चला, पहाया जनकाची मिथिला"**

—हा मुनिजनांचा आग्रह श्रीरामांना मोडवला नाहीं. लक्ष्मणा-सह ते मुनिजनांबरोबर मिथिलेला निघाले. जातांना महर्षि विश्वामित्रांनीं त्यांना अनेक कथा सांगितल्या. मार्गांत ते एका ओसाड आश्रमाशीं आले. "हा आश्रम ओसाड का ?" असें श्रीरामचंद्रांनी विचारतांच, मुनिवर्य विश्वामित्रांनीं अहल्येची कथा सांगितली, आणि चरणस्पर्शानें तिचा उद्धार करण्याची आज्ञा केली.

श्रीरामांच्या चरणस्पर्शानें, शिलासदृश पडलेल्या अहल्येच्या देहांतून प्रकाश फांकला, मंजुळ स्वर उमटले—

अहल्या :

रामा, चरण तुझे लागले
आज मी शापमुक्त जाहलें

तुझ्या कृपेची शिल्प-सत्कृति
माझी मज ये पुन्हां आकृति
मुक्त जाहले श्वास चुंबिती पावन हीं पाउलें  १

पुन्हां लोचनां लाभे दृष्टि
दिसशी मज तूं, तुझ्यांत सृष्टि
गोठगोठले अश्रू तापुन गालांवर वाहिले  २

श्रवणांना ये पुनरपि शक्ति
मनां उमगली अमोल उक्ति
"ऊठ अहल्ये"—असें कुणीसें करुणावच बोललें  ३

पुलकित झालें शरिर ओणवें
तुझ्या पदांचा स्पर्श जाणवें
चरणधुळीचे कुंकुम माझ्या भाळासी लागलें  ४

मौनालागी स्फुरलें भाषण
श्रीरामा, तूं पतीतपावन
तुझ्या दयेनें आज हलाहल अमृतांत नाहलें  ५

पतितपावना श्रीरघुराजा !
काय वांधुं मी तुमची पूजा
पुनर्जात हें जीवन अवघें पायांवर वाहिलें  ६

4


# १२

## "आज मी शापमुक्त जाहलें"

—सती अहल्येनें या उद्गारांनी कृतज्ञता व्यक्त केल्यावर, श्रीरामांनीं गौतमाश्रमांत थोडी विश्रांति घेतली, आणि मुनिजनांसह ते परत मार्गस्थ झाले. जनकाच्या मिथिला नगरींत पोंचतांच जनकानें अतिशय आनंदानें त्यांचें स्वागत केलें. मुनिजनांसह असलेले दोघे कुमार हे अयोध्यापति दशरथाचे पुत्र आहेत हें कळतांच राजर्षि जनकाच्या आनंदाला सीमा राहिली नाही. दशरथाचे हे परमप्रतापी पुत्र तुझ्याकडे असलेले विशाल शिवधनुष्य पाहाण्यासाठीं आले आहेत, असेहि विश्वामित्रानें जनकाला सांगितले.

सहस्रावधि राजे प्रत्यक्ष पाहत असतां, मल्लांकरवीं तें धनुष्य जनकानें दरबारांत आणविलें. राम-लक्ष्मणांनीं त्या थोर धनुष्याला नम्रपणें प्रणाम केला. श्रीरामांनीं तें धनुष्य उचलण्याची अनुज्ञा मागितली. जनकानें "अवश्य" म्हटलें. श्रीरामांनीं तें धनुष्य लीलया उचललें. प्रत्यंचा लावण्यासाठीं महाबाहु श्रीराम तें धनुष्य वांकवूं लागले, तों वीज कडाडल्या-सारखा प्रचंड नाद झाला. तें धनुष्य मधोमध भंग पावलें. तें लोकविलक्षण दृश्य पाहून जनकाला अत्यानंद झाला. आपली पाळलेली पुत्री, वीर्यशुल्का सीता त्या महावीराला देण्याचा निश्चय जनकानें बोलून दाखविला. विश्वामित्रांनीं तें मान्य केलें.

यथाकालीं श्रीरामाचा भूमिकन्या सीतेशीं विवाह झाला. आपल्या भ्रातृकन्या, अनुक्रमें ऊर्मिला, मांडवी आणि श्रुतकीर्ति, याहि जनकानें लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न यांना दिल्या. अवर्णनीय समारंभ झाला. प्रथमपराक्रमासाठीं प्रासादाबाहेर पडलेले राम-लक्ष्मण आपल्या नववधूंसह अयोध्येला परत आले. ते जाऊन महिने लोटले तरी मिथिलेचे भाटचारण सीता-स्वयंवराचें गीतच पुन्हां पुन्हां आळवीत होते.



आकाशाशीं जडले नाते धरणीमातेचे, स्वयंवर झाले सीतेचे

भाटचारण

आकाशाशीं जडलें नातें धरणीमातेचें
स्वयंवर झालें सीतेचे

श्रीरामांनी सहज उचलिलें धनू शंकराचें
पूर्ण जाहले जनकनृपाच्या हेतु अंतरींचे
उभे ठाकलें भाग्य सांवळें समोर दुहितेचें १

मुग्ध जानकी दुरुन न्याहळी राम धनुर्धारी
नयनांमाजीं एकवटुनिया निजशक्ती सारी
फुलूं लागलें फूल हळुं हळू गालीं लज्जेचें २

उंचावुनिया जरा पापण्या पाहत ती राही
तडिताघातापरी भयंकर नाद तोंच होई
श्रीरामांनीं केले तुकडे दोन धनुष्याचे ३

अंधारुनिया आले डोळे, बावरले राजे
मुक्त हासतां भूमीकन्या मनोमनीं लाजे
तृप्त जाहले सचित लोचन क्षणांत जनकाचे ४

हात जोडुनी म्हणे नृपति तो विश्वामित्रासी
"आज जानकी अर्पियली मी दशरथ-पुत्रासी'
आनंदाने मिटले डोळे तृप्त मैथिलीचे ५

पित्राज्ञेनें उठे हळूं ती मंत्रमुग्ध बाला
अधिर चाल ती, अधिर तीहुनी हातींची माला
गौरवर्ण ते चरण गांठती मंदिर सौख्याचें ६

नीलाकाशीं जशी भरावी उषःप्रभा लाल
तसेंच भरले रामांगीं मधु नूपुरस्वरताल
सभामंडपीं मीलन झालें माया-ब्रह्माचें ७

झुकले थोडे राम, जानकी घाली वरमाला
गगनामाजीं देव करांनी करिती करताला
त्यांच्या कानीं गजर पोंचले मंगल वाद्यांचें ८

अंश विष्णुचा राम, धरेची दुहिता ती सीता
गंधर्वांचे सूर लागले जयगीता गातां
आकाशाशीं जडलें नातें ऐसे धरणीचें ९

# १३

## "स्वयंवर झालें सीतेचें"

नंतर कैलास शिखराप्रमाणें उत्तुंग आणि हिमधवल असलेल्या आपल्या प्रासादांत श्रीराम गृहस्थाश्रमींची सौख्यें भोगूं लागले. अत्यंत सुस्वरूप, ज्ञानी, महापराक्रमी, एकवचनी आणि तरीहि शालीन असलेले श्रीराम प्रजाजनांना अत्यंत प्रिय होऊन राहिले. श्रीरामांची एकंदर वागणूक पाहून वृद्ध दशरथ राजाला आनंदाचें भरतें येत होतें. एकदां सहज महाराज दशरथाच्या मनांत आलें, "हें राज्य आतां श्रीरामांच्या स्वाधीन करावें आणि आपण विश्रांतिसुखाचा लाभ घ्यावा." त्यांनीं आपला हा विचार गुरुजन, मंत्री आणि कैकयीजनकादिक स्वकीयांच्या कानीं घातला. त्या सर्वांनीं या विचाराला होकार दिला. प्रजाजन तर आनंदानें वेडे झाले. दशरथांनीं प्रसिद्ध करून टाकलें, "चैत्रमासीं पुष्य नक्षत्रावर श्रीराम सिंहासनस्थ होणार."

ऊर्मिलादिक भगिनी सीतेच्या मंदिरांत जाऊन आनंद-मिश्रित विनोदानें तिला म्हणूं लागल्या—

ऊर्मिला, मांडवी, श्रुतकीर्ति :

आनंद सांगूं किती सखे ग आनंद सांगूं किती
सीतावल्लभ उद्यां व्हायचे राम-अयोध्यापति

सिंहासनिं श्रीराघव बसतां
वामांगीं तूं बसशिल सीता
जरा गर्विता, जरा लज्जिता
राजभूषणां भूषवील हो, कमनिय तव आकृति १

गुरुजन मुनिजन समीप येतिल
सप्त नद्यांचीं जलें शिंपतिल
उभय कुळें मग कृतार्थ होतिल
मेघाहुनिही उच्चरवांनीं, झडतिल गे नौबती २

भर्त्यासम तुज जनीं मान्यता
राज्ञीपद गे तुला लाभतां
पुत्राविण तूं होशिल माता
अखिल प्रजेच्या मातृपदाची, तुज करणें स्वीकृति ३

तुझ्याच अंकित होइल धरणी
कन्या होइल मातृस्वामिनी
भाग्य भोगिलें असलें कोणीं ?
फळाफुलांनी बहरुनि राहिल, सदा माउली क्षिति ४

पतीतपावन रामासंगें
पतितपावना तूंही सुभगे
पृथ्वीवर या स्वर्गसौख्य घे
तिन्ही लोकीं भरुन राहुं दे, तुझ्या यशाची द्युति ५

महाराणि तूं, आम्ही दासी
लीन सारख्या तव चरणांसी
कधीं कोणती आज्ञा देसी
तुझिया चरणीं लीन राहुं दे, सदा आमुची मति ६

विनोद नच हा, हीच अपेक्षा
.तव भाग्याला नुरोत कक्षा
देवदेवता करोत रक्षा
दृष्ट न लागो आमुचीच गे, तुझिया भाग्याप्रति ७

ओळखिचे बघ आले पदरव
सांवलींतही दिसतें सौष्ठव
तुला भेटण्या येती राघव
बालिश नयनीं तुझ्या येइ कां, लज्जेला जागृति ? ८

# १४

## "व्हायचे राम अयोध्यापति"

या वार्तेने, प्रासादाप्रमाणेंच नगरांतहि आनंदाला भरतें आलें होतें. प्रजाजन आनंदोत्सवांत मग्न होऊन गेले होते. श्रीरामांच्या दोन्ही सापत्न माताहि कौसल्येइतक्याच आनंदांत होत्या. मंथरा नांवाच्या एका दुष्ट कुबडया दासीनें कैकयीचा बुद्धिभेद केला—"भरत शत्रुघ्न आजोळीं गेले असतां दशरथ रामाला अभिषेक करतो आहे, त्याअर्थीं त्यांतला हेतु शुद्ध नाहीं. राज्य तुझ्या भरताला मिळालें पाहिजे, आणि राम येथून टळला पाहिजे." कैकयीनें पुष्कळ विरोध केला, पण शेवटीं......तिच्याहि मनांत असूया नाचूं लागला. क्रुद्ध आवाजांत कैकयीनें राजा दशरथाला बजावलें—

केकयी :

मोडूं नका वचनास-नाथा-मोडूं नका वचनास
भरतालागीं द्या सिंहासन, रामासी वनवास

नलगे सांत्वन, नको कळवळा
शब्द दिले ते आधी पाळा
आजोळाहुन परत बोलवा, आणि माझ्या भरतास १

सुतस्नेहानें होउन वेडे
कां घेतां हे आढेवेढे ?
वचनभंग का शोभुन दिसतो, रघुवंशज वीरास ? २

दंडकवनिं त्या लढतां शंबर
इंद्रासाठीं घडलें संगर
रथास तुमच्या कुणी घातला, निजबाहूंचा आंस ? ३

नाथ रणीं त्या विजयी झाले
स्मरतें का ते काय बोलले ?—
"दिधले वर तुज दोन लाडके, सांग आपुली आस" ४

नारिसुलभ मी चतुरपणानें
अजुन रक्षिलीं अपुलीं वचनें
आज मागतें वर ते दोन्ही, साधुनिया समयास ५

एक वरानें द्या मज अंदण
भरतासाठीं हें सिंहासन
दुजा वरानें चवदा वर्षे रामाला वनवास ६

पक्षपात करि प्रेमच तुमचें
उणें अधिक ना यांत व्हायचे
थोर मुखानें दिलेत वर मग, आतां कां निःश्वास ? ७

प्रासादांतुन रामा काढा
वा वंशाची रीती मोडा
धन्यताच वा मिळवा देवा, जागुनि निज शब्दांस ८

खोटी मूर्च्छा, खोटे आंसूं
ऐश्वर्याचा राम पिपासू
तृप्त करावा त्यास हाच कीं आपणांसि हव्यास ९

व्योम कोसळो, भंगो धरणी
पुन्हां पुन्हां कां ही मनधरणी ?
वर-लाभाविण मी न ध्यायची, शेवटचाहि श्वास १०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2324 काव्य
दा. क्र. 29569

# १८

## "नाथा मोडूं नका वचनास—"

—कैकयीच्या कठोर दटावणीनें राजा दशरथाच्या मस्तकावर पुन्हां पुन्हां वज्राघात केले दशरथाची अवस्था मोठी केविलवाणी झाली. त्यानें विनवून पाहिलें. आर्जवून पाहिलें. कैकयीचा हट्ट अणुमात्र कमी झाला नाहीं. राजा किंकर्तव्यमूढ स्थितींत पुतळ्यासारखा स्तब्ध बसून राहिला. एवढ्यांत मंत्री सुमंत कैकयीच्या मंदिराच्या द्वाराशीं आला. अधीर कैकयीने सुमंताला आज्ञा केली—"रामाला इकडे घेऊन या."

यौवराज्याभिषेकासाठीं सिद्ध असलेल्या श्रीरामाला घेऊन सुमंत कैकयीच्या मंदिरांत आला राजा दशरथ म्लानवदन आणि अबोल अवस्थेंत खाली मान घालून बसलेला पाहून श्रीरामाला आश्चर्याचा धक्का बसला. श्रीरामानें डोळ्यांनींच कैकयीला कारण विचारलें. तिनें सर्व प्रकार निवेदन केला, आणि अंतीं म्हणाली—"तुला प्रत्यक्ष सांगण्याचा त्यांना धीर होत नाहीं, पण राज्य भरताला मिळावें व तूं चौदा वर्षें वनवासास जावेंस अशी त्यांची इच्छा आहे." यावरहि राजा दशरथ कांहीं बोलला नाहीं. राजाचें मौन हीच अनुमति जाणून, राम आंनदानें वनवासास जाण्यास तयार झाले. अभिषेकोत्सवाच्या आनंदावर एकाएकी विरजण पडलें. झालेला प्रकार आपल्या मातेस सांगावा म्हणून, श्रीराम लक्ष्मणासह कौसल्येच्या मंदिरांत गेले.

कौसल्या शुभ्रवेष परिधान करून, अग्नीला आहुति देत होती. राम येतांच ती हर्षित झाली. रामानें बसावें म्हणून कौसल्येनें आसन पुढें केलें.

राम बसले तर नाहींतच, पण त्यांनीं पित्राज्ञेनें आपण वनवासास निघालों आहोंत हें आईला सांगितलें. कौसल्या हतबुद्धच झाली. कैकयीचा हट्ट, राजा दशरथाचें वरदान आणि श्रीरामाचें कठोर कर्तव्यपालन, कशा-कशाचाच तिला बोध होईना. श्रीरामाला हृदयाशीं कवटाळून आर्त स्वरानें ती म्हणू लागली—

कौसल्या :

उंबरठ्यासह ओलांडुनिया मातेची माया
नको रे जाउं रामराया

शतनवसांनीं येउन पोटीं
सुखविलेंस का दुःखासाठीं ?
प्राण मागतो निरोप, रडते कासाविस काया १

कशी मूढ ती सवत कैकयी
तीही मजसम अबला, आई
आज्ञा देइल का भरता ती कांतारीं जाया ? २

तृप्त होउं दे तिचीं लोचनें
भरत भोगुं दे राज्य सुखानें
वनीं धाडिते तुजसि कशास्तव वैरिण ती वांया ? ३

सांगुं नये तें आज सांगतें
मजहुन ह्यांना ती आवडते
आजवरी मी कुणां न कथिल्या मूक यातना या ४

तिच्या नयनिच्या अंगारांनीं
जळतच जगलें मुला, जीवनीं
तुझिया राज्यीं इच्छित होतें अंतिं तरी छाया ५

अधर्म सागूं कसा बालका ?
तुष्ट ठेव तूं तुझिया जनका
माग अनुज्ञा मात्र जननितें कांतारीं न्याया ६

तुझ्यावांचुनी राहुं कशी मी ?
वियोग रामा, साहुं कशी मी ?
जमदग्नीसम तात तुझे कां कथिति न माराया ७

तुझ्या करें दे मरणच मजसी
हो राजा वा हो वनवासी
देहावांचुन फिरेन मग मी मागोवा घ्याया ८

# १६

**"नको रे जाउ रामराया—"**

—म्हणून कौसल्येनें कितीहि आक्रोश केला तरी श्रीरामाचा निश्चय बदलला नाहीं. उलट, कुठल्याहि परिस्थितींत पत्नीनें पतीला सोडून राहूं नये, असेंच श्रीरामानें कौसल्येस सांगितलें स्थिर डोळ्यांनीं हें सर्व पाहत असलेल्या लक्ष्मणाला मात्र आतां हें सहन होईना. तो संतापून म्हणाला—

लक्ष्मण :

रामाविण राज्यपदीं कोण बैसतो ?
घेउनियां खड्ग करीं, मीच पाहतो

श्रीरामा, तूं समर्थ
मोहजालिं फससि व्यर्थ
पाप्यांचे पाप तुला उघड सांगतो १

वरहि नव्हे, वचन नव्हे
कैकयिला राज्य हवें
विषयधुंद राजा तर तिजसि मानतो २

वांच्छिती जे पुत्रघात
ते कसले मायतात ?
तुज दिधला शब्द कसा नृपति मोडतो ? ३

लंपट तो विषयिं दंग
तुजसि करी वचनभंग
भार्येचा हट्ट मात्र निमुट पाळितो ४

वर दिधलें कैकयीस
आठवले या मितीस
आजवरी नृपति कधीं बोलला न तो ? ५

मत्त मतंगजापरी
दैव तुझें चाल करी
श्रीरामा, मीच त्यास दोर लावितो ६

बैस तूंच राज्यपदीं
आड कोण येइ मधीं ?
येउं देत, कंठस्नान त्यास घालितो ७

येउं देत तिन्ही लोक
घालिन मी त्यांस धाक
पाहुं देच वृद्ध पिता काय योजितो ८

शत शतकें पाळ धरा
श्रीरामा, चापधरा,
रक्षणासि पाठीं मी सिद्ध राहतों ९

येइल त्या करिन सजा
बंधू नच, दास तुझा
मातुःश्री कौसल्येशपथ सांगतो १०

5

# १७

**"रामाविण राज्यपदीं कोण बैसतो ? घेउनिया खड्ग करीं मीच पाहतों–"**

—अशा ईर्ष्येला पेटलेल्या लक्ष्मणाला श्रीरामानें मोठ्या प्रयासानें शांत केलें. मातु:श्री कौसल्येस नम्रपणें सांगितलें, "आई, माझ्या जाण्यानें महाराजांना अत्यंत दु:ख झालें आहे. अशा परिस्थितींत त्यांना सोडून तूहि माझ्या संगतीं अरण्यांत येणें योग्य नव्हे." कौसल्येला तें मान्य करणें भाग पडलें.

मग श्रीराम सीतेच्या मंदिरांत आले. तिला त्यांनीं सर्व प्रकार निवेदन केला. शेवटी, वनांत जाण्यासाठीं निरोप मागितला. "निरोप" शब्द ऐकतांच उदास हसत सीता म्हणाली—

सीता :

निरोप कसला माझा घेतां ?
जेथें राघव तेथें सीता

ज्या मार्गी हे चरण चालती
त्या मार्गी मी त्यांच्या पुढती
वनवासाची मला न भीति
संगे आपण भाग्यविधाता ! १

संगें असता नाथा, आपण
प्रासादाहुन प्रसन्न कानन
शिळेस म्हणतिल जन सिंहासन
रघुकुलशेखर वरी बैसतां २

वनीं श्वापदें, क्रूर निशाचर
भय न तयांचें मजसी तिळभर
पुढती मागें दोन धनुर्धर
चाप त्यां करीं, पाठिस भाता ३

ज्या चरणांच्या लाभासाठीं
दडलें होतें धरणीपोटीं
त्या चरणांचा विरह शेवटीं—
काय दिव्य हें मला सांगतां ? ४

कोणासाठीं सदनीं राहूं ?
कां विरहाच्या उन्हांत न्हाऊं ?
कां भरतावर छत्रें पाहूं ?
दास्य करूं कां कारण नसतां ? ५

कां कैकयि वर मिळवी तिसरा ?
कां अपुल्याही मनीं मंथरा ?
कां छळितां मग वृथा अंतरा ?
एकटीस मज कां हो त्यजितां ? ६

विजनवास या आहे दैवीं
ठाउक होतें मला शैशवीं
सुखदुःखांकित जन्म मानवी
दुःख सुखावें प्रीति लाभतां ७

तोडा आपण; मी न तोडितें
शत जन्मांचें अपुलें नातें
वनवासासी मीही येतें
जाया-पति कां दोन मानितां ? ८

पतीच छाया, पतीच भूषण
पतिचरणांचें अखंड पूजन
हें आर्यांचें नारीजीवन
अंतराय कां त्यांत आणितां ? ९

मूक राहतां कां हो आतां ?
कितिदां ठेवूं चरणीं माथा ?
असेन चुकलें कुठें बोलतां
क्षमा करावी जानकिनाथा १०

# १८

"जेथें राघव तेथें सीता—"

—या सीतेच्या निश्चयापुढें श्रीराम काय बोलणार ? ते म्हणाले, "सीते, तुझा हा निश्चय उभय कुलांना शोभणारा आहे. वस्त्रें, भूषणें सर्व ब्राह्मणांना दान करून टाक आणि सत्वर वनवासाला निघण्याची सिद्धता कर."

श्रीराम, लक्ष्मण आणि जानकी, तिघेहि वनवासाला निघालीं. तिघांनींहि राजवेष टाकून वल्कलें धारण केलीं होतीं. सर्वांचा निरोप घेऊन श्रीराम निघाले. सुमंत मंत्री त्यांच्या रथावर बसला. रथ चालूं लागला. त्याच्या पाठोपाठ सारी अयोध्या चालूं लागली. अयोध्यावासी प्रजाजनांच्या दुःखाला वाचा फुटली. मंत्री सुमंताला हांक मारून ते रामाचा रथ थांबविण्याची विनंति करूं लागले—

अयोध्येचे नागरिक :

पुरुष : राम चालले, तो तर सत्पथ
थांब सुमंता, थांबवि रे रथ

थांबा रामा, थांब जानकी
चरणधूळ द्या धरूं मस्तकीं
काय घडे हें आज अकल्पित ! १

रामराज्य या पुरीं यायचें
स्वप्न लोचनीं अजुन कालचें
अवचित झाले भग्न मनोरथ २

गगननील हे, उषःप्रभा ही
श्रीरघुनंदन, सीतामाई
चवदा वर्षे का अस्तंगत ? ३

चवदा वर्षे छत्र लोपतां
चवदा वर्षे रात्रच आतां
उरेल नगरी का ही मूर्च्छित ? ४

स्त्रिया : कुठें लपे ती दुष्ट कैकयी ?
पहा म्हणावें हीन दशा ही
अनर्थ नच हा, तुझेंच चेष्टित ५

करि भरतातें नृप मातोश्री
रामा मागें निवे अयशी
आज अयोध्या प्रथम पराजित ६

पुरुष : पिताहि मूर्च्छित, मूर्च्छित माता
सोडुन रामा, कोठें जातां ?
सर्व न्या तरी नगर निराश्रित ७

ये अश्रूंचा पट डोळयांवर
कोठें रथ तो ? कोठें रघुवर
गळयांत रुतली वाणी कंपित ८

# १९

### "थांब सुमंता थांबवि रे रथ"—

—ही नगरजनांची आर्त प्रार्थना श्रीरामाचा रथ अडवूं शकली नाहीं. बंधु लक्ष्मण आणि पत्नी जानकी यांच्यासह श्रीराम अयोध्येच्या बाहेर पडले. त्या रात्रीं अयोध्येंतील कुठल्याहि घरीं अग्नि प्रदीप्त झाला नाहीं. दिवे लागले नाहींत. अन्न शिजलें नाहीं. उदक नाहींसें झालेल्या समुद्रासारखी ती रघुनगरी भकास झाली. श्रीरामांनीं, सीमेबाहेर गेल्यावर, अयोध्येच्या दिशेला मुख करून तिला अभिवादन केलें, आणि तेथपर्यंत आलेल्या नागरिकांना निरोप दिला. रथ मार्ग आक्रमूं लागला.

श्रीराम गंगातीरीं शृंगवेरपुरास आले निषादाधिपति गुहानें श्रीरामाचें दर्शन घेतलेंआणि अत्यंत भक्तीनें त्यांचें आदरातिथ्य केलें. ती रात्र सर्वांनीं एका इंगुदी वृक्षाखालीं काढली. दिवस उजाडल्यावर गुहानें नौका सिद्ध केली. श्रीरामांनीं सुमंतास अयोध्येस परत जाण्याची आज्ञा केली. आपण सीता-लक्ष्मणांसह नौकेंत चढले. नावाडी वल्हवूं लागले लाटा आदळूं लागल्या. गुहासह त्याचे नावाडी गाऊं लागले—

## निषादराज गुह आणि नावाडी

नकोस नौके, परत फिरूं ग, नकोस गंगे, ऊर भरूं
श्रीरामांचे नाम गात या श्रीरामाला पार करूं

जय गंगे, जय भागिरथी
जय जय राम दाशरथी

ही दैवाची उलटी रेघ
माथ्यावरचा ढळवूं मेघ
भाग्य आपुलें अपुल्या हातें अपुल्यापासुन दूर करूं १

जय गंगे, जय भागिरथी
जय जय राम दाशरथी

श्री विष्णूचा हा अवतार
भव-सिंधूच्या करतो पार
तारक त्याला तारुन नेऊं, पदस्पर्शानें सर्व तरूं २

जय गंगे, जय भागिरथी
जय जय राम दाशरथी

जिकडे जातो राम नरेश
सुभग सुभग तो दक्षिण देश
ऐल अयोध्या पडे अहल्या, पैल उगवतिल कल्पतरू ३

जय गंगे, जय भागिरथी
जय जय राम दाशरथी

कर्तव्याची धरुनी कांस
राम स्वीकरी हा वनवास
दासच त्याचे आपण, कां मग कर्तव्यासी परत सरूं ? ४

जय गंगे, जय भागिरथी
जय जय राम दाशरथी

अतिथि असो वा असोत राम
पैल लाविणें अपुलें काम
भलेंबुरें तें राम जाणता, आपण अपुलें काम करूं ५

जय गंगे, जय भागिरथी
जय जय राम दाशरथी

गंगे तुज हा मंगल योग
भगिरथ आणी तुझा जलौघ
त्याचा वंशज नेसी तूंही दक्षिण-देशा अमर करूं ६

जय गंगे, जय भागिरथी
जय जय राम दाशरथी

पावन गंगा, पावन राम
श्रीरामांचें पावन नाम
त्रिदोषनाशी प्रवास हा प्रभु, नाविक आम्ही नित्य स्मरूं ७

# २०

**"श्रीरामांचें नांव घेउनी श्रीरामाला पार करूं"**

—गुहाच्या नावाड्यांनीं श्रीरामादिकांना गंगापार केलें. वनवासी श्रीराम, भार्या व बंधु यांसह पुढें मार्गस्थ झाले. वाटेंतील दिवस चालण्यांत आणि रात्री कुठें तरी वृक्षाखालीं पर्णशय्येवर झोंपून अयोध्येचें स्मरण करण्यांत त्यांनी व्यतीत केल्या एका सायंकाळीं ते भरद्वाज मुनींच्या आश्रमांत पोंचले. भरद्वाजांनीं त्यांचें यथोचित स्वागत केलें आणि वास्तव्यासाठीं चित्रकूट पर्वत योग्य असल्याचें सांगितलें. चित्रकूटास जावयास मार्गहि कथन केला. त्यांचा निरोप घेऊन श्रीराम पुढें निघाले.

वाटेंत जानकी अनेक अनोळखी फुलांविषयीं विचारीत होती श्रीराम जिज्ञासा पुरवीत होते लक्ष्मण फुलांचे गुच्छ गुंफून वहिनींच्या हातीं देत होता.

असाच वनविहार करीत, ते तिघे चित्रकूट पर्वतावर पोंचले. तेथील एका सपाट व मनोहर स्थळाकडे अंगुलिनिर्देश करून श्रीराम म्हणाले –

श्रीराम :

या इथें लक्ष्मणा, बांध कुटी
या मंदाकिनिच्या तटनिकटीं

चित्रकूट हा, हेंच तपोवन
येथ नांदती साधक, मुनिजन
सखे जानकी, करि अवलोकन
ही निसर्गशोभा भुलवि दिठी   १

पलाश फुलले, बिल्व वांकले
भल्लातक फलभारें लवले
दिसति न यांना मानव शिवले
ना सैल लतांची कुठें मिठी   २

किती फुलांचे रंग गणावे ?
कुणा सुगंधा काय म्हणावें ?
मूक रम्यता सहज दुणावें
येतांच कूजनें कर्णपुटीं   ३

कुठें काढिती कोकिल सुस्वर
निळा सूर तो चढवि मयूर
रत्नें तोलित निज पंखांवर
संमिश्र नाद तो उंच वटीं   ४

शाखा-शाखांवरी मोहळें
मध त्यांच्यांतिल खालीं निथळे
वन संजीवक अमृत सगळें
ठेविती मक्षिका भरुन घटीं   ५

हां सौमित्रे, सुसज्ज, सावध,
दिसली, लपली क्षणांत पारध
सिद्ध असूं दे सदैव आयुध
या वनीं श्वापदां नाहि तुटी ६

जानकिसाठीं लतिका, कलिका,
तुझिया माझ्या भक्ष्य सायकां,
उभय लाभले वनांत एका
पोंचलों येथ ती शुभचि घटी ७

जमव सत्वरी काष्ठें कणखर
उटज या स्थळीं उभवूं सुंदर
शाखापल्लव अंथरुनी वर
रेखुं या चित्र ये गगनपटीं ८

# २१

"या इथें लक्ष्मणा बांध कुटी"

—या श्रीरामाच्या आज्ञेप्रमाणें लक्ष्मणानें त्वरित शाखापल्लव यांची जमवाजमव केली आणि चित्रकूट पर्वतावर श्रीरामाश्रम उभा राहिला. एक कृष्णमृग सावयव भाजून, श्रीरामांनीं त्या नव्या निवासस्थानाची समंत्रक वास्तुशांति केली. राम, लक्ष्मण आणि जानकी यांनीं त्या पर्णकुटींत प्रवेश केला.

इकडे रामवियोगानें भकास झालेल्या अयोध्येच्या प्रासादांत सुमंतानें खालच्या मानेनेंच प्रवेश केला. सुमंत आला हें कळतांच अश्रुभरल्या डोळ्यांनीं आणि कांप-या शब्दांनी राजा दशरथानें विचारलें "सुमंता, माझा राम काय रे म्हणाला जातांना ?"

सुमंत सांगूं लागला—

सुमंत :

शेवटीं करितां नम्र प्रणाम
बोलले इतुकें मज श्रीराम—

"अयोध्येस तूं परत सुमंता,
कुशल आमुचें कथुनी तातां
पदवंदन करि माझ्याकरितां
तातचरण ते वंदनीय रे, शततीर्थांचें धाम १

"अंतःपुरिं त्या दोघी माता
अतीव दुःखी असतिल सूता,
धीर देइ त्या धरुन शांतता
सौख्य आमुचें सांगुन त्यांच्या शोका देइ विराम २

"सांग माउली कौसल्येसी
सुखांत सीता सुत वनवासी
पूजित जा तूं नित्य अग्निशीं
तुझिया श्रवणीं सदा असावा मुनिवरघोषित साम ३

"वडिलपणाची जाणिव सोडुनि
सवतींशीं करि वर्तन जननी
मग्न पतीच्या रहा पूजनीं
तव हृदयाविन त्या जीवासी अन्य नसे विश्राम ४

"राजधर्म तूं आठव आई
अभिषिक्तातें गुण वय नाहीं
दे भरतासी मान प्रत्यहीं
पढव सुमंता, विनयानें हें, सांगुन माझें नाम ५

"सांग जाउनी कुमार भरता
हो युवराजा, स्वीकार सत्ता
प्रजाजनांवर ठेवी ममता
भोग सुखाचा अखंड घेई, मनि राही निष्काम ६

"छत्र शिरावर तुझ्या पित्याचें
पाळच वत्सा, वचन तयांचें
सार्थक कर त्या वृद्धपणाचें
राज्य नीतिनें करुन वाढवी रघुवंशाचें नाम ७

"काय सांगणें तुज धीमंता,
उदारधी तूं सर्व जाणता
पुत्रवियोगिनि माझी माता
तुझ्या वर्तनें तिला भासवी भरत तोच श्रीराम" ८

बोलत बोलत ते गहिंवरले
कमलनयनिं त्या आसूं भरलें
करुण दृश्य तें अजुन न सरले—
गंगातीरीं—सौमित्रीसह—उभे जानकी—राम ९

6

# २२

## "बोलले इतुकें मज श्रीराम—"

—सारथी सुमंतानें अशा तऱ्हेनें श्रीरामाचा निरोप राजा दशरथांना सांगितला तेव्हां महाराजांची अवस्था अत्यंत करुणास्पद झाली. त्यांचे डोळे निथळू लागले. श्वास जलद चालू लागले. शोकातिशयानें कंठ दाटून आला. स्वतःवरच अत्यंत चिडल्यासारखे हातवारे करीत ते बोलूं लागले प्रासादांतील सर्व मंडळी तिन्ही महाराण्यांसह भोंवती गोळा झाली. धडपडून उठल्यासारखे करीत महाराज दशरथ पुन्हां तोल जाऊन खाली कोसळले. एकदम अवसान आल्यासारखे भ्रमांतच बोलूं लागले—

राजा दशरथ :

दाटला चोहिकडे अंधार
देऊं न शकतो क्षीण देह हा प्राणांसी आधार

आज आठवे मजसी श्रावण
शब्दवेध, ती मृगया भीषण
पारधींत मी वधिला ब्राह्मण
त्या विप्राच्या अंध पित्याचें उमगे दुःख अपार १

त्या अंधाची कंपित वाणी
आज गर्जते माझ्या कानीं
यमदूतांचे शंख होउनी
त्याच्यासम मी पुत्रवियोगें तृषार्तसा मरणार २

श्रीरामाच्या स्पर्शावांचुन
अतृप्तच हें जळकें जीवन
नाहीं दर्शन, नच संभाषण
मीच धाडिला वनांत माझा त्राता राजकुमार ३

मरणसमयिं मज राम दिसेना
जन्म कशांचा ? आत्मवंचना
अजुन न तोडी जीव बंधनां
धजेल संचित केवीं उघडूं मज मोक्षाचें द्वार ? ४

कुंडलमंडित नयनमनोहर
श्रीरामाचा वदनसुधाकर
फुलेल का या गाढ तमावर ?
जातां जातां या पाप्यावर फेंकित रश्मितुषार ५

अघटित आतां घडेल कुठलें ?
स्वर्गसौख्य मी दूर लोटले
ऐक कैकयी, दुष्टे, कुटिले,
भाग्यासह तूं सौभाग्यासहि क्षणांत अंतरणार ३

पाहतील जे राम जानकी
देवच होतिल मानवलोकीं
स्वर्गसौख्य तें काय आणखी ?
अदृष्टा, तुज ठावें केव्हां रामागम होणार ?

क्षमा करी तूं मज कौसल्ये
क्षमा सुमित्रे पुत्रवत्सले
क्षमा देवते सती ऊर्मिले
क्षमा प्रजाजन करा, चाललों सुखदुःखांच्या पार ८

क्षमा पित्याला करि श्रीरामा
पतितपावना मेघश्यामा
राम लक्ष्मणा सीतारामा
गंगोदकसा अंतीं ओठीं तुमचा जयजयकार ९

श्री राम-श्री-राम-रा-म

# २३

## "दाटला चोहिकडे अंधार—"

अशा अवस्थतच राजा दशरथांचें एकाएकी प्राणोत्क्रमण झालें. सर्व नगरींत हाहाकार उडाला. वसिष्ठादिकांनी संयम-पूर्वक तो प्रसंग सहन केला. नंदीग्रामीं भरताला आणविण्या-साठीं दूत पाठविले गेले. राजा दशरथांच्या मृत्यूचें वर्तमान दूतांनी बुद्धयाच भरतापासून गुप्त ठेवलें.

'कदाचित् श्रीरामाला यौवराज्याभिषेक होत असेल म्हणून त्वरेनें पाचारण केलें असेल' अशा कल्पनेनें भरत तांतडीनें अयोध्येस आला.

गतधवा नगरीचें दृश्य त्याला अत्यंत उदास आणि करुण-गंभीर दिसलें. कैकयीची भेट होतांच, तिनें सर्व प्रकार आपल्या लाडक्या पुत्राला निवेदन केला. राजाचें और्ध्वदैहिक उरकून राज्यस्वीकार करण्याची आज्ञा तिनें त्याला केली. कैकयीचें तें स्वार्थीपणाचें भाषण ऐकून भरताला संताप अनावर झाला. तो कैकयीस म्हणाला—

गीत रामायण

भरत :

माता न तूं, वैरिणी

अश्वपतीची नव्हेस कन्या, नव्हेस माझी माय
धर्मात्म्यांच्या वंशी कृत्या निपजे, नांदे काय ?
वध नाथाचा करील मूढे, पतिव्रता का कुणी ? १

शाखेसह तूं वृक्ष तोडिला, फळां इच्छिसी वाढ
आत्मघातकी ज्ञानाचे या गातिल भाट पवाड
स्वीकारिन मी राज्य तुझ्यास्तव, कीर्ती होइल दुणी २

वनांत भ्रात्या धाडिलेंस तूं, स्वर्गि धाडिले तात
श्रीरामांते वल्कल देतां कां नच जळले हात ?
उभी न राही पळभर येथें, काळें कर जा वनीं ३

निराधार हा भरत पोरका, कुठें आसरा आज ?
निपुत्रिके, तूं मिरव लेवुनी वैधव्याचा साज
पडो न छाया तुझी पापिणी, सदनीं, सिंहासनीं ४

तुला पाहतां तृषार्त होते या खड्गाची धार
श्रीरामांची माय परी तूं, कसा करूं मी वार ?
कुपुत्र म्हणतिल मला कैकयी, माता दोघीजणी ५

कसा शांतवूं शब्दानें मी कौसल्येचा शोक ?
सुमित्रेस त्या उदासवाणे गमतिल तिन्ही लोक
कुठल्या वचनें नगरजनांची करूं मी समजावणी ? ६

वनाहुनीही उजाड झालें रामाविण हें धाम
वनांत हिंडुन धुंडुन आणिन परत प्रभु श्रीराम,
नका आडवे येऊं आतां कुणी मासिया पर्णी ७

चला सुमंता, द्या सेनेला एक आपुल्या हांक
श्रीरामाला शोधायास्तव निघोत नजरा लाख
अभिषेकास्तव घ्या सांगातीं वेदजाणते मुनी ८

असेल तेथें श्रीरामाचा मुकुट अर्पिणें त्यास
हाच एकला ध्यास, येयुनी हीच एकली आस
कालरात्रसी रहा इथें तूं आक्रंदत विजनीं ९

# २४

## "माता न तूं वैरिणी—"

इतक्या कठोर शब्दांनीं कैकयीची निर्भर्त्सना करून भरत श्रीरामाच्या शोधासाठी अयोध्येबाहेर पडला. त्याच्या समवेत चतुरंग सेना निघाली. नगरवासी जनता निघाली. कौसल्या सुमित्रा याहि निघाल्या.

भरतानें श्रीरामासारखाच तापसवेष परिधान केला. रामलक्ष्मण गेले त्याच मार्गानें हा जनसागर निघाला. भरद्वाजाश्रमीं भरताला समजलें कीं श्रीरामाश्रम चित्रकूट पर्वतावर आहे. सैन्यासह भरत तिकडे निघाला.

इकडे पर्णकुटीच्या आसमंतांत राम, लक्ष्मण आणि जानकीसह बिहार करीत होते उत्तर दिशेकडून एकाएकी धुळीचे लोळ उठले आणि कानठळ्या बसविणारे नाद कानीं आले सदैव जागरूक असणारा वीरबाहु लक्ष्मण मोठ्या घाईनें श्रीरामांना म्हणाला—

लक्ष्मण :

आश्रया गुहेकडे जानकीस पाठवा
चापबाण घ्या करीं सावधान राघवा !

मेघगर्जनेपरी, काननांत हो ध्वनी
धांवतात श्वापदें भक्ष्यभाग टाकुनी
कोंकतात भेंकरें, कंपितांग थांबुनी
धूळ ही नभीं उडे, सैन्य येतसे कुणी
खूण ना दिसो कुणा, दीप्त अग्नि शांतवा १

उत्तरेस तो थवा, काय तर्क बांधुनी ?
पाहतोंच काय तें, तालवृक्षि जाउनी
कोण येइ चालुनी, निर्मनुष्य ह्या वनीं
सिद्ध राहुं ह्या तळीं, चाप रज्जु ओढुनी
पाहुं वीर कोण तो, दावि शौर्य-वैभवा २

कंक पायि धांवती, हस्ति अश्व दौडती
धर्मस्नात सारथी, आंत ते महारथी
कोण श्रेष्ठ एक तो, राहिला उभा रथीं
सांवळी तुम्हांपरी, दीर्घबाहु आकृती
बंधु युद्धकाम का, शोधुं येइ बांधवा ? ३

भ्याड भरत काय हा बंधुघात साधतो
येउं दे पुढे जरा, कंठनाल छेदतों
कैकयीस पाहुं दे, छिन्न पुत्रदेह तो
घोडदौड वाजते, ये समीप नाद तो
ये पुनश्च आज ही, संधि शस्त्रपाटवा ४

एक मी उभा इथें, येउं देत लाख ते
लोकपाल तो नवा, स्वत्वहीन लोक ते
क्षम्य ना रणांगणीं पोरकेंहि पोर तें
शत्रुनाश क्षत्रियां, धर्मकार्य थोर तें
ये समोर त्यास मी, धाडितोंच रौरवा ५

नावरेच क्रोध हा बोधिल्या अनेकदां
राम काय जन्मला सोसण्यास आपदा
होउं देच मेदिनी पापमुक्त एकदां
भरतखंड भोगुं दे रामराज्य संपदा
धर्मरक्षण-क्षणीं, मी अजिक्य वासवां ६

# २५

"चापबाण घ्या करीं सावधान राघवा—"

—असा इशारा श्रीरामचंद्रांना देणारा लक्ष्मण स्वत: भरतावर संतापाने धावून जाऊं लागला तेव्हां श्रीरामांनी परत त्याचें सांत्वन केलें. भरत रामाश्रमांत आला. वेड्या-सारखीच त्याने श्रीरामांच्या चरणांना मिठी घातली. रामांनीं त्याला जवळ घेतला. कुशल प्रश्न विचारले. भांबावून गेलेल्या भरताने मोठ्या कष्टाने पितृनिधनाची वार्ता सांगितली. सर्व आश्रमावरच दु:खाची छाया पसरली. यथाकाळीं श्रीरामांनी वडिलांचें श्राद्ध केलें. भरत पुन्हां पुन्हां म्हणू लागला, "रामा, माझ्या आईच्या मूढपणामुळें आणि वडिलांच्या पत्नीप्रेमामुळें तुम्हाला वनवासी व्हावें लागलें. तेव्हां सर्वज्ञ श्रीराम भरताला म्हणाले—

श्रीराम :

दैवजात दुःखें भरतां दोष ना कुणाचा
पराधीन आहे जगतीं पुत्र मानवाचा

माय कैकयी ना दोषी, नव्हे दोषि तात
राज्यत्याग, काननयात्रा, सर्व कर्मजात
खेळ चाललासे माझ्या पूर्वसंचिताचा १

अंत उन्नतीचा पतनीं होइ या जगांत
सर्व संग्रहाचा वत्सा, नाश हाच अंत
वियोगार्थ मीलन होतें, नेम हा जगाचा २

जिवासवें जन्मे मृत्यू, जोड जन्मजात
दिसे भासतें तें सारें विश्व नाशवंत
काय शोक करिसी वेड्या, स्वप्निच्या फळांचा ? ३

तात स्वर्गवासी झाले, बंधु ये वनांत
अतर्क्य ना झालें कांहीं, जरी अकस्मात
मरण-कल्पनेशीं थांबे तर्क जाणत्यांचा ४

जरामरण यांतुन सुटला कोण प्राणिजात ?
दुःखमुक्त जगला का रे कुणी जीवनांत ?
वर्धमान तें तें चाले मार्ग रे क्षयाचा ५

दोन ओंडक्यांची होते सागरांत भेट
एक लाट तोडी दोघां, पुन्हां नाहिं गांठ
क्षणिक तेंवि आहे बाळा, मेळ माणसांचा ६

नको आंसु ढाळूं आतां, पूस लोचनांस
तुझा आणि माझा आहे वेगळा प्रवास
अयोध्येंत हो तूं राजा, रंक मी वनींचा ७

नको आग्रहानें मजसी परतवूंस व्यर्थ
पितृवचन पाळुन दोघे होउं रे कृतार्थ
मुकुटकवच धारण करिं, कां वेष तापसाचा ?

संपल्याविना हीं वर्षें दशोत्तरीं चार
अयोध्येस नाहीं येणें, सत्य हें त्रिवार—
तूंच एक स्वामी आतां राज्यसंपदेचा ९

पुन्हां नका येऊं कोणी दूर या वनांत
प्रेमभाव तुमचा माझ्या जागता मनांत
मान वाढवी तूं लोकीं अयोध्यापुरीचा १०

# २६

### "दैवजात दुःखें भरतां दोष न कुणाचा"

—हें श्रीरामांनी कितीहि वेळा पटवून सांगितलें तरी भरताचे डोळे कोरडे होईनात. तो पुन्हां पुन्हां श्रीरामांना आग्रह करीत होता, "तुम्ही परत चला. राज्याभिषेक करवून घ्या."

भरताप्रमाणेंच, भरताबरोबर आलेल्या ऋषिजनांनीं पुष्कळ आग्रह केला. पण श्रीरामांनी नम्रपणें नकारच दिला.

ते म्हणाले, "भरता, पित्राज्ञेने मला वनवास आणि तुला सिंहासन मिळाले आहे. तूं परत जा आणि अयोध्येचें राज्य कर. हेंच धर्म्य आणि उचित आहे. पित्राज्ञेप्रमाणें चवदा वर्षें वनवास भोगून मी सीता-लक्ष्मणासह अयोध्येंत येईन".

श्रीरामांच्या या उत्तराने निराश झालेला भरत गहिंवरला आणि श्रीरामांच्या पादुकांना स्पर्श करून करुणार्द्र स्वरांनीं म्हणाला—

भरत :

तात गेले, माय गेली, भरत आतां पोरका
मागणें हें एक रामा, आपुल्या द्या पादुका

वैनतेयाची भरारी काय मशकां साधते ?
कां गजाचा भार कोणी अश्वपृष्ठीं लादतें ?
राज्य करणें राघवाचें अज्ञ भरता शक्य का ? १

वंशरीतीं हेंच सांगे—थोर तो सिंहासनीं
सान तो सिंहासनीं कां, ज्येष्ठ ऐसा काननीं ?
दान देतां राज्य कैसें या पदांच्या सेवका ? २

घेतला मी वेष मुनिचा सोडतांना देश तो
कैकयीसा घेउं माथीं का प्रजेचा रोष तो ?
काय आज्ञा आगळी ही तुम्हिच देतां बालका ? ३

पादुका या स्थापितों मी दशरथांच्या आसनीं
याच देवी राज्यकर्त्या कोसलाच्या शासनीं
चरणचिन्हें पूजुनीं हीं साधितों मी सार्थका ४

राम नाहीं, चरणचिन्हें राहुं द्या हीं मंदिरीं
नगरसीमा सोडुनी मी राहतों कोठें तरी
भास्कराच्या किरणरेखा सांध्यकाळीं दीपिका ५

चालवीतों राज्य रामा, दुरुन तुम्ही येइतों
मोजितों संवत्सरें मी, वाट तुमची पाहतों
नांदतों राज्यांत, तीर्थीं कमलपत्रासारखा ६

सांगतां तेव्हां न आले, चरण जर का मागुती
त्या क्षणीं या तुच्छ तनुची अग्निदेवा आहुती
ही प्रतिज्ञा, ही कपाळीं पाउलांची मृत्तिका ७



तात गेले, माय गेली, भरत आता पोरका
मागणे हे एक रामा, आपुल्या द्या पादुका

# २७

## "मागणें हे एक रामा आपुल्या द्या पादुका"

—भरताने अत्यंत काकुळतीने मागितलेलें हें दान श्रीराम नाकारूं शकले नाहींत. श्रीरामांच्या चरणधुळीनें पावन झालेल्या त्या सुवर्णमंडित पादुका भरताने हत्तीवरून मिरवीत मिरवीत अयोध्येस नेल्या. त्या पादुकांनाच त्याने राज्याभिषेक करविला आणि स्वत: राज्यकारभार पाहूं लागला.

इकडे श्रीरामांनी चित्रकूट सोडला. प्रवास करीत ते दक्षिणेस निघाले. वाटेंत उभयतां भावांनी विराध नामक राक्षसाचा वध केला. शरभंगाश्रमीं जाऊन त्या स्वर्लोकगामी महात्म्याचें दर्शन घेतलें. शरभंगाश्रमींच कांहीं ऋषिजनांनीं श्रीरामांना नम्र विनंति केली, "आश्रमवासी ऋषिजनांचा राक्षसांकडून अनन्वित छळ होतो आहे. आपण समर्थ आहांत, राजे, आहांत ; धार्मिकांचें रक्षण करा." यावर सर्वज्ञ राम विनयाने आणि निश्चयाने बोलले, "तपस्वीजनांचे चिरशत्रु राक्षस यांचा नायनाट करण्याची माझी इच्छा आहे. आपण निश्चित असावें."

ऋषींना अभय-वचन देऊन श्रीराम पुढे संचार करूं लागले. सुतीक्ष्णाश्रम पंचाप्सर सरोवर या भागांत त्यांनीं दहा वर्षे आनंदाने संचार केला. नंतर सुतीक्ष्णाच्या आज्ञेवरून त्यांनीं अगस्त्याश्रमाचा मार्ग धरला. सुतीक्ष्ण आणि अगस्ति या महर्षीनीं राम-लक्ष्मणांना दिव्यायुधें अर्पण केलीं.

दहा वर्षांनंतर श्रीराम गोदावरी तटावर पंचवटींत आले. त्या मनोहर वनप्रदेशांत त्यांची कुटि अत्यंत शोभून दिसूं लागली.

एकदां याच पर्णशालेंच्या ओटयावर श्रीराम जानकी-लक्ष्मणासह वार्ताविनोद करीत असतांना एक अद्‌भुत स्त्री आश्रमाच्या अंगणांत आली. अनुरक्तेसारखे अंगविक्षेप करीत, धुंद डोळयांनीं ती श्रीरामाला न्याहाळूं लागली. हलकें हलकें मंजुळ स्वर काढून ती श्रीरामाशीं बोलूं लागली. ती म्हणाली—

शूर्पणखा :

कोण तूं कुठला राजकुमार ?
देह वाहिला तुला श्यामला, कर माझा स्वीकार

तुझ्या स्वरूपा राजलक्षण
रुद्राक्षांचीं श्रवणिं भूषणें
योगी म्हणुं तर तुझ्या भोंवती वावरतो परिवार   १

काय कारणें वनिं या येसी ?
असा विनोदें काय हांससी ?
ज्ञात नाहि का ? येथ आमुचा अनिबंध अधिकार   २

शूर्पणखा मी रावणभगिनी
याच वनाची समज स्वामिनी
अगणित रूपें घेउन करितें वनोवनीं संचार   ३

तुझ्यासाठिं मी झालें तरुणी
षोडषवर्षा मधुरभाषिणी
तुला पाहतां मनांत मन्मथ जागुन दे हुंकार   ४

तव अधराची लालस कांती
पिकं वाटतें मज एकांतीं
स्मरतां स्मर का अवतरसी तूं अनंग तो साकार ?   ५

मला न ठावा राजा दशरथ
मनांत भरला त्याचा परि सुत
प्राणनाथ हो माझा रामा, करु सौख्यें संसार   ६

तुला न शोभे ही अर्धांगी
दूर लोट ती कुरुप कृशांगी
समीप आहे तुझ्या तिचा मी क्षणि करितें संहार ७

माझ्यासंगे राहुनि अविरत
पाळ तुझें तूं एकपत्निव्रत
आलिंगनाची आस उफाळे तनूमनीं अनिवार ८

# २८

## "कोण तूं कुठला राजकुमार ?"

असें लाडीगोडीनें पुन्हां पुन्हां विचारीत श्रीरामांशी लगट करणाऱ्या शूर्पणखेला श्रीराम विनोदानें म्हणाले, "मी एक-पत्नीव्रतधारी आहे. विवाहित आहे. मला कांहीं तुझ्या प्रेमाचा स्वीकार करतां येणार नाहीं. माझा हा धाकटा भाऊ मात्र अद्यापि अविवाहित आहे, तो तुला वळतो का, पहा."

शूर्पणखेनें आपला मोहरा लक्ष्मणाकडे वळविला. लक्ष्मण हंसत हंसत म्हणाला, "माझी भार्या होणें म्हणजे दासाची दासा होणें. मी माझ्या वडील बंधूच्या चरणांचा दास आहे. तूं असे कर, श्रीरामांचीच कनिष्ठ भार्या हो. फार तर तुझ्यासाठीं ते या प्रथम पत्नीचा त्याग करतील."

लक्ष्मणाच्या भाषणांतील विनोद न समजल्यामुळें, ती मूर्ख राक्षसी खरोखरीच परत श्रीरामापाशीं गेली आणि म्हणाली, "रामा, तूं सर्वस्वी माझा राहावास म्हणून तुझ्या समक्ष तुझ्या या स्त्रीला मी खाऊन टाकतें."

शूर्पणखा जानकीच्या अंगावर धांवलीं तेव्हां मात्र महा-बलाढ्य श्रीरामांनीं लक्ष्मणाला आज्ञा केली, "या राक्षसीला विरूप करून टाक."

वडील बंधूच्या आज्ञेसरशीं लक्ष्मणानें खड्ग उपसलें आणि त्या शूर्पणखेचे नाक आणि कान छेदून टाकले. भयंकर आक्रोश करीत ती राक्षसी साऱ्या वनांतून किंकाळ्या फोडीत पळूं लागली. आपले बंधू जे खर-दूषण त्यांच्यापाशी जाऊन तिनें गाऱ्हाणें घातलें. हें ऐकून ते राक्षस रामाशीं संग्राम करण्यासाठीं धांवून आले. पण महाधनुर्धर श्रीरामांनीं दीड मुहूर्तांत त्या सर्वांचा सैन्यासह संहार करून टाकला. एकट्या रामानें खर, दूषण, त्रिशिर आणि चौदा सहस्र राक्षस वधिल्याचें पाहून ती विरूप राक्षसी लंकेस पळाली. आपला बंधू लंकाधिपति रावण याच्यासमोर उभी राहिली. सर्व अमात्यांसमक्ष ती रावणास म्हणूं लागली—

शूर्पणखा :

विरूप झाली शूर्पणखा, ही दाशरथींची कृति
सूड घे त्याचा लंकापति

कसलें करिसी राज्य रावणा, कसलें जनपालन ?
श्रीरामानें पूर्ण जिंकिलें तुझें दंडका-वन
सत्तांधा, तुज नाहीं तरिही कर्तव्याची स्मृति १

वीस लोचनें उघडुनि बघ या शूर्पणखेची दशा
श्रीरामाच्या पराक्रमानें कंपित दाही दिशा
तुझे गुप्तचर येउन नच का वार्ता ही सांगति ? २

जनस्थानिं त्या कहर उडाला, मेले खरदूषण
सहस्र चौदा राक्षस मेले हें का तुज भूषण ?
देवासम तो सुपूज्य ठरला जनस्थानिचा यति ३

तुझ्याच राज्यीं तुझ्याहुनीही पूज्य जाहला नर
सचिवांसंगें बैस येथ तूं स्वस्थ जोडुनी कर
जाळुन टाकिल तव सिंहासन उद्यां तयाची द्युति ४

सुदर्शनासह व्यर्थ झेलले छातीवर तूं शर
व्यर्थ मर्दिले देव, उचलिले सामर्थ्ये डोंगर
तूंच काय तो धर्मोच्छेदक अजिंक्य सेनापति ? ५

तूंच काय रे कुबेर जिंकुन पुष्पक नेलें घरीं ?
तूंच काय तो, वरिलो ज्यानें तक्षकनृपसुंदरी ?
तूंच काय तो भय मृत्यूचें लव नाहीं ज्याप्रति ? ६

ऐक सांगतें पुन्हां तुला त्या श्रीरामाची कथा
बाण मारतां करांत त्याच्या चमके विद्युल्लता
शस्त्रनिपुणता बघून त्याची गुंग होतसे मति ७

तो रूपानें रेखिव, श्यामल, भूमीवरती स्मर
त्याच्यासंगे जनककन्यका रतीहुनी सुंदर
तुलाच साजुन दिसेल ऐसी मोहक ती युवति ८

तिला पळवुनी घेउन यावें तुजसाठीं सत्वर
याचसाठि मी गेलें होतें त्यांच्या कुटिरावर
श्रवणनासिका तोडुन त्यांनीं विटंबिलें मज किती ! ९

जा, सत्वर जा, ठार मार ते बंधू दोघेजण
हसली मज ती जनककन्यका, येई तिज घेउन
माझ्यासम ते तव सत्तेची विटंबिती आकृति १०

# २९

"सूड घे त्याचा लंकापति'

असें पुन्हां पुन्हां म्हणून शूर्पणखेने चेतविलेला दशानन रावण रामांशीं युद्ध करून सीताहरण करण्याच्या उद्योगाला लागला. त्यानें त्यासाठीं मारिचाचें साहाय्य मागितलें. मारिचाला श्रीरामाचा, पराक्रम ज्ञात होता. त्यानें रावणाचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. पण कांहींहि उपयोग झाला नाहीं.

शेवटी कांहीं कपट जमल्यास करावें म्हणून रावणानें एक युक्ति काढली. त्यानें मारिचास मृगरूप धारण करावयास सांगितलें. व आपण याचक यतीचा वेष धारण करून त्याच्या पाठोपाठ पंचवटींत गेला.

मारिचानें धारण केलेलें अभूतपूर्व मृगरूप पाहून सीतेला खरोखरच अत्यंत मोह झाला. ती पर्णशाळेंत आली आणि श्रीरामांना म्हणूं लागली—

सीता :

तोडितां फुलें मी सहज पाहिला जातां
मज आणुन द्या तो हरिण अयोध्य नाथा

झळकती तयाच्या रत्नें श्रृंगावरती
नव मोहफुलांसम सुवर्ण अंगावरती
हे नयन भाळले त्याच्या रंगावरती
तें इंद्रचापसे पुच्छ भासलें उडतां १

तो येउन गेला अनेकदां या दारीं
दिसतात उमटलीं पदचिन्हें सोनेरी
घाशिलें शिंग या रंभास्तंभावरी
तो दिसे सुवर्णी बघा देवरा, कांता २

चालतो जलद-गति, मान मुरडितो मंद
डोळ्यांत कांहिसा भाव विलक्षण धुंद
लागला मृगाचा मला नाथ हो छंद
वेडीच जाहलें तृणांतरीं त्या बघतां ३

किति किती मृगाचें लक्षण मी त्या गणूं ?
त्या मृगास धरणें अशक्य कैसें म्हणूं ?
मजसाठिं मोडिलें आपण शांकरधनू
जा, करा त्वरा, मी पृष्ठि बांधितें भाता ४

कोषांत कोंडिलें अयोध्येंत जें धन
तें असेल धुंडित 'चरणां' साठीं वन
जा आर्य, तयातें कुटिरीं या घेउन
राखील तोंवरी गेह आपुला भ्राता ५



**अहल्योद्धार**
(उत्तरप्रदेशातील देवगड येथील शिल्प—पाचवे शतक)
भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, नवी दिल्ली



**सुवर्णमृगवध** (माळवा शैली—सतरावे शतक) राष्ट्रीय संग्रहालय, नवी दिल्ली



**अग्निदिव्य**

(मुगल शैली—सोळाव्या शतकाचा उत्तरार्ध)

भारत कलाभवन, वाराणसी



राज्याभिषेक व स्वर्गातून पुष्पवृष्टी
(माळवा शैली—सतरावे शतक)
राष्ट्रीय संग्रहालय, नवी दिल्ली

सांपडे जरी तो सजीव अपुल्या हातीं
अंगिचीं तयाच्या रत्नें होतिल ज्योति.
देतील आपणां प्रकाश रानीं राती
संगतीं नेउं त्या परत पुरीसी जातां ६

जातांच पाहतिल हरिण सासवा, जावा
करितील कैकयी भरत आपुला हेवा
ठेवीन तोंवरी जपुन गडें तो ठेवा
थांबला कशास्तव धनुर्धरा हो आतां ? ७

फेंकून बाण त्या अचुक जरी माराल
काढून भाउजी घेतिले त्याची खाल
त्या मृगासनीं प्रभु, इंद्र जसे शोभाल
तो पहा, दिसे तो दूर टेकडी चढतां ८

# ३०

"मज आणुन द्या तो हरिण अयोध्यानाथा"

या सीतेच्या हट्टासाठीं श्रीराम धनुष्यबाण, घेऊन त्या मृगाचा मागोवा घेत धांवले. श्रीरामांचा बाण वर्मी लागतांच तो मायावी मारिच "हे सीते, हा लक्ष्मणा, धांव," असें मानवी वाणीनें ओरडला. तो साद श्रीरामचंद्रांच्या सादा-सारखाच होता. त्यामुळें इकडे पर्णशाळेंत सीतेच्या शरीराला कांपरें भरलें. श्रीरामांनाच कांहीं अपघात झाला ह्या कल्पनेनें तिनें लक्ष्मणाला त्यांच्या शोधार्थ पाठविलें. आश्रमांत ती एकटी उरली. ती संधि साधून यतिवेष धारण केलेला रावण पुढें झाला. थोड्याच वेळांत त्यानें आपला खरा हेतु प्रकट केला. तो तिच्याशीं लगट करूं लागला. तेव्हां ती महापतिव्रता मैथिली त्याला कातर स्वरांनीं वजावूं लागली—

सीता :

याचका, थांबु नको दारांत
घननीळांची मूर्त वीज मी, नकोस जाळूं हात

कामव्यथेची सुरा प्राशुनी
नकोस झिंगूं वृथा अंगणी
जनकसुतेचा नखस्पर्शही अशक्य तुज स्वप्नांत १

मी न एकटी, माझ्याभंवती
रामकीर्तिच्या दिव्य आकृती
दिसल्यावांचुन तुला धाडितील देहासह नरकांत २

जंबुकस्वरसें कसलें हंससी ?
टक लावुन कां ऐसा बघसी ?
रामावांचुन अन्य न कांहीं दिसेल या नयनांत ३

या सीतेची प्रीत इच्छिसी
कालकुटांतुन क्षेम वांच्छिसी
चंद्रसूर्य कां धरूं पाहसी हतभाग्या हातांत ? ४

वनीं निर्जनीं मला पाहुनी
नेउं पाहसी बळें उचलुनी
प्रदीप्त ज्वाला बांधुन नेसी मूढा, कां वसनांत ? ५

निकषोपल निज नयनां गणसी
वर खड्गासी धार लाविसी
अंधपणासह यांत आंधळ्यां, वसे तुझा प्राणांत ६

कुठें क्षुद्र तूं, कोठें रघुवर
कोठें ओहळ, कोठें सागर
विषसदृश तूं, रामचंद्र ते अमृत रे साक्षात ७

कुठें गरुड तो, कुठें कावळा
देवेंद्रच तो राम सांवळा
इंद्राणीचो अभिलाषा कां धरिती मर्त्य मनांत ? ८

मज अबलेला दावुनिया बल
सरसाविसि कर जर हे दुर्बल
श्रीरामाचे बाण तुझ्यावर करितिल वज्राघात ९

सरशि कशाला पुढती पुढती ?
पाप्या, बघ तव चरणहि अडती
चरणांइतुकी सावधानता नाहीं तव माथ्यांत १०

धांवा धांवा नाथ रघूवर !
गजशुंडा ये कमलकळीवर
असाल तेथुन ऐका माझा शेवटचा आकान्त ११

गीतें रामायण

# ३१

## "याचका थांबु नको दारांत"

—हें सीतेचे म्हणणें मुळींच न ऐकतां, रावणानें तिला उचलली. तिच्या आक्रोशाला व संतापाला न जुमानतां त्यानें तिला रथांत घातली आणि लंकापुरीचा रस्ता धरला.

इकडे त्या मायावी मारीचाचा वध करून श्रीराम परत येत आहेत तोंच समोरून येत असलेला लक्ष्मण त्यांच्या दृष्टीला पडला. सीतेला एकटीच पर्णशाळेंत ठेवून लक्ष्मण येत आहे, हें ध्यानीं येतांच त्यांचे हृदय एकदम चरकलें. "लक्ष्मणा, जानकीला एकटी सोडून तूं कसा आलास ? त्या मायावी राक्षसानें माझ्यासारखा साद काढून आर्त हांका मारल्या, त्याने फसला नाहींसा ना ? अरे, माझ्या शरसंधानांतून वांचणें त्याला शक्य होतें का ?"

यावर लक्ष्मण नम्रपणें म्हणाला, "हें सर्व मी देवी जानकींना सांगितले. पण त्यावर त्या मला अत्यंत कठोर वचनें बोलल्या आणि त्यांच्या इच्छेप्रमाणें मला येथवर येणें भाग पडलें.'

"वेड्या, एका स्त्रीचें क्षणिक रागांतील बोलणें तूं सत्य मानलेंस ? कांहींहि असो, तिला एकटीला टाकून तूं आलास हें मुळीच बरें केले नाहींस. सत्वर पर्णशाळेकडे चल. माझा डावा डोळा लवतो आहे. अंगांत कंप उत्पन्न झाला आहे. सीतेचें कुशल असेल ना ?"

ते दोघे बंधू आश्रमांत आले. पर्णशाळेंत, सीता नव्हती. कृष्णाजिनें व दर्भ अस्ताव्यस्त पडले होते. साऱ्या आश्रमाचीच कळा नाहींशी झाली होती. श्रीराम सर्वत्र हिंडूं लागले आणि सीतेला हांका मारूं लागले—

श्रीराम :

उजाड आश्रम उरे काननीं
कोठें सीता जनकनंदिनी ?

सांग कदंबा बघुनी सत्वर
दिसते का ती नदीतटावर ?
करीं कमंडलु, कलश कटीवर
हरिमध्या ती मंदगामिनी १

सांग अशोका शोकनाशका !
कुठें शुभांगी क्षमा-कन्यका ?
कंपित कां तव पल्लव-शाखा ?
अशुभ कांहि का तुझिया स्वप्नीं ? २

कुठें चंदना, गौरांगी ती ?
कुंदलते, ती कोठें सुदती ?
कोठें आम्रा, विनयवती ती ?
शहारतां कां वाऱ्यावांचुनि ? ३

घात-घटी का पुन्हां पातली ?
सीते, सीते, सखे मैथिली !
हांक काय तूं नाहिं ऐकिली ?
येइ, शिळेच्या बसूं आसनीं ४

पहा लक्ष्मणा, दिसती डोळे
प्रियेचेच ते विशाल भोळे
मृगशावक हें तिचें कोवळें
कां याच्याही नीर लोचनीं ? ५

अबोल झाले वारें पक्षी
हरिली कां कुणि मम कमलाक्षी ?
का राक्षस कुणि तिजला भक्षी
शतजन्माचें वैर साधुनी ?   ६

पुनश्च विजयी दैव एकदा
घातांवर आघात, आपदा
निष्प्रभ अवघी शौर्यसंपदा
जाइ बांधवा, पुरा परतुनी   ७

काय भोगणें आतां उरलें ?
चार दिसांचें चरित्र सरलें
हे दुःखांचे सागर भरलें
यांत जाउं दे राम वाहुनी   ८

# ३२

"कोठें सीता जनकनंदिनी ?"

—विरहानें व्याकुळ झालेल्या श्रीरामांनी लता, वृक्ष, नद्या, वन्य मृग या सर्वांना हा आर्त प्रश्न विचारला. पण कोणीहि उत्तर देऊं शकले नाहीं. आश्रमाच्या आसमंतांत वस्ती करणारे मृग वारंवार दक्षिण दिशेला तोंड करूं लागले. तेव्हां श्रीरामांना वाटलें, सीता या दिशेला गेली असेल. विरहव्याकुल श्रीरामांचे लक्ष्मणानें मृदु शब्दांनीं सांत्वन केलें. ते दोघे भाऊ जानकीच्या शोधासाठीं दक्षिण दिशेचा मार्ग चालूं लागले. श्रीराम सारखे सीतेच्या नांवानें साद घालीत होते. निराशेनें स्फुंदत होते. जड पर्वतांना देखील सीतेचा ठिकाणा विचारीत होते.

वाटेंत त्यांना काहीं फुलें मार्गावर सांडलेली आढळलीं. श्रीरामांनी तीं फुलें ओळखलीं. तीं त्यांनींच आपल्या हातांनीं जानकीच्या केशकलापांत खोवलीं होतीं. तीं फुलें दृष्टीस पडतांच श्रीराम आणखी गहिंवरले आणि लक्ष्मणाला म्हणाले–

श्रीराम :

हीं तिच्या वेणितिल फुलें
लक्ष्मणा, तिचींच ही पाउलें

एक पदांचा ठसा राक्षसी
छेदित गेला पदचिन्हांसी
वादळें तुटली पद्मदलें १

खचित लक्ष्मणा, खचित या स्थलीं
रात्रिचर कुणि छळी मैथिली
जिंकली सती का अंगबलें ? २

दूर छिन्न हें धनू कुणाचें ?
जडाव त्यावर रत्नमण्यांचे
कुणाला कोणी झुंजविलें ? ३

वैडुर्यांकित कवच कुणाचें ?
धुळित मिळाले मणी तयाचे
राक्षसा कोणीं आडविलें ? ४

पहा छत्र तें धूलीधूसर
मोडुन दांडा पडलें भूवर
कुणीं या सूतां लोळविलें ? ५

प्रेत होउनी पडे सारथी
लगाम तुटके तसेच हातीं
तोंड तें रुधिरें मेसुरलें ६

पहा रथाचें धूड मोडकें
कणा मोडला, तुटलीं चाकें
8 बाणही भंवती विस्कटले ७

थंड दृष्टिनें न्याहळीत नभ
मरून थिजले ते बघ रासभ
कुणाचें वाहन हें असलें ?   ८

अनुमानाही पडे सांकडें
कोणी नेली प्रिया ? कुणिकडे ?
तिच्यास्तव दोघे का लढले ?   ९

हृता, जिता वा मृता, भक्षिता
कैसी कोठे माझी सीता ?
गूढ तें नाहीं आकळलें   १०

असेल तेथुन असेल त्यांनी
परतुन द्यावी रामस्वामिनी
क्षात्रबल माथीं प्रस्फुरलें   ११

स्वर्गिय वा तो असो अमानुष
त्यास जाळण्या उसळे पौरुष
कांपविन तीन्ही लोक बलें   १२

# ३३

"ही तिच्या वेणींतील फुलें; लक्ष्मणा, तिचींच ही पाउलें"

—अशी ओळख पटून, क्षात्रवृत्ति उचंबळून आलेले श्रीराम सीताशोधार्थ पुढें निघाले. तोंच त्यांना एक पक्षिश्रेष्ठ, रक्तानें माखल्या अवस्थेत जमिनीवर पडलेला दिसला. या गृध्ररूप-धारी राक्षसानेंच सीता भक्षण केली असली पाहिजे अशा कल्पनेनें श्रीरामांनी क्षुरसंज्ञक बाण त्याच्यावर रोखला. तेव्हां फेंसासह रक्त ओकीत असलेला तो पक्षिराज जटायु श्रीरामांना म्हणाला—

जटायू :

मरणोन्मुख त्याला कां रे मारिसी पुन्हां रघुनाथा ?
अडवितां खलासी पडलों, पळविली रावणें सीता

पाहिली जधीं मी जातां
रामाविण राज्ञी सीता
देवरही संगे नव्हता
मी बळें उडालों रामा, रोधिलें रथाच्या पंथा १

तो नृशंस रावण कामी
नेतसे तिला कां धार्मी
जाणिलें मनीं सारें मी
चावलों तयाच्या हातां, हाणिले पंख हे माथां २

रक्षिण्या रामराज्ञीसी
झुंजलों घोर मी त्यासी
तोडिलें कवचमुकुटासी
लावूं नच दिधलें बाणां, स्पर्शूं ना दिधला भाता ३

सर्वांगा दिधले डंख
वज्रासम मारित पंख
खेळलों द्वंद्व निःशंक
पाडला सारथी खाली, खाइ तो खरांच्या लाथा ४

साहनी दूर देवीस
मोडिला रथाचा आंस
भंगिलें उभय चक्रांस
ठेंचाळुनि गर्दभ पडलें, दुसऱ्याच्या थटुनी प्रता ५

लोळलें छत्रही खालीं
युद्धाची सीमा झाली
मी शर्थ राघवा, केली
धांवला उगारुन खड्गा, पौलस्ती चावित दातां ६

हे पंख छेदिल्यावरती
मी पडलो धरणीवरती
ती थरथर कांपे युवती
तडफडाट झाला माझा, तिज कवेंत त्यानें घेतां ७

मम प्राण लोचनीं उरला
मी तरी पाहिला त्याला
तो गगनपथानें गेला
लाडकी तुझी सम्राज्ञी, आक्रंदत होती जातां ८

# ३४

## "पळविली रावणें सीता"

—असें निश्चित सांगून पक्षिराज जटायूनें देह ठेवला. त्याच्या मृत देहाचें योग्य प्रकारें दहन करून राम-लक्ष्मण पुढें निघाले. त्यानंतर कबंध नांवाच्या एका महाभयानक राक्षसाशीं त्यांची गांठ पडली. तो शीर्षहीन राक्षस वास्तविक महातेजस्वी दनुपुत्र होता. राम-लक्ष्मणांना ओळखल्यावर तो राक्षस म्हणाला, "लक्ष्मणासहवर्तमान श्रीराम या वनांत येऊन जेव्हां तुझे हात तोडतील तेव्हां तूं स्वर्गांत जाशील,' असें मला इंद्राने सांगितलें आहे. हे रामचंद्रा, तूं मला मार आणि जाळून टाक."

"तूं मला माझी सीता कुणा रावणानें नेली आहे त्याच्या—विषयीं साद्यंत माहिती सांग," श्रीरामांनी त्याला विनती केली.

"माझा देह दहन कर, मग सांगतों," कबंध म्हणाला.

शेवटीं, राम-लक्ष्मणांनीं त्या कबंधाला एका खड्ड्यांत नेऊन टाकला आणि चिता पेटवून त्याला भडाग्नि दिला, तेव्हां तो धूमरहित अग्नीसारखा पुनर्जात होऊन बाहेर आला. त्यानें "किष्किंधाधिपति सुग्रीवाशीं सख्य कर, म्हणजे तो तुला सहाय्य करील, तुझ्या पत्नीचा शोध लावील" असें रामास सांगितले आणि पुढील मार्गहि दाखविला.

पंपा सरोवराच्या पश्चिम तीरावर पोहोचल्यावर श्रीरामांना शबरीचा आश्रम लागला. ती तपस्विनी अवर्णनीय उत्साहानें श्रीरामांना सामोरी झाली आणि म्हणाली—

शबरी :

धन्य मी शबरी श्रीरामा !
लागलीं श्रीचरणें आश्रमा

चित्रकुटा हे चरण लागतां
किती पावले मुनी मुक्तता
वृक्षातळिं या थांबा क्षणभर, करा खुळीला क्षमा १

या चरणांच्या पूजेकरितां
नयनिं प्रगटल्या माझ्या सरिता
पदप्रक्षालन करा, विस्मरा प्रवासांतल्या श्रमां २

गुरुसेवेंतच झिजलें जीवन
विलेपनार्थें त्याचें चंदन
रोमांचांचीं फुलें लहडलीं, वठल्या देहद्रुमा ३

निजज्ञानाचे दीप चेतवुन
करितें अर्चन, आत्मनिवेदन
अनंत माझ्या समोर आलें, लेवुनिया नीलिमा ४

नैवेद्या पण काय देउं मी ?
प्रसाद म्हणुनी काय घेउं मी ?
आज चकोरा-घरीं पातली, मुकेजली पौर्णिमा ५

सेवा देवा, कंदमुळें हीं
पक्व मधुरशीं बदरिफळें हीं
वनवेलींनीं काय वाहणें, याविन कल्पद्रुमा ? ६

क्षतें खगांचीं नव्हेत देवा,
मीच चाखिला स्वयें गोडवा
गोड तेवढीं पुढें ठेविलीं, फसवा नच रक्तिमा ७

कां सौमित्री, शंकित दृष्टी ?
अभिमंत्रित तीं, नव्हेत उष्टीं
या वदनीं तर नित्य नांदतो, वेदांचा मधुरिमा ८

# ३५

"धन्य मी शबरी श्रीरामा—"

—असें अत्यानंदाने म्हणतच शबरी अनंतांत विलीन झाली. पुढें श्रीराम आणि लक्ष्मण ऋष्यमूक पर्वतावर आले. या पर्वतावरच राज्यपद भ्रष्ट झालेला कपिश्रेष्ठ सुग्रीव आपल्या हनुमंतादिक मंत्र्यांसह लपून छपून वावरत होता. सुग्रीवाचा वडिल बंधु वाली यानें त्याला किष्किंधपार हांकलून लावलें होतें. सुग्रीवाची पत्नी रुमा हिचेंहि त्या पापकर्म्यानें बलानें हरण केलें होतें रामलक्ष्मणांना दुरून पाहतांच सुग्रीवाला वाटलें कीं, हे कोणी धनुर्धर वालीनें आपल्यावर पाठविले आहेत तो घाबरून मलय पर्वतावर पळाला आणि तेथून त्यानें हनुमंतास चौकशीसाठीं पाठविलें. सचिवोत्तम हनुमंतानें श्रीरामांची भेट घेतली. प्रथम दर्शनींच श्रीराम आणि हनुमंत यांच्यांत स्नेहभाव निर्माण झाला. हनुमंतानेंच श्रीराम आणि सुग्रीव यांची भेट घडविली. दोघांचीं समयोचित भाषणें झाली. हनुमंतानें अग्नि प्रज्वलित केला त्या अग्नि-समक्ष सुग्रीव श्रीरामांना म्हणाला—

सुग्रीव :

साक्षीस व्योम, पृथ्वी, साक्षीस अग्निज्वाला
सन्मित्र राघवांचा सुग्रीव आज झाला

रामा, तुझ्यापरी मी वनवास भोगताहें
हनुमन्मुखें तुला तें साद्यंत ज्ञात आहे
दुःखीच साह्य होतो दुःखांत दुःखिताला   १

बंधूच होय वैरी, तुज काय सांगु आर्या !
नेई हरून वाली माझी सुशील भार्या
वालीस राघवा, त्या तूं धाड रौरवाला   २

वाहूंत राहुच्या मी निस्तेज अंशुमाली
गतराज्य-लाभ होतां होईन शक्तिशाली
माझेंच शौर्य सांगूं माझ्या मुखें कशाला ?   ३

होतां फिरून माझें तें सैन्य वानरांचें
होतील लाख शत्रू त्या दुष्ट रावणाचे
ते लंघतील सिंधू, खणतील शैलमाला   ४

ते शोधितील सीता, संदेह यांत नाहीं
निष्ठा प्लवंगमांची तूं लोचनेंच पाही
होतील सिद्ध सारे सर्वस्व अर्पिण्याला   ५

झालेंच सख्य रामा, देतों करीं करातें
आतां कशास भ्यावें कोणा भयंकरातें ?
तूं सिद्ध हो क्षमेंद्रा, वालीस मारण्याला   ६

घालीन पालथी मी सारी धरा नृपाला,
रामासमीप अंतीं आणीन जानकीला
धाडीन स्वर्ग-लोकीं येईल आड त्याला ७

हनुमान, नील, ऐका, मंत्री तुम्ही न माझे
सुग्रीव एक मंत्री, हे रामचंद्र राजे
आज्ञा प्रमाण यांची आतां मला तुम्हांला ८

# ३६

"सन्मित्र राघवांचा सुग्रीव आज झाला—"

—अग्निसाक्ष सुग्रीवानें असें घोषित केल्यावर, श्रीरामांनीहि सुग्रीवाला साहाय्य करण्याचें वचन दिलें. सुग्रीवानें वालीला युद्धाचें आव्हान दिलें वाली व सुग्रीव यांचें द्वंद्व मोठ्या निकराचें झालें. ऐन वेळीं सुग्रीव पराजित होतो आहे असें दिसतांच श्रीरामांनीं वृक्षाआडून एक बाण फेंकला. त्या बाणानें मृतप्राय होऊन वाली धरणीवर कोसळला. आपण श्रीरामांचा कांहीहि अपराध केला नसतांना त्यांच्या बाणानें आपणांस मृत्यू येत आहे याचें आकलन होतांच, तो कळवळून श्रीरामांना म्हणाला —

"रामा, मी आपल्या सन्मुख नसतांना माझा वध करून आपण कुठला पुरुषार्थ साधलात ?"

त्यावर प्रभु रामचंद्र उत्तरले—

श्रीराम :

मी धर्माचें केलें पालन
वालीवध ना, खलनिर्दालन

अखिल धरा ही भरतशासिता
न्यायनीति तो भरत जाणता
त्या भरताचा मी तर भ्राता
जैसा राजा तसे प्रजाजन १

शिष्य, पुत्र वा कनिष्ठ भ्राता
धर्मे येते त्यास पुत्रता
तूं भ्रात्याची हरिली कांता
मनीं गोपुनी हीन प्रलोभन २

तू तर पुतळा मूर्त मदाचा
सुयोग्य तुज हा दंड वधाचा
अंत असा हा विषयांधांचा
मरण पशूचें पारध होउन ३

दिधलें होतें वचन सुग्रिवा
जीवहि देइन तुझिया जीवा
भावास्तव मी वधिलें भावा
दिल्या वचाचें हें प्रतिपालन

नृपति खेळती वनिं मृगयेतें
लपुनि मारिती तीर पशूतें
दोष कासया त्या क्रीडेतें
शाखामृग तूं क्रूर पशूहुन ५

अंत्य घडी तुज ठरो मोक्षदा
सांभाळिन मी तुझ्या अंगदा
राज्य तुझें हें, ही किष्किंधा
सुग्रीवाच्या करीं समर्पण ६

# ३७

## "वालीवध ना, खल-निर्दालन"

श्रीरामांनी वालीचा वध केला. किष्किधचें राज्य परत सुग्रीवाला प्राप्त झालें. रुमेचें आणि सुग्रीवाचें मधुर मीलन झालें. राजविलासांत रममाण होतांच सुग्रीवाला रामकार्यांची विस्मृति झाली. लक्ष्मणाने संतापून त्याला कर्तव्याची आठवण देतांच त्याचे डोळे खाडकन् उघडले. त्यानें सर्व वानरगणांना निमंत्रणें केलीं. सुग्रीवाच्या आज्ञेनुसार कोटयवधि वानर एकत्र जमले. सुग्रीवाने सीताशोधार्थ ते अष्टदिशांना पाठविले. श्रीरामांनी हनुमंत या वीरश्रेष्ठ वानराजवळ आपल्या बोटांतील एक मुद्रिका दिली. त्याच्याच हातून सीताशोधाचें कार्य होईल, असें त्यांना वाटलें.

वानरसेना अष्टदिशा चालूं लागली. दक्षिणेकडे गेलेल्या पथकांत हनुमान, नील, अंगद, तार, जांबुवान इत्यादि वीर होते. अपरंपार शोध करूनहि सीतेचा ठिकाणा सांपडला नाही. तेव्हां ते कपिश्रेष्ठ हतबुद्ध झाले. वालीपुत्र अंगद तर अगदी हताश झाला. सुग्रीवानें दिलेली महिन्याची मुदत टळून गेली. ही सर्व मंडळी एक पर्वतावर येऊन हताश बसली.

तेवढयांत संपाती नांवाचा गृध्रराज त्यांच्या समीप आला. तो जटायूचा भाऊ आणि दशरथाचा मित्र निघाला. संपाती म्हणाला, "मला येथूनच जनककन्या व रावण दिसत आहेत. मला चक्षुष्मती विद्या अवगत असल्यानें मी हें पाहूं शकतो. सीता लंका नामक सुवर्णद्वीपावर रावणाच्या अंत:पुरांत बंदिवान आहे. क्षारसमुद्राच्या अथांग पाण्याचें उल्लंघन करण्याचा कांहीं उपाय शोधा".

अंगदादिकांनी पुष्कळ विचार केला. समुद्र उल्लंघावा कुणीं ? शेवटीं जांबुवान निश्चयानें म्हणाला—

जांबुवान् :

तरुन जो जाइल सिंधु महान
असा हा एकच श्रीहनुमान्

भुजंग धरुनी दोन्हीं चरणीं
झेपेसरशी समुद्र लंघुनि
गरुड उभारी पंखां गगनीं
गरुडाहुन बलवान् १

अंजनिचा हा बलाढ्य आत्मज
हा अनिलाचा सुपुत्र क्षेत्रज
निजशक्तीनें ताडिल दिग्गज
बलशाली धीमान् २

सूर्योदयिं हा वीर जन्मला
त्रिशत योजनें नभीं उडाला
समजुनिया फळ रविबिंबाला
धरुं गेला भास्वान् ३

बाल-वीर हा रवितें धरितां
भरें कापरें तीन्ही जगतां
या इवल्याशा बाळाकरितां
वज्र धरी मघवान् ४

देवेंद्राच्या वज्राघातें
जरा दुखापत होय हनूतें
कोप अनावर येइ वायुतें
थांबे तो गतिमान् ५

पवन थांबता थांबे जीवन
देव वायुचें करिती सांत्वन
पुत्रातें वर त्याच्या देउन
गौरविती भगवान्     ६

शस्त्र न छेदिल या समरांगणि
विष्णुवरानें इच्छामरणी
ज्याच्या तेजें दिपे दिनमणी
चिरतर आयुष्मान्     ७

करि हनुमन्ता, निश्चय मनसा
सामान्य न तूं या कपिजनसा
उचल एकदां पद वामनसा
घे विजयी उड्डाण     ८

9

# ३८

## "असा हा एकच श्री हनुमान्"

जांबुवानानें हनुमंताच्या असीम सामर्थ्याचें वर्णन करतांच स्वत: हनुमंताचे बाहू देखील स्फुरण पावूं लागले. बघतां बघतां त्यानें प्रचंड रूप धारण केले. वानरांना अत्यंत हर्ष झाला. ते त्याची स्तुति गाऊं लागले.

वायुपुत्र हनुमान महेंद्र पर्वतावर आरूढ झाला. नंतर त्यानें लंकेचा आठव केला आणि आकाशमार्गानें उड्डाण केलें. तो त्रिकुटाचलावर येऊन पोहोंचला. इंद्राच्या अमरावतीसारखी भासणारी लंका त्यानें दुरून अवलोकन केली. त्या संपन्न नगरीचें रक्षण करण्यासाठीं बलाढ्य राक्षस सिद्ध होते. त्या नगरींत केवळ प्रवेश करणेंहि कठीण होतें. हनुमंतानें सूक्ष्म देह धारण केला आणि रात्रीं नगर धुंडाळण्यास प्रारंभ केला. लंकापति रावणाचें अंत:पुरदेखील त्यानें धुंडाळलें. कुठेंच मैथिली त्याच्या दृष्टीस पडली नाहीं. निराश होऊन तो अशोकवनाभोवतीं असलेल्या कोटावर येऊन बसला. त्यानें तें असीम सौंदर्यशाली वन पाहिलें, आणि नंतर एका शिंशपा वृक्षावर बसून राहिला. येथूनच राक्षसींनीं परिवेष्टित असलेली मलीनवसना सीता त्याच्या दृष्टीस पडली. हनुमंतानें सीतेला यापूर्वी कधींच पाहिली नव्हती. तो वीरश्रेष्ठ स्वत:शींच तर्क करू लागला. अंतीं निश्चितपणें त्याला वाटलें—

हनुमान् :

हीच ती रामांची स्वामिनी

चंद्रविरहिणी जणूं रोहिणी
व्याघ्रींमाजीं चुकली हरिणी
श्येन-कोटरीं फसे पक्षिणी
हिमप्रदेशीं थिजे वाहिनी १

मलिन, कृशांगी तरी सुरेखा
धूमांकित कीं अग्निशलाका
शिशिरीं तरि ही चंपकशाखा
व्रतधारिणि ही दिसे योगिनी २

रुदनें नयनां येइ अंधता
उरे कपोलीं आर्द्र शुष्कता
अनिद्रिता ही चिंताक्रान्ता
मग्न सारखी पती-चिंतनीं ३

पंकमलिन ही दिसे पद्मजा
खचित असावी सती भूमिजा
किती दारुणा स्थिती दैवजा !
अपमानित ही वनीं मानिनी ४

असुन सुवर्णा, श्यामल मलिना
अधोमुखी ही शशांक-वदना
ग्रहण-कालिची का दिग्ललना
हताश बसली दिशा विसरुनी ५



हीच ती रामाची स्वामिनी

संदिग्धार्था जणूं स्मृती ही
अन्यायार्जित संपत्ती ही
अमूर्त कोणी चित्रकृती ही
पराजिता वा कीर्ती विपिनीं ६

रामवर्णिता आकृति, मुद्रा,
बाहुभूषणें, प्रवाल-मुद्रा
निःसंशय ही तीच सु-भद्रा
हीच जानकी जनकनंदिनी ७

असेच कुंडल, वलयें असलीं
ऋष्यमुकावर होतीं पडलीं
रघुरायांनी तीं ओळखिलीं
अमृत-घटी ये यशोदायिनी ८

# ३९

## "हीच ती रामांची स्वामिनी"

—अशी निश्चित खात्री पटल्यावरहि हनुमान एकदम सीतेच्या समोर जाण्यास धजला नाहीं. तिने त्याला पूर्वी कधींच पाहिलें नव्हतें, वा रामसुग्रीव ऐक्याचीहि तिला कल्पना नव्हती. न जाणो, मायावी रावण म्हणून आपल्याशीं बोलणे तिनें नाकारलेंच तर ?

हनुमान अशा विचारांत आहे तेवढ्यांत सेवकगणांसह लंकापति रावण त्या ठिकाणीं आला आणि सीतेस धाक घालूं लागला. चिडलेल्या नागराणीसारखी फुत्कारत सीता उत्तरली-

सीता :

नको करूंस वल्गना रावणा निशाचरा !
समूर्त रामकीर्ति मी, ज्ञात हें सुरासुरां

वंदनास योग्य मी पराविया पतिव्रता
पुण्य जोड राक्षसा क्षणीं करून मुक्तता
लाज राख नारिची वीर तूं जरी खरा १

नृपति-पाप पाहतें, अनयनित्य साहतें
राष्ट्र तें जगावरी नाममात्र राहतें
काय आग लाविशी तुझ्या करें तुझ्या पुरा ? २

जिथें तिथें दिसे मला लोकनाथ राम तो
शयनिं ये उशातळीं रामहस्तवाम तो
चिंतनांत पूजितें त्याच मी धनुर्धरा ३

योग्य एक त्यास मी, योग्य ना दुजा कुणा
परत धाड रे मला प्रियासमीप रावणा !
शरण त्यांस रक्षुनी राम देइ आसरा ४

सख्य जोड त्यासवें, हो कृतार्थ जीवनीं
नित्यशुद्ध जानकी राघवास अर्पुनी
ना तरी मृतीच ये चालुनी तुझ्या घरा ५

इंद्रवज्रही कधीं चुकेल घाव घालितां
क्षणहि आयु ना तुझे रामचंद्र कोपतां
रामबाणवृष्टि ती प्रळयसी भयंकरा ६

ठाकतां तुझ्यापुढें वीर युद्धकाम तो
ठेवणार वंश ना असा समर्थ राम तो
अधम काममूढ तूं, विचार हा करी जरा ७

वधेन रामबाण मी निडर या तुझ्या उरीं
कंक पंख पाठिशीं, नामचिन्ह ज्यावरी
भारमुक्त होउं दे एकदां वसुंधरा ८

# ४०

## "नको करूंस वल्गना रावणा निशाचरा !"

—महापतिव्रता जानकीनें असें संतापून सांगतांच रावणासारखा पापात्माहि क्षणभर घाबरल्यावांचून राहिला नाहीं. जनस्थानांतील रामलक्ष्मणाचा अतुल पराक्रम त्याला ठाऊक होता. जानकीला वश होण्यासाठीं आणखी एका महिन्याचा अवधि देऊन रावण अशोकवनांतून परतला शिशपा वृक्षावर सूक्ष्मदेहानें लपून राहिलेल्या हनुमानाची खात्री पटली कीं हीच ती जानकी. अवतीभोंवतीच्या राक्षसी झोपल्या आहेत हें पाहून त्यानें मंजुळ आवाजांत रामचरित्राचें गायन सुरू केलें. त्या गायनानें चकित होऊन सीता त्या शिशपा वृक्षाकडे पाहूं लागली. शेवटीं सुग्रीवामात्य हनुमान तिच्या दृष्टीस पडला. एका लहान फांदीवरून सीतेच्या अगदी समीप झुकून हनुमानानें श्रीरामांनी दिलेली मुद्रिका तिच्या हातांत टाकली. तेव्हा सीतेला पराकाष्ठेचा आनंद झाला. हनुमान राजदूतच आहे याची निश्चिति पटल्यावर ती विचारूं लागली—

सीता :

मुद्रिका अचुक मी ओळखिली ही त्यांची
मज सांग अवस्था दूता, रघुनाथांची

हातांत धनू तें, अक्षय भाता पृष्ठीं
विरहांत काय ते राघव झाले कष्टी ?
कां श्यामल वलयें नयनतळीं चिंतांचीं ? १

बसलेत काय ते लावुन कर कर्मातें ?
विसरले काय ते दुःखें निजधर्मातें ?
करितात अजुन ना कर्तव्यें नृपतीचीं ? २

सोडिले नाहिं ना अजुन तयांनीं धीरा ?
का शौर्याचाही विसर पडे त्या वीरा ?
साह्यार्थ असति ना सैन्यें सन्मित्रांचीं ? ३

इच्छिती विजय ना त्यांचा अवघे राजे ?
का लोकप्रीतिला मुकले प्रियकर माझे ?
विसरले थोरवी काय प्रभू यत्नांची ? ४

का मलाच विसरुन गेले माझे स्वामी ?
मी दैवगतीने पिचतां परक्या धामीं
का स्मृती तयांना छळिते या सीतेची ? ५

करतील स्वयें ना नाथ मुक्तता माझी ?
धाडील भरत ना सैन्य, पदाती, वाजी ?
कळतसे त्यांस का वार्ता रघुनगरीची ? ६

का विपत्कालिं ये मोह तयांच्या चित्तीं ?
पुसटली नाहिं ना सीतेवरची प्रीती ?
करितील मुक्तता कधिं ते वैदेहीची ? ७

त्या स्वर्णघडीची होइन का मी साक्षी ?
कधिं रामबाण का घुसेल रावणवक्षीं ?
वळतील पाउलें कधीं इथें नाथांचीं ? ८

जोंवरी तयांचें कुशल ऐकतें कानीं
तोंवरी सजिव मी असेन तैशा स्थानीं
जन्मांत कधीं का होइल भेट तयांची ? ९

# ४१

**"मज सांग अवस्था दूता, रघुनाथांची"**

—या सीतेच्या प्रश्नाला हनुमंतानें समर्पक उत्तर दिलें व राम तिच्या मुक्ततेसाठीं निश्चित येणार असल्याचें शपथपूर्वक कथन केलें. रामाला ओळख पटावी म्हणून सीतेनें आपला एक मणीहि हनुमन्ताच्या स्वाधीन केला. वास्तविक सीतेला घेऊन जाण्यास स्वतः हनुमंतहि समर्थ होता; पण "परपुरुषाच्या स्कंधावर बसून जाणें योग्य नाहीं, माझी सुटका रामांनींच केली पाहिजे" असें सीतेनें निक्षून सांगितलें. विचारी आणि धर्मनिष्ठ हनुमंताला तिचें म्हणणें पटलें. तिचा निरोप घेऊन तो निघाला. जातां जातां त्याच्या मनांत आलें कीं या राक्षसांचें बल तरी आजमावावें. या विचारासरशीं त्याने अशोकवन उद्ध्वस्त करून टाकले. जंबुमाली, रावणपुत्र अक्ष यांना ठार केलें. लंकेच्या कुलदैवताचा नाश केला. तेव्हां रावणपुत्र इंद्रजितानें त्याला ब्रह्मास्त्राने बद्ध केलें व रावणाच्या सभेंत नेलें. तेथें त्याला ठार मारण्याचीच आज्ञा रावणानें दिली. पण रावणाचा भाऊ विभीषण यानें दूताला मारणें राजनीतीस धरून नाहीं असे आग्रहानें प्रतिपादन केलें. शेवटीं रावणाच्या आज्ञेनें, हनुमंताच्या पुच्छाला वस्त्रें बांधून राक्षसांनीं तें पेटवून दिलें. राक्षसींनीं हे वृत्त सीतेला सांगितलें, तेव्हां तिनें अग्नीचा धांवा केला आणि हनुमंतास इजा होऊं नये असें मागणें अग्निजवळ मागितलें. पेटल्या पुच्छानिशीं हनुमंत रावणाच्या राजसभेंतून उडाला आणि—

कुश-लव :

लीलया उडुनी गगनांत
पेटवी लंका हनुमंत

नगाकार घन दिसे मारुती
विजेपरी तें पुच्छ मागुतीं
आग वर्षवी नगरीवरती
गर्जना करी महावात १

या शिखराहुन त्या गेहावर
कंदुकसा तो उडे कपीवर
शिरे गवाक्षीं पुच्छ भयंकर
चालला नगर चेतवीत २

भडके मंदिर, पेटे गोपुर
द्वार कडाडुन वाजे भेसुर
रडे, ओरडे तों अंतःपुर
प्रकाशीं बुडे वस्तुजात ३

जळे धडधडा ओळ घरांची
राख कोसळे प्रासादांची
चिता भडकली जणूं पुराची
राक्षसी करिती आकांत ४

कुणी जळाले निजल्या ठायीं
जळत पळत कुणि मार्गी येई
कुणि भीतीनें अवाक होई
ओळखी नुरल्या प्रलयांत ५

माय लेकरां टाकुन धावे
लोक विसरले नातीं नांवें
उभें तेवढें पडे आडवें
अचानक आला कल्पांत ६

खड्गें ढाली पार वितळल्या
वीरवृत्ति तर सदेह जळल्या
ज्वाळेमाजीं ज्वाळा मिळल्या
सघनता होय भस्मसात ७

वारा अग्नी, अग्नी वारा,
नुरे निवारा, नाहीं थारा
जळल्या वेशी, जळे पहारा
नाचतो अनल मूर्तिमंत ८

# ४२

"पेटवी लंका हनुमंत"

सर्व लंका पेटल्यावर, शांतचित्तानें हनुमतानें आपलें पुच्छ सागरजलांत विझूं दिलें आणि तदनंतर आकाशमार्गानें तो परत श्रीरामापाशीं आला. सीतेनें दिलेला मणि श्रीरामांनीं अचूक ओळखला आणि त्यांनीं आनंदातिशयानें हनुमंताला गाढ आलिंगन दिलें.

असंख्य वानरांसह रामलक्ष्मण दक्षिणेस निघाले. ते सर्व-जण समुद्रतीरावर पोंचले समुद्रोल्लंघन कसें करावें, हा विचार श्रीरामांना पडला. तीन दिवसपर्यन्त त्यांनीं सागराची प्रार्थना केली व शेवटी संतापून सागरावरच शस्त्र उपसले रामबाणाच्या भयाने समुद्र साकार प्रगट झाला. आणि नम्रतापूर्वक श्रीरामाला म्हणाला, "आपल्या सैन्यांत नळ नामक वानर आहे. तो विश्वकर्म्याचा पुत्र आहे. त्याच्याकडून सेतु बांधवा. मी तो आनंदाने आपल्या छातीवर धारण करीन."

श्रीरामांनी नळाला आज्ञा दिली आणि उच्चरवाने गात वानर सागरावर सेतु बांधू लागले.

वानर गण

बांधा सेतू, सेतू बांधा रे सागरीं

गिरिराजांचे देह निखळुनी
गजांगशा त्या शिळा उचलुनी
जलांत द्या रे जवें ढकलुनी
सेतुबंधने जोडुन ओढा समीप लंकापुरी १

फेका झाडें, फेका डोंगर
पृष्ठीं झेलिल त्यांना सागर
ओढा पृथ्वी पैलतटावर
वडवाग्नी तो धरील माथीं सेतू शेषापरी २

रामभक्ति ये दाटुनि पोटीं
शततीर्थांच्या लवल्या पाठी
सत्कार्याच्या पथिकासाठीं
श्रीरामाला असेच घेती वानर पाठीवरी ३

नळसा नेता सहज लाभतां
कोटी कोटी हात राबतां
प्रारंभीं घे रूप सांगता
पाषाणच हे पहा लीलया तरती पाण्यावरी ४

चरण प्रभूचे जळांत शिरतां
सकळ नद्यांना येइ तीर्थता
आरंभास्तव अधिर पूर्तता
शिळा होउनी जडूं लागल्या, लाटा लाटांवरी ५

गर्जा, गर्जा हे वानरगण !
रघुपति राघव, पतीतपावन
जय लंकारी, जानकिजीवन
युद्धाआधी झडूं लागु द्या स्फूर्तीच्या भेरी ६

सेतू नच हा क्रतू श्रमांचा
विशाल हेतू श्रीरामांचा
महिमा त्यांच्या शुभनामाचा
थबकुनि बघती संघकार्य हें स्तब्ध दिशा चारी ७

भुभुःकारनी पिटवा डंका
विजयी राघव, हरली लंका
मुक्त मैथिली, कशास शंका
सेतुरूप हा स्रोतच शिरला दुबळ्या अंधारीं ८

10

# ४३

## "सेतू बांधा रे सागरीं"

हें गीत उच्च स्वराने गात वानरांनीं समुद्रावर तेवीस योजनें लांबीचा पूल बांधन टाकला. रामसुग्रीवांची अब्जावधि सेना मोठमोठ्याने गर्जना करीत समुद्रपार होऊं लागली. सिद्ध, चारण, महर्षि आणि वर्तमान देवता यांनीं श्रीरामांचे मन:पूर्वक अभीष्ट चिंतले.

श्रीरामांच्या सेनेच्या बलाबलाची कल्पना यावी म्हणून रावणाने आपले दूत रामसैन्यांत धाडले. त्या दूतांनीं राम-सेनेच्या अचाट बलाची योग्य कल्पना रावणाला दिली. एवढेच नव्हे तर, श्वेत प्रासादाच्या सौधावरून रावणाने तो सेना-सागर प्रत्यक्ष अवलोकनहि केला. प्रत्येक वीराचे बल दूतमुखाने श्रवण केले, आणि तरीहि आपल्या मंत्र्यांना बोलावून युद्धारंभाच्याच सूचना दिल्या. रावणाचा धाकटा भाऊ विभीषण तत्पूर्वीच श्रीरामांच्या सत्पक्षास जाऊन मिळाला होता

कपटी आणि अनीतिप्रिय रावणाने विद्युज्जिव्ह नामक एका राक्षसाकडून श्रीरामांचे एक मायावी शिर करवून घेतले. आणि तो अशोकवनांत गेला. छद्मीपणाने हंसत तो सीतेला म्हणाला, "सीते, ज्या श्रीरामासाठीं तूं माझ्या विनवण्यांचा आजवर हट्टाने धि:कार करीत आलीस त्या श्रीरामाचा वध झाला. हें पहा, प्रहस्तनामक माझ्या सेनानायकाने निजल्या ठायींच रामाचे शिर छेदून आणले आहे. सर्व वानरसेना भयभीत झाली आहे. हें तुझ्या रामाचे धनुष्य आणि हें त्याचे धडावेगळे मस्तक".

अगदीं तंतोतंत रामांच्या शिरासारखे ते शिर पाहून सीतेच्या शोकाला सीमा राहिल्या नाहींत. हृदयद्रावक आक्रोश करीत ती म्हणूं लागली—

सीता :

काय ऐकतें ? काय पाहतें ? काय अवस्था ही ?
रघुवरा, बोलत कां नाहीं ?

जायेआधीं मरण पतीचें, हें कैसें घडलें ?
दैवच अंती तुटुन खड्गसें माझ्यावर पडलें
पुण्यहीन का ठरल्या लोकीं कौसल्यामाई ? १

ज्योतिष्यांचीं ग्रहगणितें का सर्वथैव चुकलीं ?
अभागिनी ही कशी अचानक सर्वस्वा मुकली ?
धुळींत निजले पुरुषोत्तम का या मूढेपायीं ? २

ओळखितें मी कमलनेत्र हे, ओळखितें श्रवणें
सरे न का ही झोंप राघवा, दीनेच्या रुदनें ?
गतीहीन कां झाली सृष्टी, सुन्न दिशा दाही ? ३

सुवर्णधनु हें ओळखिलें पण कुठें महाबाहू ?
श्यामवर्ण ती मूर्त पुन्हां मी कुठें कधीं पाहूं ?
नयन जाहले रडुन कोरडे, अंगाची लाही ४

विवाहसमयीं शपथ दिली ती विसरलांत सखया !
पुशिल्यावांचुन स्वर्गी गेला सोडुनिया जाया
ऐकलेंत का ?—जनकनंदिनी आर्त तुम्हां बाही ५

रघुकुलतिलका, तुम्ही भेटलां पितरांना स्वर्गी
परक्या हातीं सजीव उरली अर्धांगी मार्गी
रघुकुलजातें शोभुन दिसली रीत तरी का ही ? ६

अथांग सागर जिंकुन आला कशास मजसाठीं ?
काय जन्मलें कुलनाशिनि मी धरणीच्या पोटीं ?
जनकें केले यज्ञ, तयांची काय सांगता ही ? ७

हे लंकेशा, ज्या शस्त्रानें मारविलें नाथां
घाव तयाचा घाल सत्वरीं सीतेच्या माथां
रामामागें तरी जाउं दे अंतीं वैदेही ८

# ४४

## "रघुवरा बोलत कां नाहीं"

–अशा आर्त विचारणेने सीता श्रीरामांच्या प्राणहीन शिराशीं शेवटचा संवाद करतां करतांच मूर्च्छित झाली. सरमा नांवाच्या एका राक्षसीनें तिला जेव्हां खरा प्रकार सांगितला तेव्हां तिच्या जिवांत जीव आला. श्रीराम अद्याप जिवंत आहेत हें सरमेकडून कळतांच डोळयांत प्राण सांठवून ती रानदर्शनाची प्रतीक्षा करूं लागली.

श्रीराम, लक्ष्मण, सुग्रीव, इत्यादि वीर सुवेल पर्वतावर चढून लंकेचा विस्तार पाहात होते. विभीषण त्यांना सर्व खाणाखुणा सांगत होता. तोंच सुग्रीवाचे लक्ष्य कुठेतरी केंद्रित झाले. लंकाधिपति रावण आपल्या प्रासादाच्या सौधावरून तसेच रामसेनेचे निरीक्षण करीत होता. त्याला पहातांच भीमपराक्रमी सुग्रीव एकदम सुवेलावरून उडाला तो रावणाशीं जाऊन भिडला. रावण-सुग्रीवाचे अटीतटीचे द्वंद्व झाले. आतां रावण आपल्या मायावी शक्ति दाखवूं लागला. हें लक्षांत येतांच सुग्रीव त्याच्या कवेतून निसटला आणि परत श्रीरामां-समीप आला.

त्याच्या अंगावर ठायीं ठायीं जखमा झाल्या होत्या. श्रीरामांनी त्याला प्रथम प्रेमालिंगन दिले आणि नंतर सौम्य स्वरांत सांगितले—

श्रीराम :

सुग्रीवा, हें साहस असलें
भूपतीस तुज मुळिं न शोभलें

अटीतटीचा अवघड हा क्षण
मायावी तो कपटी रावण
भिडलासी त्या अवचित जाउन
काय घडें तें नाहीं कळलें १

विचारल्याविण मला, विभिषणा
सांगितल्याविण नला, लक्ष्मणा
कुणा न देतां पुसट कल्पना
उड्डाणा तव धाडस धजलें २

ज्ञात मला तव अपार शक्ति
माझ्यावरची अलोट भक्ति
तरीहि नव्हतें योग्य संप्रति
अनपेक्षित हें कांहीं घडले ३

द्वंद्वें जर तुज वधणें रावण
वृथा जमविलीं सैन्यें आपण
कशास यूथप वा वानरगण
व्यर्थच का हे लक्ष मिळविले ? ४

काय सांगुं तुज, शत्रूदमना
नृप नोळखती रणीं भावना
नंतर विक्रम, प्रथम योजना
अविचारें जय कुणा लाभले ? ५

तू पौलस्त्यासवें झुंजता
क्षीण क्षण जर एकच येता
सन्मित्रातें राघव मुकता
तव सैनिक मग असते खचलें ६

काय लाभतें या द्वंद्वानें ?
फुगता रावण तव विजयानें
लढते राक्षस उन्मादानें
वानर असते परतच फिरले ७

दशकंठचि मग विजयी होता
मैथिलीस मग कुठुन मुक्तता ?
व्यर्थंच ठरतीं वचनें शपथा
कुणी राक्षसां असतें वधिलें ? ८

जा सत्वर जा, जमवी सेना
करी रणज्ञा, सुयोग्य रचना
आप्त-सैन्यसह वधूं रावणा
व्यर्थ न दवडी शौर्य आपुलें ९

# ४९

"सुग्रीवा हें साहस असलें । भूपतीस तुज मुळिं न शोभलें—"

रणनीतिनिपुण रामचद्रांनी किष्किंधापति सुग्रीवाची अशी कानउघाडणी केली. ते सर्वजण पर्वतशिखरावरून खालीं उतरले.

स्वरशास्त्राच्या अनुरोधाने योग्य समय पाहून त्यांनीं युद्धास प्रारंभ करण्याची आज्ञा दिली. भरती येत असलेल्या सागराप्रमाणे गर्जना करीत वानरसेना लंकेकडे झेपावूं लागली. त्या प्रचंड ध्वनीच्या योगाने कोट, पर्वत, वेशी, वने यांसह सारी लंका हादरू लागली. आतां युद्धास तोंड फुटणार एवढ्यांत राजधर्माचे स्मरण येऊन श्रीराम अंगदास म्हणाले—

श्रीराम :

जा, अणि जा, रावणास सांग अंगदा
शेवटचा करि विचार फिरुन एकदां

नगरद्वारिं राम उभा सिंधु लंघुनी
रणरागीं वानरगण जाय रंगुनी
शरण येइ राघवास सोडुनी मदा    १

वरलाभें ब्रह्याच्या विसरुनी बला
पाप्या, तूं पीडिलेंस अखिल पृथ्विला
छळिसी तूं देव, नाग, अप्सरा सदा    २

उतरविण्या गर्व तुझा ठाकला उभा
शौर्याचा सूर्य राम, सैन्य ही प्रभा
जाळिल तव वंश, सर्व राज्य-संपदा    ३

शंखनाद ऐक, देख धरणिकंप ते
तुजसाठीं राक्षसकुल आज संपते
अजुन तरी सोड तृषा तव घृणास्पदा    ४

अंतीं तरि सोड मूढ वृत्ति आपुली
परतुन दे राघवास देवि मैथिली
शरणागत होइ त्यास, टाळ आपदा    ५

स्थिर राही समरीं रे समय जाणुनी
जातिल तुज रामबाण स्वर्गि घेउनी
क्षण उरे हीच एक सुगति मोक्षदा    ६

नातरि बल मायावी दाव संगरीं
ज्यायोगें हरिली तूं रामसहचरी
वज्राप्रति भिडव बाण, मेरुसी गदा ७

नाम्हि तव भूमीवर कठिण राहणें
आपणिली रामकृपा सुज्ञ बिभिषणें
लंकेच्या भूषवील तोच नृपपदां ८

# ४६

**जा, आणि जा रावणास सांग अंगदा । शेवटचा करि विचार फिरुन एकदां"**

श्रीरामांचा हा निरोप वालीपुत्र अंगदाने जशाच्या तसा जाऊन रावणास सांगितला. ते तीक्ष्ण शब्द ऐकतांच रावणाच्या क्रोधास सीमा राहिल्या नाहींत. त्याने आपल्या सचिवांना आज्ञा केली, "या दुर्बुद्धि वानराला धरून ह्याचा वध करा." त्या आज्ञेसरशीं, सर्प चिकटावेत तसे अनेक राक्षस अंगदाच्या देहाला झिटचा देऊं लागले. तो महाबलाढ्य वानर त्यांच्यासह रावणाच्या प्रासादशिखरावर उडाला आणि ते सर्व राक्षस खाली भूमीवर आपटले.

अंगदाच्या भाराने, इंद्रवज्राच्या माराने हिमालय खचला होता तसा, रावणाचा प्रासाद खचला. शिखर विदीर्ण झाले. कोपाने व्याप्त झालेल्या रावणाने आपल्या सर्व सैन्याला बाहेर पडण्याची आज्ञा दिली. तदनंतरचा कथाभाग सांगतां सांगतां कुश-लव वर्णन करूं लागले—

कुश-लव :

नभा भेदुनी नाद चालले शंख दुंदुभींचे
अनुपमेय हो सुरू युद्ध हें रामरावणांचें

सशंख राक्षसगण तो दिसला
कृष्णघनांवर बलाकमाला
मुखांतुनी शत गर्जे चपला
रणांगणावर कोसळलें तों पाउस बाणांचे १

नाचत थय थय खिंकाळति हय
गजगर्जित करि नादसमन्वय
भीषणता ती जणूं नादमय
त्या नादांतच मिळले पदरव प्लवग-राक्षसांचे

दंत दाबुनी निज अधरांवर
वानरताडण करिति निशाचर
नभांत उडती सदेह वानर
शस्त्र म्हणुन ते घाव घालिती वृक्ष-पर्वतांचे ३

"जय दाशरथी, जय तारासुत"
प्रहार करिती वानर गर्जत
झेलित शस्त्रां अथवा हाणित
उरास आलें द्वंद्व जणूं कीं महासागरांचे ४

गदा, शूळ वा लागुन शक्ति
राक्षस वानर घेती मुक्ति
रणांत पडती अतुल्या स्फूर्तीं
'जय लंकाधिप' घोष घुमविती अरी वानरांचे ५

द्वीप कोसळे, पडला घोडा
वर बाणांचा सडा वांकडा
'हाणा मारा, ठोंका तोडा'
संहारार्थी अर्थ धावती सर्व भाषितांचे ६

रणांत मरतां आनंदानें
मांसकर्दमीं फुलतीं वदनें
तींहि बुडविलीं जातीं चरणें
रणभूमीवर ओहळ सुटले लाल शोणिताचे ७

कलेवरावर पडे कलेवर
ऋक्ष, निशाचर, नकळे वानर
मरणांहुनही शौर्य भयंकर
कैक योजनें उडुनी जाती भाग अवयवांचे ८

चक्रें, चरणें, हस्त, लांगुलें
शुंडा, ग्रीवा, शिरें, पाउलें
पडलें तें शतखण्डित झालें
प्रलयकाळसें अंग थरारे धरणी-गगनाचें ९

द्वंद्व तरी हो कुठें कुणाचें
काळमुखांतुन कोणी वांचे
कुठें कुणाचें कबंध नाचे
धुमाळींत त्या कोणा पुरलें भानच कोणाचें १०

# ४७

### "अनुपमेय हो सुरू युद्ध ह रामरावणांचें—"

या युद्धाच्या भीषण धुमश्चक्रींत श्रीरामांनी रावणाचा सारथी मारला. रथ मोडला. मुकुट छत्रासह उडवून दिला. बाणवर्षावांनीं त्याला जर्जर करून टाकलें. तो हतबल झाला आहे असें पाहून श्रीराम उदारपणें म्हणाले, "रावण, तूं परत जा. थकला आहेस. उद्यां परत ये." अपमानित अवस्थेंत रावण परत आला आणि मग त्यानें आपला धाकटा भाऊ जो कुंभ-कर्ण त्याला जागा करण्याची राक्षसांना आज्ञा दिली. तो महाबलाढ्य कुंभकर्ण आठ आठ महिने झोंपून राहात असे. त्याला उठविण्यासाठीं राक्षसांनीं त्याच्या कानांभोवती भेरी, पणव आणि कुंभवाद्यें यांचा कल्लोळ केला. अंगावरून हत्ती गेले तरी शरीरावरचे केवळ रोमांच हलल्याचा त्याला भास होई इतका तो कुंभकर्ण भयंकर आकाराचा होता. कुंभकर्ण जागा झाला. रावणाने त्याला आपल्या पराजयाचें वृत्त सांगितलें आणि अत्यंत काकुळतीनें त्याच्या साहाय्याची याचना केली. कुंभकर्ण थोडें हंसत म्हणाला—

कुंभकर्ण :

योग्य समयिं जागविलें बांधवा, मला
लंकेवर काळ कठिण आज पातला

पाप्याप्रति आत्मघात
दुष्कर्म्या नरकपात
अटळचि जो नियतीनें नियम योजिला १

तव मानसिं आत्मगर्व
विषमय तव आयु सर्व
बोधशब्द कधिं न मधुर तुजसि लागला २

बिभिषणकृत सत्यकथन
अप्रिय परि पथ्य वचन
झिडकारुन एक आप्त तूंच हरविला ३

मंदोदरि विनवी नित
हित गमलें तुजसि अहित
भाव तिचा पायतळीं व्यर्थ तुडविला ४

पाहुनिया देश समय
पडताळुन न्याय, अनय
कार्याप्रति हात कधीं तूं न घातला ५

मनिं आला तो निर्णय
ना विचार वा विनिमय
सचिव कुणी पारखुनी तूं न पाहिला ६

प्रिय तितकें ऐकलेंस
अप्रिय तें त्यागिलेंस
यांत घात तूंच तुझा पूर्ण साधिला ७

उपदेशा हा न समय
लंकेशा, होइ अभय
कर्तव्या कुंभकर्ण नाहिं विसरला ८

बोलवि मज बंधुभाव
रणिं त्याचा बघ प्रभाव
रिपुरक्तें भिजविन मी आज पृथ्विला ९

सहज वध्य मजसि इंद्र
कोण क्षुद्र रामचंद्र !
प्राशिन मी क्षीरसिंधु, गिळिन अग्निला १०

वचन हाच विजय मान
करि सौख्यें मद्यपान
स्कंधीं मी सर्व तुझा भार घेतला ११

# ४८

"लंकेवर काळ कठिण आज पातलां—"

हे कुंभकर्णाचे विचार खरेच होते. त्यानें अतुल पराक्रम केला. वानरांचे जथेच्या जथे खाऊन फस्त केले. कैक बलाढ्य वानरवीरांना ठार केलें. सुग्रीवासारख्या वीराला मूर्च्छित केलें. लक्ष्मणाला तो आटोपला नाहीं. पण अंतीं श्रीरामांनी बाण-वर्षावानें त्याचे हातपाय तोडले. पर्वतासारखें प्रचंड असणारें त्याचें मस्तक अंतरीक्षांत उडवून दिलें. इंद्रजितादि घोर-पराक्रमी रावणपुत्रांचाहि वध झाला. क्रोधानें वेडा झालेला रावण अगदीं एकटा रामाशीं येऊन भिडला. असंख्य प्रकारचे बाण आणि असंख्य अस्त्रें यांचा उभयतां वीरांनी एकमेकांवर पाऊस पाडला. राम-रावण-स्थिर असून नुसतीं आयुधेंच तुमुल युद्ध करीत आहेत असा कांहीं काल भास झाला. सप्तसागर क्षुब्ध झाले. पाताळामध्यें वास्तव्य करणारे दानव, भुजंगहि व्यथित झाले. पृथ्वी हलूं लागली. सूर्य निस्तेज झाला. वायूचा संचारहि बंद झाला. एक भुजंगासारखा बाण फेंकून श्रीरामांनी रावणाचें मस्तक उडविलें. पण काय आश्चर्य ? त्या मस्तका-सारखें दुसरें मस्तक त्या जागीं पुन्हां निर्माण झालें. अशी एक-सारखीं शंभर मस्तकें रामांनीं छेदलीं. रावणाचा अंत होण्याचें लक्षण दिसेना. चिंताक्रांत श्रीराम आपल्या सारथ्याला म्हणाले (युद्धसहाय्यार्थ देवेंद्राने आपला रथ सारथ्यासह श्रीरामाला दिला होता)—

11

श्रीराम :

आज कां निष्फल होती बाण ?
पुण्य सरें कीं सरलें माझ्या बाहूंमधलें त्राण ?

शरवर्षावामाजीं दारुण
पुन्हां तरारे तरुसा रावण
रामासन्मुख कसे वांचती रामरिपूचे प्राण ? १

चमत्कार हा मुळि ना उमजे
शीर्ष तोडितां दुसरें उपजें
रावणांग कीं असे कुणी ही सजिव शिरांची खाण ?

शत शीर्षे जरि अशीं तोडिलीं
नभीं उडविलीं, पदीं तुडविलीं
पुन्हां रथावर उभाच रावण, नवें पुन्हां अवसान ३

इंद्रसारथे, वीर मातली,
सांग गूढता मला यांतली
माझ्याहुन मज असह्य झाला पित्याचा अपमान ४

वधिला खर मी, वधिला दूषण
वधिला मारिच, विराध भीषण
हेच बाण ते केला ज्यांनी वाली क्षणि निष्प्राण ५

ज्यांच्या धाकें हटला सागर
भयाबराचे केवळ आगर
त्या भात्यांतच विजयि शरांची आज पडे कां वाण ? ६

सचैल रुधिरें न्हाला रावण
सिंहापरि तरि बोले गर्जुन
मलाहि ठरला अवध्य का हा तनुधारी अभिमान ?   ७

सचित असतिल देव, अप्सरा
सुटेल तप का कुणा मुनिवरा ?
व्यर्थच झालें काय म्हणूं हें अवघें शरसंधान ?   ८

# ४९

**"आज कां निष्फल होती बाण ?"**

—श्रीरामांसारख्या समर्थ वीराच्या तोंडचे हे उद्‌गार ऐकून इंद्रसारथी मातली किंचित् हंसला आणि म्हणाला, "प्रभो, असें न समजल्यासारखें काय बोलतां ? त्याच्या वधाकरितां पितामहास्त्राचा प्रयोग करा. देवांनीं जो रावणाच्या मृत्यूचा काल सांगून ठेवला आहे तो आतां समीप आला आहे."

मातलीच्या ह्या भाषणानें श्रीरामांना जणूं स्मरण आलें आणि अगस्ति ऋषींनीं दिलेला दैदिप्यमान् बाण त्यांनी धनुष्याला लावला. आकर्ण प्रत्यंचा ओढून त्यांनी तो बाण महाप्रतापी रावणाच्या दिशेनें सोडला. तो दु:सह आणि प्रत्यक्ष मरणाप्रमाणें अनिवार्य असलेला बाण रावणाच्या वक्ष:स्थलांत जाऊन घुसला. त्यानें रावणाचें हृदय शतश: विदीर्ण करून टाकलें. बाणाचा प्रहार होतांच जीविताला मुकणाऱ्या त्या रावणाच्या हातून धनुष्यबाणहि खालीं पडले. तो महातेजस्वी राक्षसपति भूमीवर कोसळला. राक्षससैन्य वाट फुटेल तिकडे धांवत सुटलें. वानरांनीं त्यांचा विध्वंस मांडला. सारे वानरगण "रावण मेला, रामाचा जय झाला" असें म्हणत आनंदानें नाचूं लागले. अंतरीक्षांतून देवांच्या सौम्य नौबती वाजूं लागल्या. रामाच्या रथावर स्वर्गांतून पुष्पवृष्टि होऊं लागली. अप्सरा आणि गंधर्व यांचें विजयगीत कानीं येऊं लागलें—

गंधर्व आणि अप्सरा :

देवहो, बघा रामलीला
भूवरी रावणवध झाला

दाहि दिशांचीं मुखें उजळलीं
कंपरहित ती अवनी झाली
रविप्रभेतें स्थिरता आली
पातली महद्‌भाग्यवेला १

'साधु साधु' वच वदती मुनिवर
छेडूं लागले वाद्यें किन्नर
प्रमोद उसळे भूलोकावर
सुरांचा महारिपू मेला २

रणीं जयाचें चाले नर्तन
नृपासहित हे विजयी कपिगण
श्रीरामांचे करिती पूजन
वाहुनी फुलें, पर्णमाला ३

'जय जय' बोला उच्चरवानें
कल्पतरूंचीं फेका सुमनें
फेका रत्नें, मणीभूषणें
जयश्री लाभे सत्याला ४

श्याम राम हा धर्मपरायण
हा चक्रायुध श्रीनारायण
जगदुत्पादक त्रिभुवनजीवन
मानवी रामरूप ज्याला ५

हा उत्पत्ति-स्थिति-लयकारक
पद्‌मनाभ हा त्रिभुवनतारक
शरण्य एकच खलसंहारक
आसरा हाच ब्रह्मगोलां ६

वत्सलांछना धरुनी वक्षीं
संतसज्जनां हा नित रक्षी
हा सत्याच्या सदैव पक्षीं
जाणतो हाच एक याला ७

हा श्री विष्णू, कमला सीता
स्वयें जाणता असुन, नेणता
युद्ध करी हें जगताकरितां
दाखवी अतुल रामलीला ८

# ५०

## "भूवरी रावण-वध झाला"

श्रीरामांनी रावणाचें और्ध्वदैहिक करण्याची विभीषणाला आज्ञा केली. श्रीराम म्हणाले, "वैर मरणापयतच कायम राहतें. आपला कार्यभागहि सर्व उरकला आहे. ह्यास्तव त्याचा तूं संस्कार कर. तो जसा तुझा आहे तसा माझाहि आहे." रावणाच्या मृत्यूनें त्याच्या अंतःपुरांत शोकाला पूर लोटला. रावणवधानंतर श्रीरामांनीं आपलें रणकर्कश स्वरूप पार टाकलें. सौम्य रूप धारण केलें.

त्यांनी हनुमंताला आज्ञा केली, "हे वानराधिपते, विजयवार्ता आणि आमचें कुशल तू जानकीला जाऊन निवेदन कर."

मारुतीनें सांगितलेली वार्ता ऐकतांच आनंदातिशयानें सीता अबोल झाली. ती केवळ इतकेंच बोलली, "भक्तवत्सल भर्त्याच्या दर्शनाची मला इच्छा आहे."

तिची अवस्था हनुमंतानें श्रीरामांना निवेदन केली, तेव्हां त्यांचेहि डोळे पाणावले. त्यांनी विभीषणाला आज्ञा केली, "सीतेला त्वरित माझ्यापाशीं घेऊन ये."

सीता रामासमोर आली. पतिपत्नींना एकमेकांचे मुखदर्शन घडले. राजाधिराज रामचंद्र सौम्य स्वरांत त्या जनकनंदिनीला म्हणूं लागले—



देवहो, धन्य रामलीला
भूवरी रावणवध झाला

श्रीराम :

किति यत्नें मी पुन्हां पाहिली तूंते
लीनते, चारुते, सीते

संपलें भयानक युद्ध
दंडिला पुरा अपराध
मावळला आतां क्रोध
मी केलें जें, उचित नृपातें होतें १

घेतले रणीं मी प्राण
नाशिला रिपू, अवमान
उंचावे फिरुनी मान
तव भाग्यानें वानर ठरले जेते

शब्दांची झाली पूर्ती
निष्कलंक झाली कीर्ति
पाहिली प्रियेची मूर्ति
मी शौर्यानें वांकविलें दैवातें ३

तुजसाठीं सागर तरला
तो कृतार्थ वानर झाला
सुग्रीव यशःश्री त्याला
सुरललनाही गाती मंगल गीतें ४

हें तुझ्यामुळें गे झालें
तुजसाठीं नाहीं केलें
मी कलंक माझे धुतले
गतलौकिक गे लाभे रघुवंशातें ५

जो रुग्णाइत नेत्रांचा
दीपोत्सव त्यातें कैंचा ?
मनि संशय अपघाताचा
मी विश्वासूं केवि तुझ्यावर कांते ? ६

तो रावण कामी कपटी
तूं वसलिस त्याच्या निकटीं
नयनांसह पापी भृकुटी
मज वदवेना स्पष्ट याहुनी भलतें ७

मी केलें निजकार्यासी
दशदिशा मोकळ्या तुजसी
नच माग अनुज्ञा मजसी
सखि, सरलें तें दोघांमधलें नातें ८



दशदिशा मोकळ्या तुजसी
नच माग अनुज्ञा मजसी
सखि, सरलें तें दोघांमधलें नातें

# ५१

**"सखि, सरलें तें दोघांमधलें नातें**
**लीनते, चारुते, सीते—"**

या श्रीरामांच्या बोलण्याने त्या साध्वी जानकीची अवस्था काय झाली असेल ? तिच्या दोन्ही डोळ्यांतून अश्रूंचे पूर वाहूं लागले. तिनें रामचरणांची शपथ घेऊन आपल्या शुद्धत्वाबद्दल अनेकदां सांगितलें, पण कर्तव्यकठोर श्रीराम स्वस्थच राहिले.

अन्तीं ती देवतातुल्य सीता लक्ष्मणाला म्हणाली, "माझ्या-साठीं चिता सिद्ध करा. देहत्याग हा एकच मार्ग उरला आहे."

विभीषण, लक्ष्मणादिक सर्वांनाच या विदारक घटनेनें परमावधीचें दुःख झालें होतें. पण श्रीरामांचे मन वळविण्यास कुणीच समर्थ नव्हता.

चिता सिद्ध झाली. श्रीरामांना प्रदक्षिणा करून, अग्नीची ज्वाला अग्नींत मिळाती तशी ती सीता चितेत शिरली. "हाय हाय", असा अत्यंत दुःखदर्शक शब्द साऱ्या सैन्यांतून उठला. परंतु थोड्याच अवधींत ती चिता उडवून देऊन, मूर्तिमान् अग्नि सीतेला घेऊन प्रगट झाला.

तो प्रत्यक्ष पावक श्रीरामाला म्हणाला, "रामा, ही कलंक-रहित आहे. या निष्पाप पतिव्रतेचा तूं परत स्वीकार कर. माझी तुला आज्ञा आहे."

श्रीरामांचे नेत्र आनंदाश्रूंनीं भरून आले. गद्‌गद स्वरांत ते त्या सुरश्रेष्ठ अग्नीला म्हणाले—

श्रीराम :

लोकसाक्ष शुद्धी झाली सती जानकीची
स्वामिनी निरंतर माझी, सुता ही क्षमेची

ज्ञात काय नव्हतें मजसी हिचें शुद्ध शील ?
लोककोप उपजवितो का कधी लोकपाल ?
लोकमान्यता ही शक्ती लोकनायकांची १

अयोध्येस जर मी नेतों अशी जानकीतें
विषयलुब्ध मजसी म्हणते लोक, लोकनेते
गमावून बसतो माझ्या प्रीत मी प्रजेची २

प्रजा रंजवीतों सौख्यें तोच एक राजा
हेंच तत्त्व मजसी सांगे राजधर्म माझा
प्रजा हीच कोटी रूपें मला ईश्वराचीं ३

प्राणही प्रसंगी देणे प्रजासुखासाठी
हीच ठाम श्रद्धा माझ्या वसे नित्य पोटीं
मिठी सोडवूं मी धजलों म्हणुन मैथिलीची ४

वियोगिनी सीता रडतां धीर आवरेना
कसे ओलवूं मी डोळे ? उभी सर्व सेना
पापण्यांत गोठविली मी नदी आसवांची ५

राम एक हृदयीं आहे सखी जानकीच्या
जानकीविना ना नारी मनीं राघवाच्या
शपथ पुन्हां घेतों देवा, तुझ्या पाउलांची ६

विषयलोभ होता जरि त्या वीर रावणातें
अनुल्लंघ्य सीमा असती क्षुब्ध सागरातें
स्पर्शिलीं तयें ना गात्रें हिच्या साउलीचीं ७

अग्निदेव, आज्ञा अपुली सर्वथैव मान्य
गृहस्वामिनीच्या दिव्यें राम आज धन्य
लोकमाय लाभे फिरुनी प्रजा अयोध्येची ८

# ५२

**"स्वामिनी निरंतर माझी, सुता ही क्षमेची—"**

असें म्हणून श्रीरामांनी जानकीचा परत स्वीकार केल्या-नंतर रामसेनेत आनंदीआनंद झाला. महात्मा विभीषणाला श्रीरामांनीं आज्ञा केली "विभीषण, मजसाठीं लढणाऱ्या या वीरांना तूं रत्नभूषणें देऊन संतुष्ट कर. सुखानें लंकेच्या साम्राज्याचा उपभोग घे."

श्रीरामांना भरतभेटीची ओढ लागली होती. विभीषणानें पुष्पक विमान आणविलें. त्रिलोकविजयी श्रीराम सीतेसह परत अयोध्येला निघाले. पुष्पक विमान अंतराळांत उडालें. सर्व सेनाहि जयजयकार करीत निघाली.

श्रीराम विमानस्थ सीतेला भूप्रदेश दाखवीत दाखवीत थोडया विश्रांतीसाठीं श्रीभरद्वाज ऋषींच्या आश्रमीं पोंचले. त्याच दिवशी त्यांच्या वनवासाला चौदा वर्षे पूर्ण झालीं.

नगराबाहेर तापसी वृत्तीनें राहून, भरत अयोध्येचें साम्राज्य चालवीत होता. हनुमन्ताकरवीं श्रीरामांनी आपण येत असल्याचें वृत्त त्याला कळविलें. भरताचा आनंद गगनांत मावेना. शत्रुघ्नानें सारी अयोध्या शृन्गारली. उंची वस्त्रें आणि अलंकार धारण करून सारी अयोध्या श्रीरामांच्या दर्शनार्थ गोळा झाली. पुष्पक विमान खालीं उतरलें. श्रीराम सीतेसह दृष्टीस पडतांच त्यांनीं सर्वांनीं "सीतावर रामचंद्र की जय" असा आनंदगजर केला. भरतानें पुढें होऊन रामांचे चरण धरले, त्यांच्या सुपूजित पादुका परत त्यांच्या चरणीं घातल्या. आनंदाश्रूंनीं ओल्या झालेल्या नेत्रांनीं तो म्हणाला, "तुझें राज्य आतां तूं परत घे."

रामांनी भरताला आलिंगन दिलें. सर्व मातांना उभयतां रामसीतांनीं प्रणाम केले. त्या भेटीचा आनंद केवळ अवर्णनीय होता. सहस्रावधि डोळे श्रीरामांना ओवाळूं लागले. सहस्रावधि कंठ त्यांचा जयजयकार करूं लागले—

अयोध्यावासी :

त्रिवार जयजयकार, रामा, त्रिवार जयजयकार
पुष्पक यानांतुनी उतरलें स्वर्गसौख्य साकार

तुला चिंतिते सुदीर्घ आयू
पुण्यसलीला सरिता सरयू
पुलकित पृथ्वी, पुलकित वायू
आज अहल्येपरी जाहला नगरीचा उद्धार १

शिवचापासम विरह भंगला
स्वयंवरासम समय रंगला
अधिर अयोध्यापुरी मंगला
सानंदाश्रू तुला अर्पिते दृढ प्रीतीचे हार २

तव दृष्टीच्या पावन स्पर्शे
आज मांडिला उत्सव हर्षे
मनें विसरलीं चौदा वर्षे
सुसज्ज आहे तव सिंहासन, करी प्रभो स्वीकार ३

तुझ्या मस्तकी जलें शिंपतां
सप्त नद्यांना मिळो तीर्थता
अभिषिक्ता तुज जाणिव देतां
मुनिवचनांचा पुन्हां होउं दे अर्थासह उच्चार ४

पितृकामना पुरी होउं दे
रामराज्य या पुरीं येउं दे
तें कौसल्या माय पाहुं दे
राज्ञीसह तूं परंपरेनें भोग तुझा अधिकार ५

प्रजाजनीं जें रचिलें स्वप्नीं
मूर्त दिसे तें स्वप्न लोचनीं
राजा राघव, सीता राज्ञी
चतुर्वेदसे लोक पूजिती रघुकुलदीपक चार ६

रामराज्य या असतां भूवर
कलंक केवल चंद्रकलेवर
कज्जल-रेखित स्त्रीनयनांवर
विचारांतलें सत्य आणतिल अयोध्येंत आचार ७

समयिं वर्षतिल मेघ धरेवर
सत्यशालिनी धरा निरंतर
सेवारत जन, स्वधर्मतत्पर
"शांतिः शांतिः" मुनी वांछिती, ती घेवो आकार ८

12

# ५३

"त्रिवार जयजयकार"

करून अयोध्येच्या प्रजाजनांनीं श्रीरामांना आपल्या प्रासादा-कडे नेलें. योग्य मुहूर्त पाहून रामसीतांना राज्याभिषेक करविला. रामराज्याला शुभारंभ झाला. अभिषेकाच्य समारंभासाठीं आलेल्या राजांची आणि आप्तस्वकीयांची श्रीरामांनी यथोचित बोळवण केली. नंतर श्रीरामांनीं सुग्रीव, अंगद यांच्यासह सर्व वानर वीरांचा सन्मान केला. मोठमोठे मूल्यवान् अलंकार त्यांना अर्पण केले. सुग्रीवाला तर त्यांनीं आपला पांचवा भाऊच मानलें. ती सर्व मंडळी एकदोन महिने अयोध्येंत राहिली. नंतर श्रीरामांनी सुग्रीवाला किष्किंधेस परतण्यास आज्ञा केली विभीषणाला असंख्य भूषणें प्रदान केली आणि लंकेस जाण्याविषयीं आज्ञा दिली. हा निरोप-समारंभ चालू असतांनाच हनुमंत समोर आला आणि श्रीरामांचे चरण घट्ट धरून अत्यंत भावस्निग्ध स्वरांत म्हणाला—

हनुमंत :

प्रभो, मज एकच वर द्यावा
या चरणांच्या ठायीं माझा निश्चल भाव रहावा

कधिं न चळावे चंचल हें मन
श्रीरामा, या चरणांपासुन
जोंवरि भूवर रामकथानक तोंवर जन्म असावा   १

रामकथा नित वदनें गावी
रामकथा या श्रवणीं यावी
श्रीरामा, मज श्रीरामाविण दुसरा छंद नसावा   २

पावन अपुलें चरित्र वीरा
सांगु देत मज देव अप्सरा
श्रवणार्थी प्रभु, अमरपणा या दीनासी यावा   ३

मेघासम मी अखंड प्राशिन
असेल तेथुन श्रीरामायण
मेघापरि मी शतधारांनीं करीन वर्षावा   ४

रामकथेचें चिंतन गायन
तें रामाचें अमूर्त दर्शन
इच्छामात्रें या दासातें रघुकुलदीप दिसावा   ५

जोंवरि हें जग, जोंवरि भाषण
तोंवरि नूतन नित रामायण
सप्तस्वरांनीं रामकथेचा स्वाद मला द्यावा   ६

असंख्य वदनें, असंख्य भाषा
सकलांची मज एकच आशा
श्रीरामांचा चरित्र-गौरव त्यांनीं सांगावा ७

सूक्ष्म सूक्ष्मतम देहा धरुनी
फिरेन अवनीं, फिरेन गगनीं
स्थलीं स्थलीं पण रामकथेचा लाभ मला व्हावा ८

## ५४

### "प्रभो मज एकच वर द्यावा—"

हनुमंताच्या इच्छेप्रमाणें श्रीरामांनी त्याला तसा वर दिला. रामकथा आणि हनुमंत दोघेहि चिरंजीव झाले. पण श्रीरामांचें लीलाचरित्र अद्याप संपलें होते कोठें ?

श्रीराम राज्य करूं लागल्यापासून पृथ्वीवर स्वर्ग नांदूं लागला. पृथ्वीवर आनंदावाचून कांहीं उरलेंच नाहीं.

देवकन्यातुल्य असलेल्या जानकीलाहि श्रीराम सुख देऊं लागले. एकदां श्रीराम आणि जानकी अशोकवनांत बसले होते. श्रीरामांचें हे अशोकवन कुवेराच्या चैत्ररथवनासारखे अत्यंत निसर्गसंपन्न होते. जानकीची फिकट अंगकांति आणि आळसावलेली देहलता पाहून श्रीरामांनीं हंसत विचारले— "जानकी, तुला कांहीं हवे हवेसे वाटते का ?"

भर्त्याचा प्रश्न जानकीला उमगला. मंदस्मित करून ती विदेहराजकन्या श्रीरामांना म्हणाली—

सीता :

ओठांत थांबुनी सशब्द आशा लाजे
डोहाळे पुरवा रघुकुलतिलका, माझे

मज उगा वाटतें वनीं विहारा जावें
पांखरांसारखें मुक्त स्वरांनीं गावें
कानांत बांसरी वंशवनांतिल वाजे १

वाटतें धरावें कुशींत पाडस भोळें
मज आवडती ते विशाल निर्मळ डोळे
चुंबीन त्यास मी, भरविन चारा चोजें २

वल्कलें भिजावीं जळांत माझीं सारीं
घागरी कटीवर, करांत घ्यावी झारी
मस्तकीं असावें दुजा घटाचें ओझें ३

वाटतें खणावें, कंदमुळें काढावीं
तीं हलक्या हातें लीलेनें सोलावीं
चाखून बघावें अमृतान्न तें ताजें ४

सांजेस बसावें आम्रतरूच्या खालीं
गळतील सुगंधित जधीं मंजिऱ्या भालीं
करतील गर्जना दुरून वनाचे राजे ५

घेऊन धनूतें, बांधुन भाता पाठीं
वाटतें फिरावें वनांत मृगयेसाठीं
पाहीत फिरावें बिसेल श्वापद जें जें ६



मज उगा वाटते वनीं विहारा जावें
पांखरांसारखे मुक्त स्वरांनी गावें

वाटतें प्रभातीं बसुनी वेदीपाशीं
वेदांत करावा प्रकांड अध्वर्यूंशी
लालिमा मुखावर यावा पावकतेजें ७

कां हंसतां ऐसें मला खुळीला देवा ?
एवढा तरी हा हट्ट गडे पुरवावा
का विनोद ऐसा प्रिया, अवेळीं साजे ? ८

# ८८

"डोहाळे पुरवा रघुकुलतिलका माझे—"

सीतेनें आपले डोहाळे श्रीरामांना सांगितले. श्रीरामांनींहि हंसून तिच्या इच्छांचा आदर केला. ते म्हणाले, "जानकी, तुझी इच्छा लौकरांत लौकर पुरी करीन."

पतिपत्नींचा हा मनोहर संवाद झाला, त्याच्या दुसरे दिवशींची गोष्ट. भद्र नांवाच्या एका गुप्तचराने श्रीरामांना सांगितलें, "राजन्, सेतुबंधन आणि रावणवध या दोन दैवी कृत्यांबद्दल सारी प्रजा आपल्याला धन्यवाद देत आहे, पण"—

"पण काय? सत्य तें निर्भयपणें कथन कर"—अशी श्रीरामांची अनुज्ञा मिळतांच भद्र पुढें सांगूं लागला, "लोकांना एक कळत नाहीं कीं रावणाच्या घरीं राहिलेली सीता श्रीरामांनीं परत पत्नी कशी मानली ? तिच्याशीं प्रणय करण्यांत त्यांना कोणता आनंद होत असेल?"

लोकपाल श्रीरामचंद्रांचें मन पुन्हां विषण्ण झालें. आपल्या प्राणांची शपथ घालून लक्ष्मणाला आज्ञा केली, "लक्ष्मणा, जानकीला वाल्मीकिआश्रमाच्या सन्निध नेऊन सोडून ये." लक्ष्मणादि कोणाहि भावंडाला श्रीरामांची शपथ उल्लंघिता आली नाहीं. लक्ष्मणानें रथांतून जानकीला वनप्रदेशांत नेली. सीतेला वाटलें, आपले डोहाळेच पुरविले जात आहेत. असह्य होऊन लक्ष्मणानें जेव्हां सीतेला खरें काय तें निवेदन केलें, तेव्हां तिच्या दुःखाला विश्व थिटें झालें. गद्‌गद स्वरांत ती लक्ष्मणाला म्हणाली—

सीता :

मज सांग लक्ष्मणा, जाउं कुठें ?
पतिचरण पुन्हां मी पाहुं कुठें ?

कठोर झाली जेथें करुणा
गिळी तमिस्रा जेथें अरुणा
पावक जिंके जेथें वरुणा
जें शाश्वत त्याचा देंठ तुटे   १

व्यर्थ शिणविलें माता जनका
मी नच जाया, नव्हे कन्यका
निकषच मानीं कासें कनका
सिद्धीच तपाला आज विटे   २

अग्नी ठरला असत्यवक्ता
नास्तिक ठरवी देवच भक्ता
पतिव्रता मी तरि परित्यक्ता
चरणिच्या धरेसी कंप सुटे   ३

प्राण तनूंतुन उडूं पाहती
अवयव कां मग भार वाहती ?
वाहतसे मज श्रीभागिरथी
अडखळें अंतिचा विपळ कुठें ?   ४

सरलें जीवन, सरली सीता
पुनर्जात मी आतां माता
जगेन रघुकुल-दीपाकरितां
फल धरीं रूप हें, सुमन मिटे   ५

वनांत विजनीं मरुभूमीवर
वाढवीन मी हा वंशांकुर
सुखांत नांदो राजा रघुवर
जानकी जनांतुन आज उठे ६

जाइ देवरा, पुरा मागुती
शरसे माझे स्वर मज रुपती
पती न राघव, केवळ नृपती
बोलतां पुन्हां ही जीभ थटे ७

इथुन वंदितें मी मातांना
प्रणाम पोंचवि रघुनाथांना
आशिर्वच तुज घे जातांना
आणखी ओंठि ना शब्द फुटे ८



मज सांग लक्ष्मणा, जाउं कुठें ?

# ५६

"मज सांग लक्ष्मणा, जाउं कुठें ?"

या अनुत्तरित प्रश्नासहच गर्भवती जानकीला गंगापार पोंचवून मोठ्या कष्टानें सौमित्री परत फिरला. प्राप्त कर्तव्य म्हणून श्रीराम राज्यकारभार पाहूं लागले. इकडे सीता, महात्मा वाल्मीकींच्या हातीं लागली. त्यांनीं तिचें कन्येप्रमाणें पालन केलें. यथाकालीं तिला जुळीं अपत्यें झालीं. त्या रामनंदनांना भूतपिशाच्चादिकांची बाधा होऊं नये म्हणून वाल्मीकींनीं अभिमंत्रित कुश आणि लव त्या बालकांच्या शरीराभोंवतीं फिरविलें. कुश आणि लव असेंच त्यांचें नामकरण केलें. वाल्मीकींच्या देखरेखीखालीं तीं बालकें मोठीं झालीं. शैशवावस्था संपून तीं जाणतीं दिसूं लागलीं. त्यांच्या वयांना बारा वर्षें होऊन गेलीं.

अयोध्यापति श्रीराम कर्तव्यबुद्धीनें अयोध्येचें राज्य चालवीत होते. त्यांनी सर्वश्रेष्ठ असा राजसूय यज्ञ आरंभिला. त्या समारंभासाठीं सहस्रावधि राजे, मुनि आणि प्रजाजन अयोध्येंत जमले. मुनिवर्य वाल्मीकीहि आपल्या शिष्यांसह आले होते. हे शिष्य म्हणजे बालवीर कुश-लव. त्रिकालद्रष्टया वाल्मीकींनीं कुश-लव यांना आज्ञा केली—

वाल्मीकि :

रघुराजाच्या नगरीं जाउन
गा बाळांनो, श्रीरामायण

मुनिजन-पूनित सदनांमधुनी
नराधिपांच्या निवासस्थानी
उपमार्गांतुन, राजपथांतुनि
मुक्त दरवळो, तुमचें गायन १

रसाळ मूलें, फलें सेवुनी
रसाळता घ्या स्वरांत भरुनी
अचुक घेत जा स्वरां मिळवुनी
लय-तालांचें पाळा बंधन २

नगरि लाभतां लोकमान्यता
जाइल वार्ता श्रीरघुनाथां
उत्सुक होउन श्रवणाकरितां
करवितील ते तुम्हां निमंत्रण ३

REFBK-0021971
RE:FBK-0021971

सर्गक्रम घ्या पुरता ध्यानीं
भाव उमटुं द्या स्पष्ट गायनीं
थोडें थोडें गात प्रतिदिनीं
पूर्ण कथेचें साधा चित्रण ४

नका सांगुं रे नाम ग्राम वा
स्वतःस माझे शिष्यच म्हणवा
स्वरांत ठेवा हास्य गोडवा
योग्य तेवढें बोला भाषण ५

स्वयें ऐकता नृप शत्रुंजय
संयत असुं द्या मुद्रा अभिनय
काव्य नव्हे, हा अमृतसंचय
आदरील त्या रघुकुलभूषण ६

नच स्वीकारा धना कांचना
नको दान रे, नको दक्षिणा
काय धनाचें मूल्य मुनिजनां ?
अवघ्या आशा श्रीरामार्पण ७

श्री रा म चं द्रा र्प ण म स्तु

ग्रंथसंग्रहालय ठाणे